। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-28 । krushival.in
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

कृषीवल

रायगड | रविवार । दि. ८ नोव्हेंबर २०२६ । अंक १५३ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

ऐन दिवाळीत एफडीएचा दणका!

- झेप्टो, ब्लिंकिटसह नामांकित फूड ब्रॅण्ड्सवर कारवाई
- १०५ खाद्य व्यवसायांचे परवाने निलंबित
- सात आस्थापने बंद करण्याचे आदेश

। मुंबई । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या सणात खाद्यपदार्थांच्या विक्रीत वाढ होत असतानाच अन्नसुरक्षेच्या नियमांना हरताळ फासणाऱ्या खाद्य व्यवसायांवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) जोरदार कारवाई केली आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत तब्बल १०५ खाद्य व्यवसायांचे परवाने निलंबित करण्यात आले, तर सात आस्थापने बंद करण्याचे आदेश देण्यात आले. झेप्टो, ब्लिंकिट, बिर्याणी बाय किलो यांसारख्या नामांकित ब्रॅण्ड्सचाही कारवाईत समावेश असल्याने खाद्य व्यवसाय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

एफडीएने ४ आणि ५ नोव्हेंबर रोजी राज्यभरात ही धडक मोहीम राबवली. मुंबईतील २८ आस्थापनांचे •➤पान ५ वर

अन्नसुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

एफडीएच्या कारवाईत झेप्टो, ब्लिंकिट, बिर्याणी बाय किलो, टॉसिन पिझ्झा आणि जम्बो बर्गर यांसारख्या खाद्य व्यवसायांचा समावेश आहे. मुंबईतील २८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले. नामांकित ब्रॅण्ड्सवर झालेल्या या कारवाईमुळे ऑनलाइन खाद्यपदार्थ आणि झटपट वितरण सेवांच्या अन्नसुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शरद पवारांना रुग्णालयातून डिस्चार्ज

। मुंबई । प्रतिनिधी ।

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयातून शनिवारी डिस्चार्ज देण्यात आला. दोन दिवसांच्या उपचारानंतर त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. डिस्चार्ज मिळाल्यानंतर पवार थेट त्यांच्या सिल्व्हर ओक येथील निवासस्थानी रवाना झाले.



खोकला आणि कफाचा त्रास जाणवू लागल्याने २ नोव्हेंबर रोजी त्यांना पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर पुढील उपचारांसाठी त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात हलविण्यात आले. येथे दोन दिवस उपचार आणि विश्रांती घेतल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले. खासदार सुप्रिया सुळे यांनीही पवारांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले. गुरुवारपासून विविध राजकीय नेत्यांनी रुग्णालयात जाऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती.







निवडक

आरोग्य विभागामार्फत धूर फवारणी

नवीन पनवेल : कळंबोली परिसरातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये वाढत्या डासांच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनू नये, यासाठी बायजा बारगजे यांच्या मागणीनुसार पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत विशेष डीप स्प्रेइंग व धूर फवारणी मोहिम राबविण्यात आली. प्रभागातील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे तसेच डासांमुळे होणाऱ्या विविध आजारांचा प्रादुर्भाव रोखता यावा, या उद्देशाने ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली. वाढते डासांचे प्रमाण लक्षात घेऊन सेक्टर ४,५,८ परिसरातील बंदिस्त गटारे व नाल्यांवरील झाकणे काढून त्यामध्ये साचलेल्या पाण्याची तपासणी करण्यात आली. साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आवश्यक कीटकनाशक औषधांची फवारणी करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी परिसरात धूर फवारणी (फॉगिंग) करून डासांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आली. मोहीम आरोग्य निरीक्षक संजय जाधव, अरुण कांबळे, दीपक म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

'कळंबोली सर्कलला दत्तूशेठ यांचे नाव द्या'

नवीन पनवेल : कळंबोली सर्कलला माजी आ. स्वर्गीय दत्तूशेठ पाटील यांचे नाव देण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा सहचिटणीस बबन विश्वकर्मा यांनी पनवेल महानगरपालिकेच्या आयुक्त यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. पनवेल-उरण विधानसभेचे सलग तीन वेळा आमदार झालेले आणि पनवेलचा विकासामध्ये औद्योगिक क्षेत्रात माजी आ. दत्तूशेठ पाटील यांनी योगदान दिले आहे. स्थानिक भूमिपुत्रांसाठी आयुष्यभर लढा देणारे माजी आ.दत्तूशेठ पाटील यांनी दिबा पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून देशातील शेतकऱ्यांसाठी साडेबारा टक्के कायदा अमलात आणण्यासाठी आणि स्त्रीभ्रूण हत्या कायदा बंदी लागू करण्यासाठी अमुलाग्र बदल घडवण्यासाठी तुरुंगवास भोगला. त्यामुळे माजी आ. दत्तूशेठ पाटील यांचे नाव कळंबोली सर्कलला द्यावे अशी विनंती विश्वकर्मा यांनी केली आहे.

लक्ष्मीपूजनाच्या खरेदीसाठी बाजारपेठेत झुंबड



खांदा कॉलनी : दीपावली सणाचा उत्साह आता शिगेला पोहोचला असून,लक्ष्मीपूजनाच्या पार्श्वभूमीवर पनवेलच्या भाजी मार्केटसह बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली आहे. लक्ष्मीपूजनाची तयारी करण्यासाठी सकाळपासूनच बाजारपेठेत लगबग पाहायला मिळत आहे. लक्ष्मीपूजनासाठी आवश्यक असलेल्या लक्ष्मीच्या आकर्षक मूर्ती खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल दिसून येत आहे. त्याचबरोबर पूजेसाठी लागणाऱ्या कमळाच्या फुलांना विशेष मागणी आहे. बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर कमळाची फुले विक्रीसाठी दाखल झाली आहेत. झेंडूच्या फुलांच्या माळा, विविध रंगांची ताजी फुले, गुलाब, शेवंती तसेच सुगंधी गजरे खरेदी करण्यासाठी महिला वर्गाची विशेष गर्दी पाहायला मिळत आहे. पूजेच्या ताटासाठी लागणारे साहित्य, फळे, नारळ आणि इतर पूजासाहित्य खरेदी करण्यासाठीही नागरिकांची लगबग सुरू आहे.

सुकेळीत ट्रेलरला अपघात



सुकेळी : मुंबई-गोवा महामार्गावर नागोठणे जवळच असलेल्या सुकेळी येथिल जिंदल रुग्णालयाच्या समोरच एका गाईला वाचविण्यामध्ये ट्रेलरला अपघात झाला. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु काही वेळ महामार्गावरुन सुकेळी बाजुकडुन नागोठण्याकडे जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. उपलब्ध माहितीनुसार सुकेळी बाजुकडुन मुंबईकडे जाणारा ट्रेलर क्रं. एम. एच. ४६ बी. एम. ९९१८ महामार्गावर जिंदल रुग्णालयाच्या समोर आला असतांना समोरच आलेल्या एका गाईला वाचवण्याच्या गडबडीत ट्रेलरला भीषण अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. तात्काळ वाकण टॅबच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन ट्रेलर हायड्राच्या सहाय्याने बाजुला करुन वाहतूकीसाठी रस्ता मोकळा करण्यात आला.

वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

पनवेल : मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर कोन गावाजवळ अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एका अनोळखी पादचाऱ्याचा मृत्यू झाला. पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर हा अपघात घडला. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून, त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. एक्स्प्रेस वेवरील किलोमीटर ९.२०० येथे डाव्या बाजूच्या लेनवरून पायी जाणाऱ्या इसमाला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या इसमाचा मृत्यू झाला. याप्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत व्यक्तीचा रंग गोरा, बांधा मध्यम आणि चेहरा उभट आहे. अपघाताच्या वेळी त्याने काळी पँट आणि काळा शर्ट परिधान केला होता. मृताची ओळख पटविण्यासाठी पनवेल तालुका पोलीस नातेवाइकांचा शोध घेत आहेत. या व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित काकडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

द्वारकाधीश मंदिरात दीपोत्सव साजरा

रसायनी : रसायनी-पाताळगंगा परिसरातील आपटा फाटा येथील श्री द्वारकाधीश मंदिरात शनिवारी (दि.७) नोव्हेंबर रोजी दिपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. दीपावलीनिमित्त मंदिरात तसेच मंदिर परिसरात सर्वत्र पणत्या प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी गोवत्सधेनू पूजन करण्यात आले.

दिवाळीतही खारघरवासियांचे नळ कोरडे

■ सिडकोच्या पाणी नियोजनाचे धिंडवडे ■ बाटलीबंद पाण्यावर नागरिकांची गुजराण

| पनवेल | प्रतिनिधी |

एकीकडे दिवाळीचा जल्लोष सुरू असताना दुसरीकडे खारघरमधील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. २४ तास पाणीपुरवठ्याच्या गोड आश्वासनावर घरे खरेदी करणाऱ्या रहिवाशांच्या नळाला मात्र काही मिनिटेच पाणी येत असल्याने सिडकोच्या पाणीपुरवठा नियोजनाचा बोजवारा उडाला आहे. सणासुदीच्या दिवसांतही टँकर मागवून आणि पिण्याचे पाणी विकत घेऊन दिवस काढावे लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



खारघरमधील बागेश्री सोसायटीसह अनेक गृहसंकुलांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पाणीटंचाईची समस्या कायम आहे. गणेशोत्सव, दसरा आणि आता दिवाळीही पाण्याच्या प्रतीक्षेत गेल्याने सिडकोच्या कारभाराविरोधात रहिवाशांचा रोष वाढला आहे. दिवाळीच्या साफसफाईपासून फराळाची तयारी आणि दैनंदिन वापरासाठीही पाणी उपलब्ध होत नसल्याने विशेषतः महिलांचे हाल होत आहेत.

बागेश्री सोसायटीतील रहिवासी निर्मला परमार यांनी सिडकोच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आठवड्यातील सोमवार तसेच शुक्रवार ते रविवार पाणीपुरवठा होत नसल्याचा, तर मंगळवार आणि बुधवारीही अवघ्या काही मिनिटांसाठी पाणी मिळत असल्याचा त्यांचा आरोप आहे. २४ तास पाणी मिळेल, या विश्वासावर घरे घेतली; मग प्रत्यक्षात पाण्यासाठी टँकरवर अवलंबून का राहावे लागते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आंदोलन केल्यानंतर काही दिवस पाणीपुरवठा सुरळीत होतो आणि पुन्हा परिस्थिती जैसे थे होते, असा अनुभवही त्यांनी मांडला. सिडकोने पाणीपुरवठा करता येत नसेल तर नागरिकांचे पैसे परत करून घरे परत घ्यावीत, अशी संतप्त मागणी त्यांनी केली.

बागेश्री सोसायटीत तब्बल २३ इमारती असून दहा हजारांहून अधिक नागरिक वास्तव्यास आहेत. या सोसायटीला दररोज सुमारे १४.५० लाख लीटर पाण्याची आवश्यकता असताना मागणीच्या निम्म्याहूनही कमी पाणी मिळत असल्याचा दावा रहिवासी गजेंद्र रसाळ यांनी केला आहे. पिण्यासाठी बाटलीबंद पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. सिडकोच्या अखत्यारीतील इमारतींमध्ये पाणीटंचाई असताना खासगी इमारतींना नियमित पाणीपुरवठा कसा होतो, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्याचबरोबर टँकर लॉबीच्या भूमिकेबाबतही त्यांनी संशय व्यक्त केला आहे.

दिवाळीसारख्या मोठ्या सणातही पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर नियोजनाचा नेमका उपयोग काय, असा संतप्त सवाल खारघरकरांकडून उपस्थित केला जात आहे. सिडकोने या समस्येची तातडीने दखल घेऊन नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा सुरू करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

नागरिकांना टँकरच्या दारात उभे

खारघरचा झपाट्याने वाढणारा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन सिडकोने सक्षम पाणीपुरवठा व्यवस्था उभारणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात नागरिकांना टँकरच्या दारात उभे राहावे लागत आहे.

मुरूडमध्ये बीएसएनएलची सेवा ठप्प

ऑनलाइन कामांचा खोळंबा

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड शहरासह पंचक्रोशी परिसरातील बीएसएनएल मोबाईल ग्राहकांना गेल्या काही दिवसांपासून नेटवर्कच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. शुक्रवार (दि.६) नोव्हेंबरपासून बीएसएनएलचे मोबाईल टॉवर बंद पडल्याने अनेक ग्राहकांची मोबाईल सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली असून, ऑनलाइन कामे ठप्प झाली आहेत.



मुरूड शहर आणि परिसरात बीएसएनएलचे अनेक ग्राहक आहेत. मात्र, मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्याने नागरिकांना एकमेकांशी संपर्क साधणेही कठीण झाले आहे. विशेषतः ऑनलाइन व्यवहार, शासकीय कामे, बँकिंग सेवा तसेच विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन कामांवर याचा परिणाम होत आहे.

तरुण वर्गासह सर्वसामान्य नागरिकांना नेटवर्कअभावी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, मुरूड शहरातील हरिजन वाडा येथे बीएसएनएलचे कार्यालय असून, हे कार्यालय अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे नेटवर्क बंद पडल्याची तक्रार नेमकी कुठे आणि कोणाकडे करायची, असा प्रश्न ग्राहकांसमोर निर्माण झाला आहे.

'नेटवर्क येते का, रेंज मिळते का?' अशी विचारणा करत ग्राहक अक्षरशः हैराण झाले आहेत. बीएसएनएल प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन बंद पडलेले मोबाईल टॉवर सुरू करावेत आणि मुरूड शहरासह पंचक्रोशीतील मोबाईल सेवा पूर्ववत करावी, अशी मागणी संतप्त ग्राहकांकडून होत आहे.

चांभार्लीत रांगोळी मॅटचे प्रशिक्षण

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

मानदेशी फाउंडेशनतर्फे चांभार्ली गावामध्ये महिलांसाठी विशेष 'रांगोळी मॅट प्रशिक्षण' शिबिराचे आयोजन करण्यात आले.या प्रशिक्षणात गावातील ६० महिलांनी सहभाग नोंदवून आपल्या सुप्त कलागुणांना उभारी देण्यात आली. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले. प्रशिक्षण कालावधीत महिलांनी विविध प्रकारच्या आकर्षक रांगोळी मॅट्स तयार करण्याचे तंत्र आत्मसात केले. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी नेहा पारंगे, शामल जांभळे, प्रियंका जांभळे, प्राची जांभळे, सुप्रिया गायकर, अस्मिता गडगे, माणदेशी फाऊंडेशन प्रशिक्षक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नोव्हेंबर आला तरी थंडी गायब

| तळा | प्रतिनिधी |

नोव्हेंबर महिना सुरू होऊन सहा दिवस उलटले, तरी थंडीचा पत्ताच नाही. दरवर्षी दिवाळीनंतर सकाळी गारवा जाणवायचा, स्वेटर आणि शाली बाहेर निघायच्या, पण यंदा मात्र उलट चित्र आहे. तळा तालुक्यासह संपूर्ण कोकणात दिवसा उन्हाचा चटका आणि रात्रीही उकाडा जाणवत असून नागरिक थंडीसाठी आस लावून बसले आहेत.



हवामान विभागाच्या आकडेवारीनेच यंदा थंडीचा दुष्काळ असल्याचे स्पष्ट झाले आहे. ५ नोव्हेंबर रोजी तळा येथे किमान तापमान २७.९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे सरासरीपेक्षा तब्बल ५.३ अंशांनी जास्त आहे. तर कमाल तापमान ३५ अंशांवर गेले आहे.भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार नोव्हेंबरमध्ये महाराष्ट्रात दिवसाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. यामागे एल निनोचा प्रभाव असल्याचे हवामान तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे यंदा थंडी उशिरा आणि कमीच जाणवणार, अशी चिन्हे आहेत. शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना थंडीची वाट पाहावी लागणार आहे. सध्या तरी तळेकरांना पंखे आणि थंड पाण्याचाच आधार घ्यावा लागत आहे.

शिलाई मशिनचे वाटप

नवीन पनवेल : कुष्ठरोग निवारण समिती संचालित बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र, शांतिवनमध्ये ७ शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कुष्ठरोग निवारण समितीच्या स्विकृत सदस्या फाल्गुनी मेहता या उपस्थित होत्या. या भगिनी शिलाई मशिनव्दारे शिवणकाम करतील त्यापासुन त्यांना आर्थिक प्राप्ती होऊ शकेल. आजपर्यंत इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे नॉर्थ आयलँड १४ शिलाई मशिन, इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊन ३ शिलाई मशिन, इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खार ५ शिलाई मशिन, झोनटा क्लब ऑफ बॉम्बे- ५ शिलाई मशिन, साधु वासवानी मिशन ३ शिलाई मशिन, फ्रेनी पाघडिवाला ट्रस्ट ५ शिलाई मशिन असे एकुण ३५ शिलाई मशिन बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्रच्या प्रकल्पक्षेत्रातील शांतिवनातील महिलाना वाटप करण्यात आल्या.

पैसे दुप्पट करण्याचे आमिषाने गंडा

चार गुंतवणूकदारांची फसवणूक

| उरण | प्रतिनिधी |

अल्पावधीत गुंतवणुकीची रक्कम दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून चार गुंतवणूकदारांची तब्बल ७२ लाख ९८ हजार रुपयांची कथित फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार पनवेलमध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणात उरण तालुक्यातील जेएनपीटी टाऊनशिप, पिरकोन आणि करंजा परिसरातील रहिवाशांनी तक्रार दाखल केली असून, कोप्रोली येथे राहणाऱ्या ३२ वर्षीय महिलेविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महिनाभरात रक्कम दुप्पट होण्याच्या आशेने गुंतवणूक केलेल्या नागरिकांना अखेर आर्थिक फटका बसल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, संबंधित महिलेने पनवेल येथील ओरियन मॉलमध्ये पहिल्या गुंतवणूकदाराची भेट घेऊन अवघ्या महिनाभरात गुंतवलेली रक्कम दुप्पट करून देण्याचे आश्वासन दिले होते. विशेष म्हणजे, गुंतवलेली मूळ रक्कमही सुरक्षित राहील, असा विश्वास तिने दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या आश्वासनावर विश्वास ठेवून उरण तालुक्यातील कोंढरीपाडा (करंजा) येथील ३१ वर्षीय व्यक्तीने ८ सप्टेंबर रोजी चार लाख रुपये, तर ९ सप्टेंबर रोजी आणखी ९८ हजार रुपये गुंतवले होते. त्यानंतर आणखी तीन व्यक्तींनीही या योजनेत लाखो रुपयांची गुंतवणूक केली. अशा प्रकारे चार गुंतवणूकदारांकडून एकूण ७२ लाख ९८ हजार रुपये स्वीकारण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

रसायनीत मीटर बदलण्याच्या मोहिमेला विरोध

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी-पाताळगंगा परिसरात महावितरणकडून वीज मीटर बदलण्याची मोहीम राबविण्यात येत असून, या मोहिमेवरून वीज ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः चांगल्या स्थितीत असलेले आणि व्यवस्थित वीज वापराची नोंद करणारे मीटर बदलण्याचा आग्रह धरला जात असल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून करण्यात येत आहेत. या प्रकाराला सामाजिक कार्यकर्ते राकेश खराडे यांनी विरोध दर्शविला आहे.



महावितरणने मीटर बदलण्याची मोहीम राबविण्यामागील नेमके कारण, त्याची तांत्रिक आवश्यकता, नवीन मीटरचे स्वरूप आणि ग्राहकांना होणारे फायदे याबाबत स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे. ग्राहकांना विश्वासात न घेता मीटर बदलण्याचा आग्रह धरणे योग्य नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.

ग्राहकांनी मीटर बदलण्याबाबत प्रश्न विचारल्यास किंवा त्यामागील कारणांचे स्पष्टीकरण मागितल्यास त्यांना समाधानकारक उत्तर देणे अपेक्षित आहे. मात्र, काही कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांशी बोलताना अरेरावीची व अपमानास्पद भाषा वापरली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अशा प्रकारांमुळे महावितरणबाबत नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

Rashtriya Aarogya Nyaya Sanshodhan Sanstha's
Raigad Institute of Nursing Education Murud
A/p- Murud Tal-Murud Dist-Raigad, Maharashtra-402401
Admission Notification 2026-2027

Application invited from eligible MH B.Sc. Nursing CET Registered Candidates for filling up for Admission to B.Sc. Nursing, Under Institute level Round/Residual Quota.

Tentative Schedule for Institute Level Round 2 for Admission to B.Sc. Nursing Course in Private College A.Y 2026-2027The above schedule is subject to change as per the

1	Publication of Seat Matrix for Institutional Level Round and Provisional List of Eligible candidates for Institutional Level round	7/11/2026
2	The eligible desirous candidate must apply in person/any person to respective college in prescribe format.	8/11/2026 to 10/11/2026 Up to 05.30 pm
3	Publication of General Merit List and Quota Wise Merit list, Selection List-1 and Wait List separately at notice board and the web site of respective Colleges.	10/11/2026 By 06.30 PM
4	Physical Joining and Filling Status Retention of candidates from Selection List-1 dated 10/11/2026 by submitting all original Documents & payment of Requisite Fees by DD/ Cheque.	11/11/2026 to 12/11/2026 Up to 05.30 PM
5	Publication of Selection List-2 and quota wise wait list separately on the Notice board and the website of the college	12/11/2026 by 06.30 pm
6	Physical Joining and Filling Status Retention of candidates from Selection List-1 dated 12/11/2026 by submitting all original Documents & payment of Requisite Fees by DD/ Cheque.	13/11/2026 to 14/11/2026 by 05.30 pm
7	Publication of Residual vacancy at notice board and the web site of respective college.	14/11/2026 by 06.30 pm
8	Reporting of eligible candidates with Original Documents and Requisite Fees to college for Residual Vacancy. (The candidates from wait list as well general list published by CET CELL can report)	15/11/2026 Up to 2PM
9	Filling of Residual Vacancy from reported eligible candidates from list published on the website on the basis of merit.	15/11/2026 03.00 pm onwards
10	Reporting of admitted candidates in College Feedback Module	15/11/2026
11	Cut-off date of admission for B.Sc. Nursing Course for Academic Year 2026-27 as per Indian Nursing Council	15/11/2026

The above schedule is subject to change as per the Instructions of Hon'ble Court/ INC/ Central Govt/ State Govt as the case may be.

For Eligibility criteria and more details visit. www.mahacet.org and 2026 Brochure
Contact- Mobile-8830869202/9819071198/9270209520/9545989836
E-Mail-raigadine@gmail.com

Mr. Tushar Divekar
Administrative Officer.

Dr. Sudha Devi Sadanand
Principal/Academic Director

स्मार्ट मीटर,वाढीव पाणीपट्टी विरोधात रोहा काँग्रेस आक्रमक

| रोहा | प्रतिनिधी |

बस हो गई महागाई की मार, अब की बार मोदी सरकार असे खोटे आश्वासन देऊन सर्व सामान्य नागरिकांची दिशाभूल करणाऱ्या मोदी सरकारच्या काळात महागाई गगनाला भिडली आहे. या वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे. झोपण्याचा सोंग घेणाऱ्या शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेला न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी रोहा काँग्रेस पक्षाने आक्रमक भूमिका घेत निवेदनद्वारे संबधित प्रशासनाला जागे केले आहे.



स्मार्ट मीटर वीज वितरण कंपनी कडून सक्तीने बसवू नये. बहूमताच्या जोरावर नगर पालिकेने सर्वसामान्य जनतेवर लादलेली अव्वाच्या सव्वा पाणीपट्टी तातडीने रद्द करावी तसेच दुष्काळ आणि अवकाळी पावसामुळे शेती उध्वस्त झाल्याने शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी रोहा तालुका काँग्रेस (आय) पक्षाच्या वतीने करण्यात आली.

जिल्हा काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष राजा ठाकूर यांच्या आदेशानुसार व जिल्हा उपाध्यक्ष अशफाक पानसरे, सुनील देशमुख, रामप्रकाश कुशवाह यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी(दि.५) रोजी सायंकाळी तालुका काँग्रेस पक्षाच्या शिष्ट मंडळाने रोहा प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार डॉ. किशोर देशमुख, रोहा नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्यावतीने श्रीनिवास पाटील, तसेच महावितरणचे उप अभियंता जतीन पाटील यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी रोहे शहरातील महावितरणचे वीजबिल भरणा केंद्र आणि तक्रार निवारण केंद्र नागरिकांच्या सोयीसाठी तळमजल्यावर स्थलांतरित करावे अशा महत्त्वपूर्ण मागणी करण्यात आली.

याप्रसंगी अशपाक पानसरे, सुनील देशमुख, रामप्रकाश कुशवाहा, बशीर भूरे, अकील लंबाते, शब्बीर पानसरे, अशोक कांबळे, हरिओम टाळकुटे, खुर्शीद अधिकारी, महेश देशमुख, इक्बाल पानसरे, नवेद चोगले यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | रविवार | दि. ८ नोव्हेंबर २०२६ | अंक १५३ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in



वे|घ|क

कामोठ्यात एकाला शिवीगाळ करुन धमकी

पनवेल : शिवसेना उबाठा गटात प्रवेश का केला, आरपीआयमध्ये का गेला नाहीस, असा सवाल करत फोनवरून अश्लील व जातीवाचक शिवीगाळ करून धमकी दिल्याचा प्रकार कामोठ्यात उघडकीस आला आहे. याप्रकरणी उबाठा गटाचे कार्यकर्ते ऋषिकेश कांबळे यांच्या तक्रारीवरून कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिवाळीनिमित्त कांबळे यांनी पक्षाच्या समर्थनार्थ बॅनर लावला होता. त्यावरून त्यांना फोन करून शिवीगाळ व धमकी दिल्याचा आरोप आहे. तक्रारीत अमित जाधव आणि रोहित घाडगे यांची नावे समोर आली आहेत. घटनेनंतर जिल्हाप्रमुख दीपक निकम, ॲड. समाधान काशीद यांच्यासह उबाठा पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

राहुल गांधींचा केंद्रावर हल्लाबोल

मुंबई : पेट्रोलमध्ये निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक इथेनॉल मिसळल्याच्या आरोपावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. ई २० आता ४२० झाले असून, लोकांच्या वाहनांमधून पेट्रोलची चोरी होत आहे, अशी टीका त्यांनी सोशल मीडियावर केली. कर्नाटक सरकारने सात जिल्ह्यांतून पेट्रोलचे १४ नमुने तपासणीसाठी घेतले होते. त्यापैकी ११ नमुन्यांमध्ये इथेनॉलचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा अधिक आढळले. इंडियन ऑइलच्या एका नमुन्यात ३१.२ टक्के, तर हिंदुस्तान पेट्रोलियम च्या नमुन्यात ३०.५ टक्के इथेनॉल आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियमने चाचणीच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

टेक महिंद्राच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची हत्या

नवी दिल्ली : पार्किंगची जागा आणि पाळीव कुत्र्याच्या विष्ठेवरून सुरू झालेला किरकोळ वाद अखेर हत्येपर्यंत पोहोचला. शेजाऱ्याने परवानाधारक पिस्तुलातून तब्बल १५ गोळ्या झाडून टेक महिंद्राचे आशिया विभागप्रमुख परमजीत धनखड यांची हत्या केली. हरियाणातील फरिदाबाद येथे शुक्रवारी रात्री ही घटना घडली. धनखड आणि आरोपी मोनू शर्मा एकाच इमारतीत राहत होते. पार्किंगच्या जागेवरून दोघांच्या कुटुंबांत वारंवार वाद होत होते. शुक्रवारी रात्री धनखड जिममधून घरी परतले असता त्यांच्या पार्किंगमध्ये शेजाऱ्याची गाडी उभी असल्याचे दिसले. गाडी हटवण्यावरून झालेल्या वादातून आरोपीने गोळीबार केला. यात नऊ गोळ्या लागल्याने धनखड यांचा जागीच मृत्यू झाला.

७२ बालगृहांची मान्यता रद्द

मुंबई : राज्य सरकारने स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या ७२ बालगृहांची मान्यता रद्द केली आहे. यामध्ये रायगडसह मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, नागपूर, नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आदी १८ जिल्ह्यांतील बालगृहांचा समावेश आहे. बालगृहांना सरकारकडून पाच वर्षांसाठी मान्यता दिली जाते. मुदत संपल्यानंतर संबंधित संस्थांनी नूतनीकरणासाठी अर्ज करणे आवश्यक असते. मात्र, अर्ज प्राप्त न झाल्याने शासनाने मान्यता रद्द करण्याचा आदेश काढला. नागपुरातील तीन बालगृहांचा यात समावेश असून ही तिन्ही बालगृहे सुमारे दोन वर्षांपूर्वीच बंद झाली होती. दरम्यान, सध्या नागपूर शहरात सात बालगृहे आणि चार शिशुगृहे सुरू आहेत.

झाडे तोडणाऱ्यांना सोडणार नाही!

सयाजी शिंदेंचा साय डोंगरातून राज्य सरकारला जोरदार इशारा

'टोरंटच्या गाड्या अडवा, लाखो लोकांनी आंदोलनात उतरा'

। नेरळ/कर्जत । प्रतिनिधी ।

आमदार-खासदारांच्या निधनानंतर शोकसभा घेतली जाते; मग आपल्याला जगण्यासाठी ऑक्सिजन देणाऱ्या झाडांची कत्तल होत असताना त्यांची शोकसभा का होऊ नये? जंगल तोडून कसला विकास साधणार? महाराष्ट्राच्या बापजन्मात असे प्रकल्प आम्हाला नकोत. झाडे तोडणाऱ्यांना सोडणार नाही, आणखी झाडे तोडू देणार नाही, असा इशारा देऊन अभिनेते आणि पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदे यांनी टोरंट पॉवरच्या प्रस्तावित प्रकल्पाविरोधात रणशिंग फुंकले.

कर्जत तालुक्यातील साय डोंगरात तोडलेल्या वृक्षांची शनिवार, दि. ७ रोजी शोकसभा घेत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. टोरंट कंपनीच्या गाड्या अडवा, लाखो लोकांनी या आंदोलनात उतरले पाहिजे, असे आवाहन करतानाच ग्रामस्थांना जमिनी न विकण्याचा आणि एकजूट कायम ठेवण्याचा निर्धारही त्यांनी दिला.

टोरंट पॉवरच्या प्रस्तावित पंप स्टोरेज विद्युत प्रकल्पासाठी पाली तर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत हद्दीतील साय डोंगर परिसरात सुरू असलेल्या वृक्षतोडीने पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून स्थानिक ग्रामस्थ, पर्यावरणप्रेमी आणि विविध संघटना या •➤पान ५ वर



सरकारच्या पर्यावरण धोरणावरही सवाल

सरकारने कोट्यवधी झाडे लावल्याचे सांगितले जाते; मात्र ती झाडे नेमकी आहेत कुठे? एका बाजूला वृक्षारोपणाच्या घोषणा करायच्या आणि दुसऱ्या बाजूला शेकडो एकर जंगल उद्ध्वस्त करायचे, हा कोणता पर्यावरणपूरक विकास? पर्यावरणमंत्र्यांनी यावर भूमिका स्पष्ट करावी. मंत्र्यांना त्यांच्या खात्याचे तांत्रिक ज्ञान कितपत आहे, याचाही विचार व्हायला हवा, अशी टीका त्यांनी केली. चितळे समितीने कोकणात पाणी अडवणाऱ्या धरणांबाबत मांडलेल्या शिफारशी आणि पश्चिम घाटाबाबतच्या गाडगीळ समितीच्या अहवालाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. यंदा झाडे तोडून दिवाळी साजरी करायची नाही, होळीही करू नका, असे आवाहन करत त्यांनी सर्व कलाकारांनाही या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले.

जमिनी विकू नका, एकजूट ठेवा!

साय डोंगरातील शिवमंदिरात ग्रामस्थांशी संवाद साधताना सयाजी शिंदे यांनी स्वतःच्या प्रकल्पग्रस्तपणाचा अनुभव सांगितला. सुमारे ४० वर्षांपूर्वी धरणासाठी आमची जमीन घेण्यात आली. त्यानंतर ३० वर्षे पर्यायी जमिनीच्या प्रतीक्षेत राहावे लागले. कागदावर जमीन दिली; मात्र प्रत्यक्षात आजही ती मिळालेली नाही. त्यामुळे थोड्याशा मोबदल्यासाठी आपल्या जीवाचा तुकडा देऊ नका. आज तुम्हाला २० लाख रुपये मिळतील; पण तुमच्या जमिनींची किंमत भविष्यात कोट्यवधी रुपये असू शकते. जमीन ही आपली आई आहे, आपण आपल्याच आईला विकणार का? असा सवाल त्यांनी केला. आम्ही धरणासाठी जमीन देऊन होरपळलो आहोत. तोच अनुभव तुम्हाला येऊ नये, म्हणून सावध करायला आलो आहे. तुम्ही जमिनी देऊ नका, एकत्र राहा, बाकी हा प्रकल्प येथून कसा हद्दपार करायचा ते आम्ही पाहतो. मी तुमच्या सोबत आहे, असा विश्वास त्यांनी ग्रामस्थांना दिला. लाखो लोकांनी या लढ्यात सहभागी व्हावे, टोरंट कंपनीच्या गाड्या अडवाव्यात आणि आणखी झाडे तोडली जाणार नाहीत यासाठी एकजूट दाखवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

बोर्डाच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

बारावीची ६, तर दहावीची १५ फेब्रुवारीपासून परीक्षा

। पुणे । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिकशिक्षणमंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ६ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते १५ मार्च या दरम्यान होणार आहे. विषयनिहायर सविस्तर वेळापत्रक ६ डिसेंबरपासून राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी या बाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. राज्य मंडळाने वेळापत्रक जाहीर केल्यामुळे शिक्षकांना अध्यापनाचे नियोजन, विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करणे शक्य होणार आहे.

राज्य मंडळाने प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार, बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत, तर दहावीच्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन २८ जानेवारी ते •➤पान ५ वर



कष्टकऱ्यांची दिवाळी अंधारात

■ दोन महिन्यांचे वेतन, बोनस थकीत ■ ठेकेदार मालामाल

। उरण । प्रतिनिधी ।

जनतेला पाणीपुरवठा आणि स्वच्छतेच्या सुविधा देण्यासाठी अहोरात्र राबणाऱ्या कामगारांच्याच घरात दिवाळीला अंधार पसरला आहे. उरण नगरपरिषदेत गेल्या २० वर्षांपासून सेवा देणाऱ्या दहा कामगारांचे दोन महिन्यांचे वेतन आणि दोन वर्षांचा बोनस थकीत असल्याने त्यांनी अखेर कामबंद आंदोलन सुरू केले आहे. कामगारांच्या घामावर ठेकेदार मालामाल होत असताना त्यांच्या हक्काचा मोबदला मात्र रोखला जात असल्याचा आरोप होत आहे.



उरण शहरातील पाणी पुरवठ्यासाठी चार, तर सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेसाठी सहा कामगार कार्यरत आहेत. हजारो नागरिकांना पाणी आणि स्वच्छतेच्या सुविधा मिळाव्यात म्हणून हे कामगार नियमित सेवा बजावत आहेत. •➤पान ५ वर

कामगारांच्या थकीत रकमेचा प्रश्न ऐरणीवर

■ १७५ पैकी ७३ कामगारांचा मृत्यू ■ २५ वर्षांपासून कामगारांना न्यायाची प्रतीक्षा

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड कंपनीतील कामगारांच्या थकीत देणी आणि भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. कंपनीतील सुमारे १७५ कामगारांपैकी ७३ कामगारांचा मृत्यू झाला असून, त्यांच्या कुटुंबियांनाही अद्याप न्याय मिळालेला नसल्याचा आरोप ट्रान्सपॉवर कामगार संघटनेने केला आहे. या प्रकरणात लक्ष घालून कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष शांताराम हरी भोईर यांनी कामगारमंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात १७ जून २०२६ रोजी कामगारमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे. कंपनीच्या कामगारांच्या प्रश्नांवर यापूर्वी कामगार आयुक्त कार्यालयात अनेक बैठका झाल्या. मात्र, बैठकीतील निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. कामगार आयुक्तांकडून बैठकीचे इतिवृत्त पाठविण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात कामगारांच्या समस्यांवर ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पदपथावर सरकारी निरोधचा खच

■ कळंबोलीच्या स्टील मार्केटमध्ये पाकिटे उघड्यावर

■ आरोग्य विभागाच्या वितरण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

सरकारी आरोग्य यंत्रणेकडून नागरिकांना मोफत वितरित करण्यात येणारी निरोधची पाकिटे चक्क कळंबोलीतील स्टील मार्केटच्या पदपथावर उघड्यावर आढळल्याने खळबळ उडाली आहे. पाकिटांवर 'गव्हर्नमेंट' असा स्पष्ट उल्लेख असताना हे शासकीय साहित्य रस्त्यावर कसे पोहोचले, त्याची विल्हेवाट लावण्याची ही पद्धत आहे की वितरण व्यवस्थेतील निष्काळजीपणा, असे सवाल उपस्थित होत असून, आरोग्य विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कळंबोली स्टील मार्केट परिसरात व्यापारी, कामगार आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते. अशा गजबजलेल्या परिसरातील पदपथावर गर्भनिरोधक निरोधची भरलेली पाकिटे मोठ्या प्रमाणात पडलेली दिसून आली. विशेष म्हणजे, ही पाकिटे शासनाच्या आरोग्य विभागामार्फत मोफत वितरित केली जात असल्याचे त्यावरील छपाईवरून स्पष्ट होत आहे. नागरिकांच्या •➤पान ५ वर





ठेकेदारांच्या भेटवस्तूंनी कार्यालये गजबजली?

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

एकीकडे श्रीवर्धन तालुक्यातील जनता भीषण पाणीटंचाईच्या संकटाशी झुंज देत आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर पिके करपण्याची वेळ आली आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला असून, दुष्काळी उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. अशा विदारक परिस्थितीत तालुक्यातील शासकीय कार्यालयांमध्ये ठेकेदारांकडून दिवाळी भेटवस्तूंची सरबराई सुरू असल्याची चर्चा रंगू लागल्याने श्रीवर्धनच्या प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दुष्काळाच्या झळांनी सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले असताना, शासकीय कार्यालयांमध्ये ठेकेदारांच्या वाहनांच्या फेऱ्या नेमक्या कशासाठी सुरू आहेत, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत असेल, शेतकऱ्यांना दुष्काळी मदतीसाठी



कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असतील, जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था करण्यासाठी प्रशासनाकडे अपेक्षेने पाहावे लागत असेल, तर अशावेळी प्रशासनाने जनतेच्या प्रश्नांना सर्वोच्च प्राधान्य देणे अपेक्षित आहे. परंतु, याच काळात ठेकेदारांच्या वाहनांच्या शासकीय कार्यालयांतील फेऱ्यांची चर्चा सुरू होणे ही बाब निश्चितच गंभीर आहे. जनतेच्या करातून चालणाऱ्या कार्यालयांमध्ये लोकहितापेक्षा ठेकेदारांच्या दिवाळी भेटवस्तूंना अधिक महत्त्व दिले जात आहे का? दुष्काळग्रस्तांच्या वेदनांपेक्षा या भेटवस्तूंचे आकर्षण मोठे ठरत आहे का? असे सवाल उपस्थित होऊ लागले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, एका ठेकेदाराचे वाहन तहसील कार्यालयाबाहेर दिवाळी भेटवस्तू देण्यासाठी तासनतास उभे असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. विशेष म्हणजे, संबंधित वाहन तालुक्यातील इतर शासकीय कार्यालयांमध्येही फेऱ्या मारताना दिसल्याची चर्चा आहे. या वाहनातून नेमके काय आणले होते? कोणाला भेटवस्तू देण्यात आल्या? त्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचल्या का? की हा केवळ गैरसमज आहे? या प्रश्नांची उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत. मात्र, या प्रकारामुळे नागरिकांच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने या चर्चेकडे दुर्लक्ष करू नये, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

ठेकेदार हे शासनाच्या विविध विकासकामांचे कंत्राटदार असतात. त्यांच्या कामांच्या गुणवत्तेवर, बिलांच्या मंजुरीवर, कामांच्या तपासणीवर आणि नियमपालनावर संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी असते. अशा परिस्थितीत संबंधित ठेकेदारांकडून अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना भेटवस्तू दिल्या गेल्या असतील किंवा स्वीकारल्या गेल्या असतील, तर हा केवळ दिवाळीच्या शुभेच्छांचा विषय राहत नाही. त्यातून प्रशासकीय निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. उद्या याच ठेकेदाराच्या कामात निकृष्ट दर्जा आढळला, कामात अनियमितता झाली किंवा एखाद्या नागरिकाने तक्रार दाखल केली, तर संबंधित अधिकारी कोणत्याही दबावाशिवाय आणि पूर्वग्रहाशिवाय चौकशी करतील का? भेटवस्तूंच्या देवाणघेवाणीमुळे प्रशासकीय निर्णयप्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता आहे का? याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे बोलले जात आहे.

नागरी सेवा नियमांना बगल

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांनी सचोटी, कर्तव्यनिष्ठा आणि निष्पक्षता राखणे अपेक्षित आहे. नियम १२ मध्ये भेटवस्तू स्वीकारण्यासंबंधी निर्बंध व तरतुदी आहेत. विशेषतः शासकीय कामांशी व्यावसायिक संबंध असलेल्या कंत्राटदारांकडून भेटवस्तू स्वीकारण्याच्या बाबतीत नियमांचे पालन अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे या प्रकरणात नेमके काय घडले, भेटवस्तूंचे स्वरूप काय होते आणि कोणत्या नियमांचे पालन करण्यात आले, याची अधिकृत तपासणी होणे गरजेचे आहे, अशी मागणी श्रीवर्धनमधील जनतेकडून होत आहे.

कठोर कारवाईची मागणी

श्रीवर्धन तालुक्यातील जनतेला सध्या भेटवस्तूंच्या चचपेक्षा पिण्याचे पाणी, शेतकऱ्यांना मदत, जनावरांना चारा आणि दुष्काळी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी अधिक महत्त्वाची आहे. त्यामुळे तहसीलदारांसह संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकाराची तातडीने दखल घ्यावी. संबंधित वाहनाच्या फेऱ्यांची, भेटवस्तूंच्या संभाव्य वितरणाची आणि त्यामागील उद्देशाची वस्तुनिष्ठ चौकशी करावी. नियमबाह्य कृत्य आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी जनतेकडून होत आहे.

निवडक

कॅम्ब्रिज विशेष फेस्टिव्ह ऑफर्स

अलिबाग : पुरुषांच्या फॅशनविश्वात गेल्या अनेक वर्षांपासून आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या कॅम्ब्रिज ब्रँडने ग्राहकांसाठी स्मार्ट कॅज्युअल्स कलेक्शनवर विशेष फेस्टिव्ह ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. केंब्रिजच्या शोरूममध्ये या स्मार्ट कॅज्युअल शर्ट्सची मोठी व्हरायटी उपलब्ध असून, त्यांची सुरुवातीची किंमत ९९९ रुपये आहे. विशेष म्हणजे मोठ्या आकारातील कपडेही उपलब्ध करून देण्यात आले आहे. खास दिवाळीसाठी सादर केलेल्या या कलेक्शनमध्ये आधुनिक फॅशन, आकर्षक डिझाइन्स आणि आरामदायी कपड्यांचा सुरेख संगम आहे. तसेच, दिवाळीनिमित्त केंब्रिजतर्फे ग्राहकांसाठी खरेदीवर आकर्षक भेटवस्तूंची योजनाही जाहीर करण्यात आली आहे. ४,९९९ रुपयांपासून खरेदी करणाऱ्या ग्राहकांना भेटवस्तू मिळणार असून, ५०० रुपयांपासून गिफ्ट व्हाउचर्सचाही लाभ घेता येणार आहे. त्यामुळे या कलेक्शनचा व ऑफरचा लाभ घेऊन दिवाळी खरेदीसाठी यावे, असे आवाहन केंब्रिजतर्फे करण्यात आले आहे.



४८ तासांत वीजपुरवठा सुरू

पेण : तालुक्यातील वाशी ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सरेभाग गावात कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने ग्रामस्थांना गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ग्रामस्थांची ही समस्या लक्षात घेऊन सरपंच संदेश ठाकूर यांनी पुढाकार घेत महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अवघ्या ४८ तासांत यश आले असून सरेभाग गावातील वीजपुरवठा नव्याने सुरू करण्यात आला आहे. तत्पूर्वी या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पेण प्रांत कार्यालयात प्रांताधिकारी प्रविण पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी महावितरणचे अधिकारी, उपअभियंता केतन थत्ते आणि वाशी शाखा अभियंता संदीप गायकवाड उपस्थित होते. बैठकीदरम्यान केतन थत्ते यांनी दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले होते. दिलेल्या आश्वासनानुसार वाशी शाखा अभियंता संदीप गायकवाड यांनी आपल्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने युद्धपातळीवर काम सुरू केले. सुमारे अडीच ते तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या सरेभाग गावापर्यंत नव्याने विद्युत तारांची जोडणी करण्यात आली, तसेच आवश्यक त्या ठिकाणी नवीन विद्युत खांब उभारण्यात आले. अवघ्या ४८ तासांत हे काम पूर्ण करून गावातील वीजपुरवठा सुरू करण्यात आला.



लायन्स क्लबतर्फे दिवाळी भेट

पाली : लायन्स क्लब कोपरखैरणे यांच्यावतीने उन्हेरे येथील रा.जि.प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मंगळवारी (दि.३) दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान लायन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट कोऑर्डिनेटर दीपक पाटील, अध्यक्ष जयदीप नाईक आणि विनायक नाईक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे व शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच, शाळेच्या ग्रंथालयासाठी लायन्स क्लबतर्फे दोन उत्कृष्ट पुस्तके भेट देण्यात आली. या अनोख्या उपक्रमामुळे आदिवासी भागातील बालगोपाळांचा दिवाळीचा आनंद अधिकच द्विगुणित झाला असून, त्यांची यंदाची दिवाळी खऱ्या अर्थाने प्रकाशमय आणि आनंददायी ठरणार आहे. यावेळी मुख्याध्यापक राम संकाये, उपशिक्षक पांडुरंग पारधी, तसेच कविता संकाये, स्वराली संकाये, संस्कृती संकाये आणि स्वयंपाकी गायत्री वरेकर उपस्थित होते.



आश्रमशाळांमध्ये आकाशकंदील कार्यशाळा

पाली/गोमाशी : ज्ञान प्रबोधिनी, शैक्षणिक उपक्रम संशोधिका यांच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या 'विकास मित्र प्रकल्पा'अंतर्गत कुलाबा जिल्हा शिक्षण मंडळाच्या चिवे, वावळोली आणि पडसरे येथील आश्रमशाळांमध्ये दिवाळीनिमित्त विविध सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दिवाळीचा सण विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि सर्जनशील व्हावा, तसेच त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने तीनही आश्रमशाळांमध्ये मातीच्या पणत्या आकर्षक पद्धतीने रंगविणे आणि आकाशकंदील तयार करणे याविषयी कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध रंगांचा आणि सजावटीच्या साहित्याचा वापर करून सुंदर पणत्या रंगविल्या. तसेच, स्वतःच्या कल्पकतेतून आकर्षक आकाशकंदील तयार केले. या उपक्रमात तीनही आश्रमशाळांमधील सुमारे ८५० विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. तसेच, दोन महिन्यांनी प्रकाशित होणारा 'सुबोध छात्र प्रबोधन' हा अंक विद्यार्थ्यांना नियमितपणे वितरित केला जातो.

यु.ई.एस. विद्यालयात दिवाळी उत्साहात

उरण : यु.ई.एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये नुकताच दिवाळी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संपूर्ण शाळेचा परिसर रंगीबेरंगी रोषणाईने सुंदर असा सजविण्यात आला होता, तर ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ज्युनिअर कॉलेजच्या विदयार्थ्यांनी व शिपायांनी पद्मदुर्ग किल्ल्याची सुंदर अशी प्रतिकृती तयार केली होती. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांनी सर्व उपस्थितांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. तसेच, दिवाळीचे कंदील आणि सुबक किल्ला तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना, विदयार्थ्यांना व शिपायांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर सर्वांना मिठाई व लहान विद्यार्थ्यांना फुल बाजाचे वाटप करण्यात आले.



गड किल्ले बनविण्याची लगबग

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

दिवाळी सणानिमित्ताने गड किल्ले बनविण्याची लगबग चिमुकल्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचीच सुरु झाली आहे. घरामध्ये एकीकडे फराळाचा सुवास दरवळत असताना दुसरीकडे घरासमोर वीटा, मातीचे गड किल्ले साकारण्यामध्ये बच्चे कंपनी मग्न झाली आहे. शौर्याचा, जाज्वल इतिहास आणि संस्कृतीचा वारसा जपणारी परंपरा असलेला सण म्हणून दिवाळीकडे पाहिले जाते. दिवाळीनिमित्त दुर्गप्रेमींसह वेगवेगळ्या संस्था, संघटनाच्यावतीने गड किल्ले तयार करण्याच्या स्पर्धेचा क्रेझ शहरी भागासह ग्रामीण भागात दिवसेंदिवस वाढत आहे. पुर्वी आवड म्हणून गड किल्ले बनविले जात होते. आता मात्र आजच्या पिढीपर्यंत गड किल्ल्यांचे महत्व पटवून देण्यासाठी या उपक्रमाला एक वेगळे स्वरुप प्राप्त झाले आहे.

यंदा ५ नोव्हेंबरपासून दिवाळीला सुरुवात सुरु झाली. वसूबारस नंतर धनत्रयोदशी, लक्ष्मीपुजन, बलिप्रतिपदा, भाऊबीज इत्यादी सण दिवाळीच्या आठ दिवसांच्या कालावधीत आहेत. दिवाळीनिमित्त शाळांदेखील सुट्टी पडली असून, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घरासमोर शिवकालीन गड किल्ले तयार करण्याची लगबग सुरु झाली आहे. विटा, सुकी माती, दगड, आणि विहिरीची किंवा झाडाखालची काळी-तांबडी माती गोळा करण्याचे काम गावागावात सुरु झाले आहे. तयार केलेल्या किल्ल्यावर ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, मावळे, हत्ती, घोडे, तोफा यांच्या छोट्या रेखीव मूर्ती (खेळणी)देखील बाजारात ठिकठिकाणी खरेदीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. रायगड, प्रतापगड, तोरणासारखे प्रसिद्ध किल्ल्यांचा अभ्यास करून तशाच प्रकारच्या प्रतिकृती बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. चिमुकल्यांचे हात मातीमध्ये रंगलेले असताना, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी घरातील मोठी मंडळी मदत करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. किल्ला तयार केल्यावर त्यावर तांबडी माती लावण्यापासून पणती दिवे लावून तयार किल्ले प्रकाशीत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

रोहा तालुक्यातील बळीराजा संकटात

। कोलाड । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यात सर्वत्र खरिपाच्या भात कापणीसह बांधणी, झाडणीसह मळणीच्या कामांना वेग आला आहे. परंतु, यंदा परतीचा पाऊस वेळेआधीच गायब झाल्याने आणि कडक ऊन पडू लागल्याने भाताचे पीक अक्षरशः धोक्यात आले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाल्याने आता बळीराजाचे संपूर्ण लक्ष उरल्यासुरल्या धानाच्या पिकाकडे आणि सरकारच्या धान हमी भावाकडे लागले आहेत.

खरीप हंगामातील सुरवातीच्या धान पेरणीला पाऊस लांबला. त्यानंतर जोरदार बरसला आणि पूरपरिस्थितीत अनेक शेतकऱ्यांचे



कमी पाऊसामुळे पीक धोक्यात

पेरणी केलेले धान वाहून गेले. त्याचे केलेले पंचनामे शासन दरबारी पटलावर असताना देखील त्यात पुन्हा दुबार पेरणी करत भाताची लागवड केली. दरम्यानच्या काळात मात्र पाऊस समाधानकारक झाल्याने हिरवीगार भातशेती डोळ्याने डोलू लागली. कणसे धरली मात्र, गणपतीनंतर पावसाने ऐन पिकांच्या गरजेच्या वेळी दगा दिला. पाऊस अचानक कमी झाल्याने आणि उष्णता वाढल्याने भाताची लोंबी सुकून गेल्या. दाणे भरण्यापूर्वीच पीक करपण्याच्या मार्गावर गेल्याने बळीराजावर धानाचा तोटा निर्माण झाला. त्यामुळे यंदा बळीराजा मोठा आर्थिक चिंतेत सापडला असल्याने याबाबत सरकार काही मार्ग काढणार का? याकडे बळीराजाचे लक्ष लागले आहे.

> **बळीराजाची यंदाची दिवाळी ही दुष्काळी दिवाळी असल्याचे धान पिकांवरुन दिसून येत आहे. पावसाने घात केल्याने पीक हातचं जाण्याची वेळ बळीराजावर येऊन ठेपली आहे. रात्रंदिवस कष्ट करून घाम गाळून जे काही हातात पडेल, त्याला तरी सरकारने योग्य आणि चांगला हमीभाव दिला पाहिजे. राज्य सरकारच्या दुष्काळी यादीतून रोहा तालुका वगळल्यामुळे सरकारला आतातरी जाग येईल का? रोहा तालुक्यातील शेतकऱ्याला मागील दोन दिवसांपूर्वी झालेल्या वादळी पावसामुळे मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे आता सरकारी मदतीची आणि हक्काच्या हमी भावाची आस आहे. – डॉ. मंगेश सानप**

सह्याद्रीतील लेण्यांचे सौंदर्य चित्ररूपात

खांदेश्वर : पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या मुख्य कक्षात ज्येष्ठ कलाशिक्षक व चित्रकार माधव अभ्यंकर यांनी साकारलेल्या सुंदर कॅनव्हास चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेल्या ऐतिहासिक लेण्यांचे निसर्गसौंदर्य आणि स्थापत्यवैभव अभ्यंकर यांनी आपल्या कुंचल्यातून अत्यंत सुरेखपणे कॅनव्हासवर उतरवले आहे. दिवाळीतील धनत्रयोदशीच्या शुभदिनी अभ्यंकर सरांनी आपल्या कलेचे हे अनमोल धन नाट्यगृहाला अर्पण केले आहे.

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील वाशी नाक्यापासून वाशी गावापर्यंत नवीन विद्युत खांब उभारण्याचे काम सध्या सुरू आहे. मात्र, या कामात सुरुवातीपासूनच निकृष्ट दर्जा राखला जात असल्याचा आरोप होत असून, अंदाजपत्रकातील निकषांना हरताळ फासून ठेकेदाराकडून थातूरमातूर काम केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

विद्युत खांब उभारण्यासाठी नियमानुसार साडेतीन फुटांपर्यंत खोल खड्डे खोदणे आवश्यक असताना प्रत्यक्षात जेमतेम दोन ते सव्वादोन फुटांचेच खड्डे खोदले जात आहेत. तसेच, खड्डे भरण्यासाठी योग्य दर्जाचे दगड वापरण्याऐवजी मुरमयुक्त लाल रंगाचे दगड वापरले जात असल्याचे

विद्युत खांब उभारणीत हलगर्जीपणा



दिसून येत आहे. याशिवाय केवळ दोन घमेले ग्रिट टाकून वरच्या बाजूने सिमेंटचा मुलामा दिला जात असून, खड्ड्याच्या आतील बाजूस पुरेशा प्रमाणात सिमेंटचा वापर केला जात नसल्याचेही समोर आले आहे. दरम्यान, वाशी शाखा अभियंता संदीप गायकवाड यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी तातडीने लाईनमन रोहिदास बिंदुकले यांना घटनास्थळी पाठवले. त्यांनीही प्रत्यक्ष कामाची पाहणी करून काम निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच, खड्डे आणखी खोल खोदण्याची आवश्यकता असल्याचे ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांना स्पष्टपणे बजावले. मात्र, या सूचनांकडेही दुर्लक्ष करून निकृष्ट दर्जाचे काम सुरूच असल्याचे दिसून आले. या महत्त्वाच्या कामातच अशा प्रकारे हलगर्जीपणा होत असेल, तर भविष्यात खांबांच्या मजबुतीचा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

साकव संस्थेचा जलसंधारणाचा पुढाकार

। पेण । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आणि जलसंधारणाला चालना देण्यासाठी साकव संस्थेच्यावतीने पाबळ, वरब आणि जिरणे परिसरात मोठी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत तीन ग्रामपंचायतींच्या हद्दीत एकूण ४२ वनराई बंधारे बांधण्यात येणार आहेत.

बरडावाडी येथील आदिवासी बांधवांनी वडाजवळ वनराई बंधारा बांधून या उपक्रमाला सुरुवात केली आहे. साकव संस्थेने यापूर्वीच संबंधित परिसराचा सर्वेक्षण करून बंधारे बांधण्यासाठी योग्य ठिकाणे



निश्चित केली आहेत. शनिवारी जांभोशी येथील ग्रामस्थांनंतर धायरवाडी, बोरीचा माळ, पाहिर माळ आणि चिचवाडी येथील आदिवासी बांधव नदीपात्रात बंधारे बांधण्याच्या कामात सहभागी होणार आहेत. त्याचप्रमाणे पाबळ परिसरातील मोहाडी, झापडी, गवळवाडी आणि पेडकावाडी येथेही बंधारे उभारण्यात येणार आहेत. तर, जिरणे परिसरातील चाफेकरवाडी येथेही जलसंधारणाचे काम हाती घेतले जाणार आहे. पाबळ खोऱ्यात उभारले जाणारे हे ४२ बंधारे म्हणजे केवळ दगड-मातीची बांधकामे नसून, भविष्यातील पाणीसमृद्धीची पायाभरणी ठरणार आहेत.

आज अलिबागेत गाण्यांची मैफील

रायगड : अलिबागमध्ये विश्वरुप प्रतिष्ठान प्रयोजित, मैफिय आयोजित सप्तसूरांची दिवाळी पहाट होणार आहे. हा कार्यक्रम दिवाळीच्या दिवशी सकाळी ८ वाजता बहारदार गाण्यांनी रंगणार आहे. यावेळी इंडिया गॉट टॅलेंट फेम हर्षद व दुहिता यांच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे. हा कार्यक्रम येथे रविवारी (दि.८) अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहात होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या कार्यक्रमामध्ये सप्तसुरांतून गाण्यांची मैफील रंगणार आहे.



मराठमोळ्या गीतांनी रंगली दिवाळी पहाट

खांदेश्वर : दीपावलीच्या पूर्वसंध्येला कळंबोलीकरांसाठी आयोजित करण्यात आलेल्या खास मराठमोळ्या गीतांच्या 'गीत दीपावली पहाट' या सांगीतिक कार्यक्रमाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. सुरेल गाणी, मराठी संस्कृतीचा साज आणि कलाकारांच्या बहारदार सादरीकरणामुळे संपूर्ण वातावरण संगीतमय झाले होते. या कार्यक्रमात सागर म्हात्रे, श्वेता दांडेकर, पुष्कर श्रोत्री, मुग्धा वैशंपायन आणि प्रथमेश लघाटे या नामवंत कलाकारांनी आपल्या सुमधुर आवाजाने उपस्थितांची मने जिंकली. मराठी भावगीते, भक्तिगीते आणि लोकप्रिय गीतांच्या सादरीकरणाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी कलाकारांच्या प्रत्येक सादरीकरणानंतर टाळ्यांचा कडकडाट होत होता.

मुरूडमधील गोबरे बंधूंचा अनोखा पुढाकार | **ढासळणाऱ्या तटबंदीच्या संवर्धनाची मागणी**

पद्मदुर्ग किल्ला साकारून वेधले लक्ष

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

सुमारे ३५० वर्षांपूर्वी समुद्रातील सिद्दीच्या सत्तेला आव्हान देण्यासाठी मुरूड समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे ३ किलोमीटर अंतरावर अरबी समुद्रात उभारण्यात आलेल्या पद्मदुर्ग किल्ल्याला ऐतिहासिक आणि सामरिक महत्त्व आहे. मात्र, या ऐतिहासिक वारशाचे योग्य जतन व संवर्धन होत नसल्याने नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाचे या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी मुरूड बाजारपेठेती गोबरे बंधूंनी पद्मदुर्ग किल्ल्याची आकर्षक प्रतिकृती साकारली आहे. या माध्यमातून त्यांनी किल्ल्याच्या संवर्धनाचा प्रश्न देखील नागरिकांसमोर मांडला.



(छायाचित्र: गणेश चोडणेकर)

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्वराज्यकालीन इतिहासाची साक्ष देणारा मुरूड समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे ३ किलोमीटर अंतरावर अरबी समुद्रात उभा असलेला ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ला आज संवर्धनाच्या प्रतीक्षेत आहे. समुद्राच्या सततच्या लाटा, खारे पाणी आणि नैसर्गिक झीज यामुळे किल्ल्याच्या बुरुजांसह तटबंदीचे अनेक भाग ढासळू लागले असून, या ऐतिहासिक वास्तूची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत आहे. या ऐतिहासिक वारशाचे योग्य जतन व संवर्धन होत नसल्याने नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाचे या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी मुरूड बाजारपेठेतील इयत्ता सातवीत शिकणारा हर्ष गोबरे आणि इयत्ता आठवीत शिकणारा निल गोबरे या बंधूंनी पद्मदुर्ग किल्ल्याची आकर्षक प्रतिकृती साकारली या माध्यमातून त्यांनी किल्ल्याच्या संवर्धनाचा प्रश्न देखील नागरिकांसमोर मांडला.

यावेळी हर्ष आणि निल गोबरे यांनी सांगितले की, पद्मदुर्ग हा आपल्या ऐतिहासिक वैभवाचा महत्त्वाचा ठेवा आहे. समुद्राच्या सततच्या लाटांमुळे किल्ल्याच्या भिंती व तटबंदी ढासळत आहेत. किल्ल्यावरील गंजलेल्या तोफांचेही योग्य पद्धतीने जतन करणे आवश्यक आहे. त्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग्य संवर्धन प्रक्रिया राबवावी. शासनाने तातडीने लक्ष घालून किल्ल्याची डागडुजी व संवर्धन करावे. तसेच, या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याचाही विचार करावा, असेही त्यांनी सांगितले.

ऐतिहासिक वारसा जपणे ही केवळ शासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. हर्ष आणि निल गोबरे बंधूंनी किल्ल्याची प्रतिकृती साकारून केलेला हा प्रयत्न पद्मदुर्गाच्या संवर्धनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणणारा ठरत आहे. आता शासन या मागणीची कितपत दखल घेते, याकडे मुरूडकरांचे लक्ष लागले आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ नोव्हेंबर

१) श्री. काशिनाथ रघुनाथ कोळी
सारळ, अलिबाग,
८-११-१९४८



कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

दूर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग

अभय कुमार गुगलिया, यवतमाळ

सुधाकर गणपती उंबरे, वाढदिवस, अलिबाग



प्रदूषण नियंत्रणासाठी पाणी फवारणी

● नागरिकांना श्वसनाचा त्रास
● आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

पनवेल शहर आणि परिसरात पुन्हा एकदा हवेतील प्रदूषणाचे प्रमाण वाढू लागले आहे. वाढत्या प्रदूषणामुळे नागरिकांना श्वसनाचा त्रास जाणवू लागला असून आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महामार्गावरून दिवसरात्र हजारो वाहनांची ये-जा सुरू असते. अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे रस्त्यावरील धूळ मोठ्या प्रमाणात हवेत पसरते. त्यातच बांधकामे आणि रस्त्यांवरील धुळीमुळे प्रदूषणात भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेने प्रदूषण नियंत्रणासाठी पुढाकार घेतला आहे. महामार्गालगत असलेल्या झाडांवर पाण्याची फवारणी करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

पाण्याच्या फवाऱ्यामुळे झाडांच्या पानांवर साचलेली धूळ खाली बसण्यास मदत होत आहे. तसेच हवेत तरंगणारे धूलिकणही काही प्रमाणात खाली बसण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यास हातभार लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. महामार्गालगत असलेल्या झाडांवर पाण्याची फवारणी केल्याने परिसरातील धुळीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.



धूळीकणांचे स्थिरीकरण

हवेत तरंगणारे धुळीचे कण, गाड्यांचा धूर आणि बांधकामाची धूळ झाडांच्या पानांवर जमा होते. पाण्यामुळे हे कण ओले होऊन जमिनीवर पडतात, ज्यामुळे हवेतील प्रदूषण तात्पुरते कमी होते.

प्रदूषणाचा वाढता विळखा लक्षात घेता महापालिकेने केलेला हा प्रयत्न महत्त्वपूर्ण मानला जात आहे. मात्र, शहरातील प्रदूषणाची समस्या केवळ झाडांवर पाणी मारून सुटणारी नाही. रस्त्यांवरील धूळ, वाहनांचा धूर आणि सुरू असलेली बांधकामे हीदेखील प्रदूषणाची प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे या सर्व बाबींवर महापालिकेने लक्ष देणे आवश्यक आहे.

रस्त्यांची नियमित स्वच्छता करणे गरजेचे आहे. बांधकामाच्या ठिकाणी धूळ उडू नये यासाठी योग्य खबरदारी घेणे आवश्यक आहे. तसेच प्रदूषण नियंत्रणासाठी नियमित पाण्याची फवारणी करण्याची गरज आहे. हवेतील प्रदूषणामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनाचा त्रास असलेल्या व्यक्तींना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महापालिकेच्या या उपक्रमाला सातत्य मिळणे अपेक्षित आहे.

प्रदूषणमुक्त वातावरणासाठी महापालिकेने दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा पनवेलकर व्यक्त करीत आहेत. आता महापालिकेचा हा उपक्रम कितपत प्रभावी ठरतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

सायबर फसवणूक टाळण्यासाठी सतर्क राहा

● वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुखांचे आवाहन

। पनवेल । प्रतिनिधी ।

दिवाळीचा सण आनंदात आणि उत्साहात साजरा करताना नागरिकांनी स्वतःच्या आणि घराच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुख यांनी केले आहे.

दिवाळीनिमित्त अनेक नागरिक बाहेरगावी जात असल्याने बंद घरांवर चोरट्यांची नजर असण्याची शक्यता आहे. त्यामुळे घरफोडी, चोरी तसेच ऑनलाइन आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये मोठी गर्दी होत असल्याने महिलांनी दागिने, मोबाईल आणि पाकिटांची काळजी घ्यावी. शक्यतो गर्दीच्या ठिकाणी महागडे दागिने घालणे टाळावे. तसेच दिवाळीनिमित्त ऑनलाइन खरेदीच्या आकर्षक जाहिराती आणि सवलतींच्या माध्यमातून सायबर भामटे फसवणूक करण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनोळखी लिंकवर क्लिक करू नये. ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधावा.
असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुख यांनी केले आहे.

(पान १ वरून)

ऐन दिवाळीत एफडीएचा दणका!

परवाने निलंबित करण्यात आले. यामध्ये झेप्टोचे वरळीतील आऊटलेट, ब्लिंकिट, बिर्याणी बाय किलो, टॉसिन पिझ्झाचे वरळीतील आऊटलेट आणि जम्बो बर्गर यांचा समावेश आहे. अन्नसुरक्षा मानकांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. गंभीर स्वरूपाचे नियमभंग आढळल्याने राज्यातील सात आस्थापने पूर्णपणे बंद करण्याचे आदेश देण्यात आले. पुण्यातील तीन, अमरावतीतील दोन, तर मुंबई आणि कोकण विभागातील प्रत्येकी एका आस्थापनेवर ही कारवाई करण्यात आली. बोरीवलीतील एका बिर्याणी सेंटरने अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्याने ते बंद करण्याचे निर्देश देण्यात आले.

नागपूरमधील कामठी रोडवरील डी-मार्ट आऊटलेटमध्येही परवान्यातील अटींचा भंग झाल्याचे आढळले. त्यामुळे तेथील रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठा जप्त करण्यात आला. तपासणीदरम्यान ६९ हून अधिक आस्थापनांमधून एक कोटी ३५ लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचा अन्नसाठा जप्त करण्यात आला. हा साठा आरोग्यास अपायकारक किंवा भेसळयुक्त असण्याचा संशय आहे.

प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या विक्रीविरोधातील कारवाईत तीन एफआयआर दाखल करण्यात आले असून, दोघांना अटक करण्यात आली आहे. तसेच दोन वाहनेही जप्त करण्यात आली आहेत. सणासुदीच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व्यावसायिकांना एफडीएने या कारवाईतून स्पष्ट इशारा दिला आहे.

कारवाईचा राज्यव्यापी दणका
१०५ खाद्य व्यवसायांचे परवाने निलंबित
७ आस्थापने बंद करण्याचे आदेश
₹१.३५ कोटींहून अधिक किमतीचा अन्नसाठा जप्त
६९ हून अधिक आस्थापनांची तपासणी
३ एफआयआर दाखल
२ जणांना अटक
२ वाहने जप्त

(पान ३ वरून)

झाडे तोडणाऱ्यांना सोडणार नाही!

वृक्षतोडीविरोधात संघर्ष करीत आहेत. या पार्श्वभूमीवर सयाजी शिंदे यांनी साय डोंगराला भेट देत प्रत्यक्ष वृक्षतोडीची पाहणी केली. तोडलेल्या जुन्या वृक्षांची अवस्था पाहून ते भावूक झाले. झाडांचे रक्त आजही वाहात असल्यासारखे दिसत असून, ही केवळ वृक्षतोड नसून, असंख्य पक्षी आणि प्राण्यांचे अस्तित्व संपवण्याचा प्रकार आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

जंगल तोडून विकास नको, असे ठामपणे सांगताना त्यांनी हरित ऊर्जेच्या नावाखाली होणाऱ्या वृक्षतोडीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सूर्यप्रकाशासारखी प्रचंड ऊर्जा मोफत उपलब्ध असताना जंगलांचा विनाश करून हरित ऊर्जेचे प्रकल्प उभारण्याची गरज काय? नोकऱ्या देण्याचे आमिष दाखवले जात आहे; मात्र हे केवळ थोतांड आहे. मी स्वतः प्रकल्पग्रस्त असून, मलादेखील चौकीदार म्हणून नोकरी करावी लागली होती, असा अनुभव त्यांनी सांगितला. जंगल म्हणजे केवळ झाडांचा समूह नाही, तर बुरशी, पक्षी, प्राणी आणि संपूर्ण जैवसाखळीचा आधार आहे. जंगल नष्ट झाले तर ही साखळीच उद्ध्वस्त होईल. घरावर बॉम्ब टाकल्यासारखा हा प्रकार आहे, अशा शब्दांत त्यांनी वृक्षतोडीचे गांभीर्य मांडले. आम्ही धरणासाठी जमीन देऊन होरपळलो आहोत. तोच अनुभव तुम्हाला येऊ नये, यासाठी तुम्हाला सावध करायला आलो आहे. तुम्ही जमिनी देऊ नका, मी तुमच्या सोबत आहे, असे आश्वासनही त्यांनी दिले. यावेळी कर्जत पर्यावरण बचाव समितीचे ॲड. कैलास मोरे, सह्याद्री बचाव समितीचे महेश भारती, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, ग्रामसंवर्धन समितीचे पदाधिकारी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, पर्यावरणप्रेमी रोहिदास लोभी यांनी गाडगेबाबांची वेशभूषा करून भारुडातून ग्रामस्थांना जमिनी आणि वृक्षसंपदा वाचवण्याचे आवाहन केले. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हा संदेश देत त्यांनी टोरंट प्रकल्प हटवण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांच्या भारुडाला ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. साय डोंगरातील वृक्षतोडीविरोधातील लढ्याला आता राज्यभरातून पर्यावरणप्रेमींचा पाठिंबा मिळत आहे. सयाजी शिंदे यांनी प्रत्यक्ष जंगलात उतरून दिलेला आवाज आणि ग्रामस्थांना दिलेली साथ यामुळे टोरंट प्रकल्पाविरोधातील संघर्षाला नवे बळ मिळाले आहे.

बोर्डाच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

१३ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणारे वेळापत्रक केवळ माहितीसाठी आहे. शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणारे छापील वेळापत्रक अंतिम असेल. विद्यार्थ्यांनी त्यानुसारच परीक्षेची तयारी करावी. अन्य संकेतस्थळांवरील किंवा समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या वेळापत्रकावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन डॉ. माळी यांनी नमूद केले.

कष्टकऱ्यांची दिवाळी अंधारात

मात्र, दोन वर्षांचा बोनस आणि दोन महिन्यांचा पगार मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि दिवाळीचा सण साजरा करायचा कसा, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे.या अन्यायाविरोधात कामगारांनी म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, सरचिटणीस अनिल जाधव आणि कार्याध्यक्ष संतोष पवार यांच्याकडे दाद मागितली. नगराध्यक्षा भावना घाणेकर आणि मुख्याधिकारी समीर जाधव यांनाही निवेदन देण्यात आले. युनियनने प्रशासनाला लेखी पत्र देऊन तातडीने कार्यवाहीची मागणी केली; मात्र अद्याप प्रश्न सुटलेला नाही.ठेकेदाराच्या कामगारांचे वेतन आणि हक्क याबाबत नगरपरिषद प्रशासन आपली जबाबदारी झटकू शकत नाही, अशी भूमिका युनियनने घेतली आहे. थकीत वेतन आणि बोनस मिळेपर्यंत काम बंद आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार कामगारांनी व्यक्त केला आहे. आता प्रशासन ठोस निर्णय घेणार की आंदोलनाची धग आणखी वाढणार, याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे.

पदपथावर सरकारी निरोधचा खच

आरोग्याशी संबंधित असलेले शासकीय साहित्य अशा प्रकारे उघड्यावर पडून राहणे गंभीर मानले जात आहे. आरोग्य विभागाकडून अशा साहित्याचे नियोजनबद्ध वितरण होणे अपेक्षित असताना ही पाकिटे येथे कोणी आणली? कोणत्या शासकीय आरोग्य केंद्रातून त्यांचा पुरवठा झाला? वितरित न झालेल्या साहित्याची जबाबदारी कोणाची? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रकारामागे नेमके काय कारण आहे, हे चौकशीतूनच स्पष्ट होणार असले तरी संबंधित आरोग्य यंत्रणेने तातडीने दखल घेऊन पाकिटांच्या स्रोताची तपासणी करावी आणि जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

साप्ताहिक राशिभविष्य दि. ०८ ते १४ नोव्हेंबर २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

प्रामाणिकपणे काम करा

मेष : राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता तुम्हाला इच्छेनुसार फळ मिळेल. जोडीदार प्रसन्न आणि अपत्य संतुष्ट राहतील. एकुणच तुमच्यासाठी हा चांगला सप्ताह आहे. कोणीतरी तुमच्यावर नजर ठेवून आहे. यासाठी आपले काम पूर्ण प्रामाणिकपणे करा. सावध रहा, मेहनतीचे फळ तुम्हाला नक्की मिळेल. पण ही वेळ विद्यार्थ्यांसाठी प्रतिकूल वेळ आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी मात्र सर्वकाही सामान्य राहील. म्हणजेच मेहनतीला पर्याय नसेल. नव्या लोकांच्या ओळखी होतील, ज्या पुढे लाभदायक ठरतील. नोकरीसाठी एखाद्या नव्या शहरात जाऊ शकता. अडकलेले धन परत मिळेल. वसूली करून घ्या. जोडीदार तुमच्यासाठी धावून येईल, त्याचे प्रेम सिद्ध होईल. जोडीदाराचे तुमच्याप्रतीचे वागणे साहाय्यकारी असेल. स्पर्धेला घाबरू नका, त्याचा आनंद लुटा. मग पाहा काम करताना किती मजा घेता येईल. **महिलांना :** धार्मिक कृत्यांप्रती रूची वाढवाल. तुमच्या जीवनात काहीतरी नवे होणार आहे. वाटेत काही अडचणी येतील पण तुम्ही त्या पार कराल. कुटुंबात वातावरण ठीकठाक राहील. तीर्थयात्रेचा लाभ होईल. **शुभ दिनांक :** ०८,०९.

पैसे खर्च होण्याची शक्यता

वृषभ : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता तुम्ही चिंतित राहाल. शत्रू पक्ष तुमच्यावर हावी होऊ शकतो. भौतिक साधनांवर निरर्थक पैसे खर्च होण्याची चिन्हे दिसत आहेत. लक्षात असू द्या, क्रोध सगळ्यात आधी तुमचे नुकसान करतो, म्हणून रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वैवाहिक जीवनात संशय घातक ठरू शकतो. या विषयावर जोडीदारासोबत चर्चा करून तोडगा काढा. बाहेर खाणे टाळा, नाहीतर आरोग्यावर याचे वाईट परिणाम दिसून येतील. तरीही तुमच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे फळ तुम्हाला नक्की मिळेल. नवे वाहन किंवा घर वगैरे खरेदी करु शकता. मित्र प्रत्येक अडचणीत तुमची साथ देतील. सासरच्या लोकांकडून साहाय्य मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. कम्प्यूटर व्यवसायाशी संबंधित लोकांसाठी वेळ चांगली असरणार आहे. शत्रूंची प्रत्येक चाल अयशस्वी ठरेल. **महिलांना :** नव्या संबंधांचा फायदा होईल. काहीतरी नवे घडणारच आहे.. तुमच्या अपत्याला तुमचा वेळ हवा आहे, हे ध्यानात असू द्या. सुख आणि धन प्राप्तीचे संकेत आहेत. सांध्यांचे दुखणे किंवा शल्य चिकित्सा होऊ शकेल. **शुभ दिनांक :** ११,१२.

पदोन्नती मिळण्याची शक्यता

मिथुन : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता सर्व काही ठीक चालले आहे. लहानमोठया समस्या सोडल्या तर हा सप्ताह उत्तम चालला आहे. हा कालावधी कडू-गोड अनुभवांचा असेल. पण शेवटी काही समस्या भेडसावू शकतात. दीर्घ यात्रा फायदेशीर तर असतील पण यासाठी अधिक पैसेही खर्चावे लागतील. शत्रू आपल्याला त्रास देण्याचा पूरेपूर प्रयत्न करतील पण त्यांना यश येणार नाही. सप्ताहाच्या पूर्वार्धात खर्च अधिक होईल, ज्यामुळे धन संचयात अडचण निर्माण होईल. चांदीच्या तांब्यात वाहत्या नदीचे पाणी भरून ठेवल्यास फायदा होईल. या सप्ताहाच्या मध्यात सावध राहणे फारच गरजेचे आहे, कोणीतरी आपल्याविरुध्द कट रचत आहे. हलकीशी चूक आपल्याला महागात पडू शकते. एका मांगलिक कार्याचा योग जुळत आहे. फार मेहनत करावी लागेल. इच्छीत लाभाने आनंद होईल. **महिलांना :** स्त्रियांनी तब्येतीची काळजी घ्यावी. वजन वाढेल. नोकरीत पदोन्नती शक्य आहे. तब्येतही थोडी नाजुक राहील. **शुभ दिनांक :** १३,१४.

आरोग्याकडे लक्ष द्या

कर्क : राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीच्या लोकांना आता खूप चांगले परिणाम मिळणार आहे. या कालावधीत प्रामुख्याने तुम्हाला करिअर आणि व्यवसायात यश मिळेल. तुम्ही तुमच्या यशाचा झेंडा फडकवाल जे मनात येईल ते कराल. परंतु, प्रामुख्याने आपल्याला आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल कारण या कालावधीत आरोग्याची समस्या आपल्यासाठी सर्वात मोठी चिंता असू शकते. तरीही आपल्या जीवनात प्रेमाची बहार येईल आणि आपण वेळोवेळी लव्ह लाईफचा आनंद घ्याल. विवाहित जीवनात कोणतीही मोठी समस्या उद्भवणार नाही. छोट्या छोट्या भांडणामुळे काहीही फरक न पडता वैवाहिक जीवनात आनंद कायम राहील. परदेशात जाण्याची इच्छा असणाऱ्यांना, ती पूर्ण करता येईल आणि त्यांना नवीन घर बांधण्याची संधी देखील मिळू शकेल. **महिलांना :** आपला जोडीदार आपल्या प्रत्येक कामात आपले समर्थन करेल आणि वेळ आल्यावर नक्कीच मदत करेल. याचा परिणाम म्हणून तुमचे विवाहित जीवन चांगले राहू शकते. आपल्याला पैशांची चिंता करण्याची आवश्यकता नाही. **शुभ दिनांक :** ०८,०९.

बोलण्यावर नियंत्रण ठेवा

सिंह : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपले काम दुसऱ्यापुढे ढकलू नका. स्वतःची कामे स्वत: करण्याची सवय लावा. विलंब आपल्यासाठी मारक ठरू शकतो. जसे जमेल तसे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केल्यास यश मिळेल. या कालावधीत आपल्या अनेक इच्छा पूर्ण होऊ शकतात. ज्यामुळे तुम्ही आनंदी राहाल आणि दीर्घ काळापासून अडकलेली कोणतीही योजना पूर्ण होईल. तुम्हाला चांगला फायदा होईल. तसेच आपल्या कामाच्या क्षेत्राकडे थोडेसे लक्ष द्या. आपल्याविरुद्ध काही कट रचले जाऊ शकतात, किंवा कोणीतरी आपल्याविरोधात हालचाल करू शकत. आपल्याला बदनामी सहन करावी लागेल. आपले कार्य पूर्ण प्रामाणिकपणाने करा. कोणालाही अशी संधी देऊ नका. आपल्याला कोणत्याही समस्येचा सामना करावा लागेल. **महिलांना :** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभ दिनांक :** १०,१३.

दुर्गम प्रवास करावा लागेल

कन्या : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता, या कालावधीत आपल्याला बरेच दुर्गम प्रवास करावे लागेल. त्याद्वारे आपल्याला चांगले पैसे मिळतील आणि त्याच वेळी आपला सन्मान ही वाढेल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले हा सप्ताह आपल्यासाठी खूप प्रगतीशील असल्याचे सिद्ध होऊ शकते. आपल्याला या सप्ताहात आव्हानांच्या दरम्यान चांगला अनुभव मिळेल. आपल्याला केलेल्या प्रयत्नांचे चांगले परिणाम मिळतील. आपण अधिक मेहनत घेत राहिल्यास हे निश्चितच हे दिवस चांगले सिद्ध होऊ शकतील. आपणास जीवनात स्थिरता आवडते आपण या दिशेने प्रयत्न केल्यास तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल. भविष्यावाणी अशी आहे की आपणास आपल्या मार्गावर येण्यासाठी आणि योग्य वेळी भिन्न पर्याय निवडावे लागतील. तेव्हाच तुम्ही चांगले वातावरण उपभोग करू शकाल. **महिलांना :** आपण कोणत्या प्रकारचे निर्णय घेता हे महत्त्वाचे असेल कारण ते निर्णयांचा मुख्यतः आपल्या कौटुंबिक आणि व्यावसायिक जीवनावर परिणाम होईल. **शुभ दिनांक :** ११,१२.

रागावर नियंत्रण ठेवा

तुळ : राशीसाठी या सप्ताहात सुरवातीला कोणत्याही प्रकारच्या आर्थिक गुंतवणुकीसाठी या राशीच्या लोकांनी अत्यंत सावधगिरीने पुढे जावे. या क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा तज्ज्ञांकडून सल्ले घेऊन कोणतेही कार्य केले तर यश त्यांना नक्कीच यश मिळेल. सामाजिक जीवनासाठी देखील हे वर्ष चांगले ठरेल आणि त्या व्यतिरिक्त आपण आपले वैयक्तिक संबंध अधिक अनुकूल बनवू शकता. तुम्हाला हे लक्षात ठेवायला पाहिजे की प्रेम आणि नातेसंबंध ओळखी, आपुलकीने आणि प्रेमाने चालतात. कोणत्याही नात्यात हट्टीपणा करून कोणतीही कृती करू नका. आपल्या आजूबाजूची काळजी घ्या कारण असे काही लोक आहेत जे आपले नुकसान करण्याचा विचार करीत आहेत, त्यांच्यापासून सावध राहा आणि कोणतेही नवीन कार्य करताना त्या सर्व बाबींचा विचार करा. **महिलांना :** आपणास आपला रागही नियंत्रणात ठेवावा लागेल कारण आपण एखाद्या कारणावरून वेळोवेळी भांडणे किंवा वाद घालू शकता. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभ दिनांक :** १३,१४.

आव्हानांचा सामना करावा लागेल

वृश्चिक : राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. या राशीच्या लोकांना या सप्ताहात काही आनंद आणि काही आव्हानांसह पुढे जावे लागणार आहे. आपण प्रत्येक आव्हानाला दृढपणे सामोरे जाण्यास सक्षम झाल्यास उत्कृष्ट होण्यास कोणीही रोखू शकणार नाही. या सप्ताहात आपणास काही क्षेत्रात आव्हानांचा सामना करावा लागेल, विशेषत: आपले आरोग्य आणि करिअर यात आव्हान असेल. हे दिवस प्रेमजीवनासाठी अनुकूल ठरू शकते, त्याच प्रमाणे कौटुंबिक जीवन, विवाहित जीवन, विवाह, मुले, शिक्षण आणि आर्थिक परिस्थितीसाठी खूप अनुकूल ठरू शकते.. याचा प्रभाव मुख्यतः आपल्या कामाचे क्षेत्र, आपले कौटुंबिक जीवन, आपली वाणी, आपले आरोग्य आणि आपल्या मुलांवर होईल. कधी कडू गोड प्रसंगाने आपले विवाहित जीवन उतार-चढाव ने भरलेले असेल. **महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभ दिनांक :** ०८,११.

नम्रतेचे धोरण स्वीकारा

धनु : राशीसाठी या सप्ताहात आपण थोडे आराम अनुभवाल आणि आरोग्यावरही त्याचा महत्त्वपूर्ण परिणाम होईल. सुरुवातीपासूनच ग्रह तुमच्या राशीला चांगले परिणाम देतील. विशेषतः हा कलावधी आपल्या आरोग्यावर आणि खर्चांवर परिणाम होईल. आपला खर्च अनपेक्षितपणे वाढू शकेल. काही वेळा अति घेतलेला ताण आरोग्याच्या कारणास्तव त्रास देऊ शकते. परंतु सध्याची ग्रह स्थितिची सकारात्मक बाजू अशी आहे, की जर आपण परदेशात जाण्यास तयार रहा. तर तुमची इच्छा पूर्ण होऊ शकते. विशेषत: आखाती देशांमध्ये आपण सहजपणे प्रवेश करण्यास सक्षम असाल. ग्रहांचा आणखी परिणाम मुख्यत: तुमच्या शिक्षणावर, तुमच्या मुलांवर, तुमच्या शारीरिक सुखांवर परिणाम होईल. आपण आपले वाहन घेण्यास सक्षम असाल. **महिलांना :** अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. मोठ्या व्यक्तीचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. **शुभ दिनांक :** ०९,१२.

कामाकडे पूर्ण लक्ष द्या

मकर : हा सप्ताह मकरराशीसाठी आपले ग्रहमान पाहता, या कालावधीत नोकरी बदलण्यापासून तुम्हाला बरेच फायदे मिळू शकतात आणि हा बदल तुमच्या कारकीर्दीसाठी खूप चांगला असल्याचे सिद्ध होईल. दुसरीकडे, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची संधी मिळू शकते. या काळात बऱ्याच परीक्षांमध्ये विद्यार्थी चांगली कामगिरी करतील आणि परिणाम म्हणून खूप चांगल्या गुणांसह उत्तीर्ण होतील. जर आपण काम करत असलात तर आपल्याला आपल्या कामाकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल अन्यथा आपल्याला आपल्या कार्यालयात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या राशीच्या लोकांना सप्ताहात व्यवसाय भागीदारीत अनेक आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. परदेशी व्यापारी लोकांसाठी वर्ष खूप अनुकूल ठरू शकते. यामुळे बरेच परदेशी संपर्क स्थापित केले जातील जे आपल्याला दूरगामी लाभ देतील आणि आपल्याला समाजात चांगले स्थान मिळेल. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. **शुभ दिनांक :** ११,१४

विचारपूर्वक निर्णय घ्या

कुंभ : राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता नोकरी व्यवसायात परिवर्तनामुळे घरापासून दूर राहावे लागेल. आपले कुटुंबीय एका मजबूत भिंतीसारखे तुमच्यासोबत ठामपणे उभे राहतील. विद्यार्थ्यांसाठी वेळ अनुकूल आहे. स्पर्धेचा निकाल आपल्याला प्रसन्न करेल. विद्यार्थी वर्गासाठी चांगली बातमी आहे. मिळकतीचे नवे पर्याय उपलब्ध होतील. प्रॉपर्टीत गुंतवणुक करणे फायद्याचे ठरेल ऑफिसमध्ये सहकर्मचारींचे वागणे सहाय्यभूत ठरेल. कुठे तरी बाहेर जाण्याचा कार्यक्रम ठरू शकतो. जोडीदारासोबत खास क्षण घालवू शकाल. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. **महिलांना :** संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक :** १२,१३.

स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा

मीन : राशीसाठी आपले ग्रहमान पाहता कारण आपल्याला एकापेक्षा जास्त स्रोतांकडून पैसे मिळण्याची शक्यता दिसते. कार्यालय किंवा कार्यालयात आपल्या हाताखालच्या लोकांवर अधिक विश्वास ठेवू नका. जर आपण असे केले तर ते आपल्या विश्वासाचा फायदा बेकायदेशीरपणे घेऊ शकतात. आपल्यास गुप्तपणे नुकसान करण्याचा प्रयत्न करतील. ज्यामुळे कार्यालयातील आपली प्रतिमा खराब होऊ शकते. आपली जवळची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल. कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका, आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घ्या. आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील **शुभ दिनांक :** ०९,११.

भारतीय एज्युकेशन विद्या संकुलात दीपोत्सव

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्यासांकलात दिवाळी सणाचे औचित्य साधून 'दीपोत्सव २०२६' या कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष किशोर जैन, संगीता जैन, कार्तिक जैन, सुरेश जैन, वैभव नांदगावकर, प्राचार्य डॉ. अर्चिस पाटील, प्राचार्य डॉ. आशीष पगारिया, प्राचार्य डॉ. प्रवेश यादव, प्राचार्य सतीश सुर्वे, डॉ. संदेश शिंदे यांच्यासह सर्व वैद्यकीय अधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण धसाडे यांनी केले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. शिंगढोल, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. सुनिलकुमार रामस्वरूप सोनी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे-आर-पॉ)	आकार (रू. पै)
३	२	०-७२-९०	२-७७

वरील जमिन मिळकती मध्ये जमिन मालक यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०-३२-९० हे. आर. पॉ विकत देत आहेत.

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हकहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/११/२०२६

ॲड. राकेश भरत भोईर
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकती मध्ये असलेल्या घराचे बांधकामासह, मिळकतीचे मालक अतुल अरुण कसबेकर व वंदना अतुल कसबेकर यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे. आर.	आकार रु. पै.
३२	२	०.६७.००	१.६०

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून सदर मिळकतीचे मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/११/२०२६

ॲड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट बाजारपेठ
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१.

जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसाने कळविण्यात येते की, मिळकतीचे मालक मुनाफ इब्राहिम प्रेसवाला आणि शेहरा रशिद मस्कती यांनी त्यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील खालील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी विक्री व्यवहार केलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पैसे)
उमटे ता. अलिबाग	४२/२	७-९२-६० पो.ख. २-५६-४० एकुण क्षेत्र १०-४९-००	१२.६०

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज् अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकरती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक ७/११/२०२६

ॲड. कौस्तुभ पुनकर
पत्ता : जिल्हा न्यायालय
रायगड-अलिबाग
९७६५०७०००९

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मा. मुख्य न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात
फौजदारी चौकशी अर्ज क्र. ३८०/२०२६

श्री. राजेंद्र जनार्दन गिजम, ... अर्जदार
विरूद्ध
ग्रामपंचायत वेश्वी,
ता. अलिबाग, जि. रायगड. ... सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार यांची आई कै. जयश्री जनार्दन गिजम यांच्या मृत्युची नोंद दाखला देणेकामी मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. अर्जदार यांच्या आईचा मृत्यु दि. २३/११/२०२० रोजी रहात्या घरी मौजे वाडगावफाटा, पो. वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड येथे वृद्धापकाळाने झालेले आहे. परंतु अर्जदाराच्या आईच्या मृत्युची नोंद जन्म मृत्यु नोंद ग्रामपंचायत वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे जन्ममृत्यु रजिस्टरमध्ये करणेची राहून गेलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांना त्यांची आई कै. जयश्री जनार्दन गिजम यांच्या मृत्युचा दाखला ग्रामपंचायत वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड येथून मिळत नाही. त्याकामी अर्जदार याने मे. कोर्टात त्यांच्या आईचा मृत्युचा दाखला मिळणेकामी अर्ज केलेला आहे. सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि. ०८/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे. कोर्ट अर्जदाराच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांना कायद्याने अर्जदार यांच्या आईच्या मृत्युचा नोंद दाखला देणेकामी ग्रामपंचायत वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जन्म-मृत्यु रजिस्टरमध्ये करण्यास संबंधीत अधिकारी यांना आदेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज तारीख ०७/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली आहे.

सही
कनिष्ठ लिपिक
मुख्य न्यायदंडाधिकारी
अलिबाग-रायगड

सही
(सहाय्यक अधिक्षक)
अलिबाग-रायगड

दिनांक : ०४ नोव्हेंबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व सभासदांना भिमाशंकर हिल्स हौसिंग सोसायटी लि. ताडवाडी, पो. पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड सोसायटी रजि. क्र. आरजीडी/केजेटी/एचए-सजी/(टिओ)/६२२५/२०२५-२६/ सन २०२५ मध्ये स्थापन असुन सर्व प्लॉट धारकांनी संस्थेच्या खाली नमुद मेल आयडी वर संपर्क करावा. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- भिमाशंकर हिल्स,
ताडवाडी, पो. पाथरज,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
मेल आयडी - accounts@bhimashankarhills.org

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल श्री. कुंडलिक जनार्दन भोपी यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. बाळु बारकू भोईर, राहणार मु. पो. मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड

गावाचे नाव	भूमापन क्रमांक व उपविभाग	एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी	आकार रू. पै
मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड	६७/३	०.१७.१०	२.५०

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विकीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. ०८.११.२०२६

ॲड. यज्ञेश अनंत भागवत
रा. फ्लॅट नं. १०१, पाल टॉवर, भिसेगाव, ता. कर्जत
जि. रायगड. मो. ९३०७८८५७११

जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे विणेगाव ता. खालापुर जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

मौजे विणेगाव तालुका खालापुर जिल्हा रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा. नं.	क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी)	आकार (रू.पै.)
३९	१	०-०९-९०	०.४१

वर वर्णन केलेल्या मिळकती श्री. पराग मनोहर सावंत यांच्या ताबेकब्जातील व वहिवाटीखालील जमिन मिळकती आहेत. सदरची मिळकतीचा विक्री व्यवहार करायचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण
दिनांक : ०७/११/२०२६

अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. हिरामण जनार्दन गायकवाड
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा. युको
बँक शेजारी कर्जत ता कर्जत जि. रायगड
८९७६३७५५७०
श्री. पराग मनोहर सावंत
९८३३४४५५३३

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे इंद्रपै ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक अल्ताफ पटेल व देविका उर्फ झमिना अल्ताफ पटेल यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिल यांनी ठरविले असून तशी बोलणी झालेले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट क्र.	क्षेत्र	आकारणी
इंद्रपै	१०९	०.९५.५०	३.३२

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत, दावा, तक्रार असल्यास अथवा यासंबंधी कोणाचा काही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, साठेकरार, खरेदीखत, बक्षिस, लिज, लिन मिळकतीतून येण्या-जाण्याचे मार्ग वगैरे असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपली हरकत त्यासंबंधीतच्या कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर लेखी अथवा फोनद्वारे नोंदवावी/कळवावेत.

याप्रकारे सदरच्या मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल या मिळकतीसंबंधी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी खरेदीखत पूर्ण करतील व पुढील व्यवहार करतील.

दि. /११/२०२६

ॲड. अभिजीत मधुकर पारकर
मु. थेरोंडे, पो. चौल
ता. अलिबाग जि रायगड
९६७३२३९८००

दिनांक ०८ नोव्हेंबर २०२६

जाहीर नोटीस

खरेदीखताची मूळ प्रत हरविल्याबाबत

याद्वारे सर्व संबंधितांना जाहीर करण्यात येते की, मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीसंबंधी खालीलप्रमाणे नमूद केलेल्या खरेदीखताची मूळ प्रत हरविली/गहाळ झाली आहे. सदर खरेदीखत दस्त क्रमांक ७४०/२०१०, दिनांक ०४/०२/२०१० रोजी दुय्यम निबंधक, कर्जत यांच्या कार्यालयात नोंदणी करण्यात आलेले आहे. सदर खरेदीखत लिहून देणार म्हणून बाल्सम डेव्हलपर्स प्रा. लि. यांच्यातर्फे संचालक (१) श्री. नरेंद्र चंद्रकांत भावसार, (२) श्री. जगदिश शिवदास भावसार व (३) श्री. हितेश संजय मेहरा यांनी लिहून दिले असून लिहून घेणार म्हणून श्री. रंगनाथ व्यंकटरामचर्या कोमनडुरी यांचे नाव आहे. सदर खरेदीखताची मूळ प्रत हरविल्याचे निदर्शनास आले असून, त्याबाबत सर्वत्र शोध घेऊनही सदर मूळ प्रत मिळून आलेली नाही. त्यामुळे सदर मूळ खरेदीखताचा कोणाकडूनही गैरवापर होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी सदर खरेदीखताच्या मूळ प्रतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा काही हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, आक्षेप अथवा ताबा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्यावर लेखी स्वरूपात आवश्यक त्या कागदपत्रांसह कळवावे. विहित मुदतीत कोणतीही हरकत अथवा दावा प्राप्त न झाल्यास सदर खरेदीखताच्या मूळ प्रतीबाबत कोणाचाही कोणताही दावा अथवा हरकत नाही असे समजून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दाव्यांचा विचार केला जाणार नाही.

मिळकतीचा तपशील-

मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र चौ.मी.	आकार रुपये	पैसे
१०२	३५९	२८२	२८	२०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:-मु. पो. कशेळे,
कर्जत मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तामाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक : ०८/११/२०२६

प्रोसेस जमा रू. नि : ७/ड

जाहीर नोटीस

अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात,
दिवाणी चौकशी अर्ज १४७/२०२६

श्री. विलास पांडुरंग पाटील, ...अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ...सामनेवाले

ज्याअर्थी कै. अरूण पांडुरंग पाटील, हे अलिबाग येथे तारीख ३१/०३/२०२६ रोजी मयत झाले असून, त्यांचे नावे जिल्हा रायगड, तालुका अलिबाग येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील गौरीनंदन, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, डि विंग मधील मालमत्ता क्रमांक १४७४/२ पैकी तळमजला मधील निवासी गाळा नंबर २, क्षेत्र ६२६ चौरस फूट बिल्टअप क्षेत्राचा निवासी गाळा ही स्थावर मिळकत कै. अरूण पांडुरंग पाटील यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीकरिता कै. अरूण पांडुरंग पाटील यांचे पश्चात अर्जदार श्री. विलास पांडुरंग पाटील हे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेकरिता अर्जदार यांनी अलिबाग कोर्टात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सबब तसा वारस दाखला देणेसंबंधी कोणाच्या काही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा तारीख ०१/०२/२०२६ रोजी कोर्टामध्ये हजर होवून लेखी स्वरुपांत मे. कोर्टात दाखल कराव्यात अन्यथा अर्जदार यांस वारस दाखला दिला जाईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाचे सहिनीशी दिली.

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
स्तर अलिबाग- रायगड

कोर्टाचा शिक्का

अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ
अलिबाग-रायगड

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. १४५/२०२६

१) श्रीमती ज्योती जयंद्र शिर्के
वय :- ६०, व्यवसाय :- गृहिणी,
रा. राम मंदिराजवळ, रामनाथ,
अलिबाग, पो. अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
२) सौ. भाव्या भावेश फाळके
(पूर्वाश्रमीची पूजा जयंद्र शिर्के) अर्जदार
वय :- ३२, व्यवसाय :- गृहिणी
रा. आक्षी, पो. नागाव,
ता. अलिबाग, जि. रायगड.
लग्नापूर्वी रा. राम मंदिरा जवळ, रामनाथ
अलिबाग, पो. अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सदर जाहिर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार नंबर १ यांचे पति व अर्जदार नंबर २ हिचे वडील कै. जयंद्र विष्णू शिर्के हे दिनांक २१/०८/२०१९ रोजी सायन म्युनिसिपल हॉस्पिटल आणि कॉलेज मुंबई येथे मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्युपश्चात व मृत्यूसमयी त्यांस अर्जदार नंबर १ पत्नी व अर्जदार नंबर २ मुलगी तसेच कै. सुलोचना विष्णू शिर्के आई म्हणून कायदेशीर वारस होते व आहेत. कै. सुलोचना विष्णू शिर्के या दिनांक १५/१०/२०११ रोजी मयत झालेल्या आहेत. त्याशिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. अर्जदार हेच मयत कै. जयंद्र विष्णू शिर्के यांचे कायदेशीर वारस आहेत हे जाहीर करून मिळण्याकरिता तसा वारस दाखला अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक १८/११/२०२६ पर्यंत मे. कोर्टात हजर राहुन आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ६/११/२०२६ रोजी माझा सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही
कनिष्ठ लिपिक
सी.ज.सी. डी. अलिबाग-रायगड

कोर्टाचा शिक्का

सही
कनिष्ठ लिपिक
सी.ज.सी.डी. अलिबाग-रायगड

दिनांक : ०८/११/२०२६

नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक कल्याणी गणेश बाजी, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्रफळ (आर.चौ.मी.)	आकार (रू. पैसे)
रेवदंडा ता. अलिबाग	४०/१/२/ब/३	०-२१-०० पो.ख. ०-०१-३० एकुण क्षेत्र ०-२२-३०	५.१२

वर नमुद जमिन मिळकतीमधील खाते क्र. १८७१२ क्षेत्र ०-०६-६० हे. आर., आकार १.६१ रु. पैसे या इतक्या क्षेत्रामधील कल्याणी गणेश बाजी यांच्या असलेल्या अविभाज्य हिश्याबाबत

दिनांक : ०८/११/२०२६
अशिलांची सही

ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे- देवकान्हे, ता. रोहा, जि.रायगड येथील मिळकत १) श्री. महेश मनोहर सातघरे २) श्री. उमेश मनोहर सातघरे ३) श्री. पुंडलीक खंडु गोजे ४) श्री. संतोष खंडु गोजे ५) श्री. विकास मधुकर पाटील ६) श्री. लहु मारुती काठावले यांच्या मालकी हक्कात व त्यांचे ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली भुखंड मिळकत आमचे आशिल सौ. स्नेहा विनोद पाटील रा. रुम नं.१४५ जय हरी निवास, सेक्टर- ५, शिवसेना शाखेजवळ, पिंपळ पाडा, नवी मुंबई कायमस्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत.

मिळकतीचे वर्णन
मौजे - देवकान्हे, ता. रोहा, जि. रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रुपये पैसे
३८९	-	०-५६-० पोटखराबा ०-०५-६ एकुण ०-५६-३०	११.३३
४११	-	०-२२-८० पोटखराबा ०-००-५६ एकुण ०-२३-३०	३.३५
३८७	-	०-३८-९० पोटखराबा ०-०३-३० एकुण ०-४२-२०	३.६२
३८६	-	०-२४-५० पोटखराबा ०-००-५० एकुण ०-२५-००	५.३१
३८८	-	०-३३-५० पोटखराबा ०-०४-०० एकुण ०-३७-००	७.६९
३८५	-	०-३३-०२	-

सदरहू जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कूळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत प्रथम दर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर किंवा आमच्या आशिलांच्या पत्यावर समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहीत मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित आहे व हरकत असल्यास ती सोडुन दिली आहे असे गृहित धरुन आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व १५ दिवसांच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे आशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

दिनांक - ०७/११/२०२६

सही/-
ॲड. सुचिता सत्यवान पाटील
मनेक नगर, ए-विंग, शॉप नं. ३
परदेशी आळी, पनवेल, जि. रायगड
मो. ९३२४३९५५३२

जाहीर नोटीस

प्रकाश गजानन पाटील याजकडून सर्व जनतेस कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या जमिनीसंबंधी, महाराष्ट्र, जि. रायगड, ता. अलिबाग

मौजे नारंगीखार ९०९४४८

भुमापन उपविभाग २८६/१	हे.आर.चौ.मी ०.५६
५५	हे.आर.चौ.मी. ०.४६
६८/१	हे.आर.चौ.मी. ०.४१

व मौजे मानकुळे ५५४०३६

भुमापन उपविभाग १०९/२	हे.आर.चौ.मी. ७१.१०

कोणीही कोणत्याही प्रकारचे खरेदी विक्री व्यवहार करु नये, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल.

दिनांक : ०८/११/२०२६

सही
प्रकाश गजानन पाटील
नारंगीचा टेप
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक किरण प्रसाद पालवणकर यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे-चिंचवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन

सर्व्हे क्र.	हिस्सा क्र.	क्षेत्र हे.आर.	आकारणी रु.-पै
२६	१०/अ	०.०५.०० पो.ख.०.००.०० एकुण क्षेत्र ०.०५.०० मिळकतीचे खरेदीखत	०.०५

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन ७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०८/११/२०२६

ॲड. मोनाली रामदास हजारे
एम.कॉम.एल.एल.बी.
पत्ता: दहिवली, ए.व्ही.एफ.रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक पूर्वा विपूल कवळी, माणिक विपूल कवळी यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:

मौजे - मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकतीचे वर्णन

भुमापन क्र.	उपविभाग क्र.	क्षेत्र ए.आर.चौ.मी.	आकारणी रु.पै
६	१/१४	एकूण ५.६० क्षेत्र मिळकतीचे	२.८०.००

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : ०८/११/२०२६

ॲड. मोनाली रामदास हजारे
एम.कॉम.ए



राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित वार्ता कानी येईल. विवाहाची बोलणी सफल होतील. नव्या व्यवहारात सावधगिरी बाळगावी.
- **वृषभ** : ग्रहमानाची अनुकूलता राहील. महत्त्वाचे निर्णय तातडीनं घ्यावेत. विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळेल.
- **मिथुन** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे घडतील. यंत्र, वाहनाचा वापर काळजीपूर्वक करावा. प्रकृती सांभाळावी.
- **कर्क** : स्थापत्य, कला क्षेत्रात संधी लाभेल. नव्या योजनांना गती मिळेल. प्रवासात पुरेशी काळजी घ्या.
- **सिंह** : उत्पन्नाच्या नव्या पर्यायांचा विचार होईल. सर्व गोष्टी उघड करू नका. मानसिक अस्वास्थ राहील.
- **कन्या** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकारा. वरिष्ठांची तुमच्यावर मर्जी राहील. अपेक्षित भेटी होतील.
- **तूळ** : हितशत्रूंच्या कारवाया वाढीस लागतील. विचारपूर्वक पावलं उचलावीत. व्यवसायात अडचणी येतील.
- **वृश्चिक** : कौटुंबिक वाद-विवाद टाळावे. आर्थिक करार लाभदायक ठरतील. घर दुरूस्तीकडे लक्ष राहील.
- **धनु** : दिवसाच्या सुरूवातीस दिलासा मिळेल. हितचिंतकांचा सल्ला ध्यानी घ्यायला हवा. चिंता करू नये.
- **मकर** : प्रयत्नात सातत्य आणि चिकाटी ठेवावी. कलांचा गौरव होईल. छोटा-मोठा प्रवास घडणार आहे.
- **कुंभ** : अपत्यांबाबत चिंता राहील. कामाचा व्याप वाढल्याने धावपळ होईल. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील.
- **मीन** : नातलगांच्या गाठीभेटी होतील. नव्या योजना मार्गी लागतील. स्थावर, वाहन सौख्य लाभणार आहे.

८ नोव्हेंबर

दिनविशेष

१९१९ : ख्यातनाम लेखक, दिग्दर्शक, निर्माता, संगीतकार, अभिनेता पु. ल. देशपांडे यांचा जन्मदिवस.
१९३९ : हिटलरच्या सभेत बाँबस्फोट घडवून त्याचा खून करण्याचा प्रयत्न फसला. या स्फोटात सात माणसे ठार, साठ जखमी.
१९७२ : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निक्सन यांची फेरनिवड.
२०१३ : फिलिपिन्सला टायफून या चक्रीवादळाचा जोरदार तडाखा. सहा हजारांपेक्षाही अधिक लोक मृत्यूमुखी.

आरोग्यमंत्र

टाळा या आरोग्य त्रुटी

आरोग्यदायी जीवनासाठी नियमितपणे पुरेशा प्रमाणात पाणी पिणं गरजेचं असतं. परंतु सध्याच्या धावपळीच्या, कामाच्या वाढत्या ताण्याच्या जमान्यात या महत्त्वाच्या बाबींकडे अनेकांचं दुर्लक्ष होतं. रोजच्या धावपळीत घाईगडबडीने उभ्यानं पाणी पिणाऱ्यांची संख्याही कमी नाही. परंतु असं पाणी पिणंही हानीकारक ठरू शकतं. त्यामुळे निदान शांतपणे, खाली बसून पाणी पिण्यासाठी काही क्षणांचा अवधी नक्की हवा. त्यादृष्टीने उभ्यानं, घाईघाईत पाणी पिण्याचे दुष्परिणाम जाणून घेऊ...



❊ घाईघाईने आणि उभ्यानं पाणी प्यायल्यानं शरीराच्या सांध्यातील द्रव पदार्थांचं संतुलन बिघडतं. त्यामुळे अचानक क्रॅम्प येणं किंवा सांधे दुखणं यासारख्या समस्या निर्माण होतात.

❊ उभ्यानं पाणी पिण्यापेक्षा बसून पाणी पिण्यानं शरीराला लाभ होतात. याचं कारण अभ्यानं पाणी प्यायल्यास स्नायू तसंच मज्जासंस्थेवर ताण अधिक येतो. बसून पाणी प्यायल्यास असा ताण येत नाही. त्यामुळे पाण्याबरोबर शरीरातील इतर पदार्थ पचण्यास मदत होते.

❊ आयुर्वेदातही शांतपणे, खाली बसून पाणी प्यावं असा सल्ला देण्यात आला आहे. खाली बसून, शांतपणे पाणी प्यायल्यास शरीरातील आम्लाच्या प्रमाणात समतोल राखला जातो, असं आयुर्वेदशास्त्र सांगतं.

❊ उभ्यानं प्यायलेलं पाणी शरीरात वेगानं वाहून जातं. त्यामुळे किडनी आणि मूत्राशयातील घाण तशीच राहते. यातून मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होऊ शकतो.

लाईफस्टाईल

झटपट होतील कामं

मुलांनो, तुम्हाला दिवसभरात बरंच काही करायचं असतं. सगळ्या कामांची यादी केली तर बरंच काही सोपं होऊन जाईल. वेळेचं नियोजन किंवा व्यवस्थापन वाटतं तितकं कठीण नक्कीच नाही.

❊ सर्वात आधी कामाचे प्राधान्यक्रम ठरवा. अभ्यास, खेळणं, मित्रमैत्रिणींसोबत गप्पा, चित्र काढणं, गाणी म्हणणं असं बरंच काही तुम्हाला करायचं असतं. आता यापैकी काय महत्त्वाचं आणि काय नंतर करता येईल हे ठरवा. महत्त्वाची कामं आधी करा. तुम्ही विद्यार्थी आहात. त्यामुळे अभ्यासाला महत्त्व द्यायला हवं.

❊ यानंतर कामाचं नीट नियोजन करा. पहिलं काम आधी करा, मग दुसरं काम अशाप्रकारे दिवसभराची कामं करत रहा. अशाप्रकारे आठवड्याचं नियोजन करा. तुमची कामं झटपट होऊ लागतील.

❊ प्रत्येक काम वेळेत पूर्ण करण्यावर भर द्या. गृहपाठ वेळेत पूर्ण झालाच पाहिजे. कोणतंही प्रोजेक्ट दिलेल्या तारखेच्या आधीच करून ठेवा. यामुळे तुमच्यावर ताण येणार नाही.

ब्युटी टॉक

त्वचेचा कोरडेपणा दूर करण्यासाठी

❊ घरात तसंच ऑफिसमध्ये ह्युमिडिफायरचा वापर करा. यामुळे त्वचेतला ओलावा टिकून राहिल.

❊ बाजारात हायड्रेटिंग मास्क मिळतात. अशा मास्कच्या वापरामुळे तुमच्या त्वचेतला ओलावा टिकून राहिल.

❊ या दिवसात गरमागरम चहा-कॉफी प्यावीशी वाटते. पण यातल्या कॅफेनमुळे त्वचेतला ओलावा कमी होतो. त्यामुळे अशा पेयांचं सेवन मर्यादित प्रमाणात करायला हवं. तसंच भरपूर पाणी प्यायला हवं.

❊ वातावरणातल्या गारव्यामुळे तुमची त्वचा निस्तेज आणि कोरडी होऊ शकते. त्यामुळे बाहेर जाताना हातमोजे, पायमोजे, स्कार्फचा वापर करा. तसंच उन्हात बाहेर पडताना सनस्क्रीन लावा. याच दिवसात सूर्याच्या अतिनील किरणांचा जास्त त्रास होतो.

पंचांग

रविवार, ८ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अश्विन कृ. १४ **(नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन)**, चंद्रराशी : तूळ, नक्षत्र : स्वाती, योग : आयुष्मान, सूर्योदय ६.४४, सूर्यास्त ६.००

फॉरवर्ड्स

पत्तें ग़वाही देतें हैं क़ी हर चीज़ क़ा एक़ अपना वक़्त होतां हैं...

टूटने क़ा, बिख़रनेका, औऱ संवरनेका....!

ग्रूमिंग

सणासुदीचे दिवस आणि त्यानंतर येणारी लग्नसराई यासाठी तुम्ही तयारीत रहायला हवं. बाजारात एथनिक्सची बरीच व्हरायटी पहायला मिळते. तुम्हीही तुमच्या एथनिक्सना वेगळा टच देऊ शकता.

❊ पांढऱ्या रंगाची नेहमीच चलती असते. यंदाही या रंगाची जादू कायम असेल. शॉर्ट कुर्त्यापासून लाँग कुर्त्यापर्यंत पांढऱ्या रंगात तुम्ही बरंच काही ट्राय करू शकता. पांढऱ्यावर पांढरं नेहमीच चांगलं दिसतं. मात्र व्हाईट कुर्त्यावर क्रीम पँट असंही कॉम्बिनेशन करता येईल. एखादा स्टोल घेऊन लूकला वेगळा ट्विस्ट देता येईल. **(क्रमशः)**

करिअरवाटा

लिगल आऊटसोर्सिंगचा हटके पर्याय

अलिकडच्या काळात इतर क्षेत्रांप्रमाणे कायद्याच्या क्षेत्रातही काही नव्या संकल्पना रूढ होत आहेत. त्याद्वारे कारकिर्दीच्या नव्या, हटक्या वाटा उपलब्ध होत आहेत. त्याविषयी जाणून घ्यायला हवं. विशेषत: या क्षेत्रात लिगल प्रोसेस आऊटसोर्सिंगद्वारे वकिली क्षेत्रातील तज्ज्ञ आपल्या क्लायंट्सना उत्तम सेवा देऊ शकतात. लिगल प्रोसेस आऊटसोर्सिंग ही प्रोजेक्ट ओरिएंटेड रोजगारवाट आहे. यामध्ये एखादी कंपनी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करण्याची इत्थंभूत जबाबदारी एखाद्या वकिलाकडे अथवा वकिलांच्या एखाद्या गटाकडे देऊ शकते. या मार्गानं त्यांच्या कायदेशीर कामांमध्ये शिस्तबद्धता, अचूकता येते. काही वर्षांसाठी करार करून या संस्था एकमेकांच्या बरोबर काम करतात. लिगल रिसर्च, ग्राफ्टिंग, ॲनॅलिसिस, लिगल बॅकएंड ऑपरेशन्समध्ये एलपीओ महत्त्वाचं योगदान देतं. नवं तंत्रज्ञान, नव्या व्यावसायिक संकल्पनांद्वारे हे काम होत असल्यानं अचूकता वाढते. लिटिगेशन सपोर्ट, कॉर्पोरेट लिगल सपोर्ट, कॉंट्रॅक्ट मॅनेजमेंट, लिटिगेशन प्रॉपर्टी आदींमध्ये एलपीओची महत्त्वाची भूमिका असू शकते. अशा संस्थेत काम करण्यासाठी जागतिक पातळीवर खऱ्या उतरणाऱ्या बौद्धिक क्षमतेची गरज आहे. वेगळं करून दाखवण्याचा ध्यास असल्यास ही वाट चोखाळणं योग्य ठरेल.



खेचाखेची

सुट्टी

हिटलर एकदा एका ज्योतिषाकडे गेला आणि त्याला म्हणाला, मी कधी मरणार आहे ?

ज्योतिषी : सर, तुम्ही मराल त्या दिवशी ज्यू लोकांचा सुट्टीचा दिवस असेल.

हिटलर : तुला कसं माहित तो सुट्टीचा दिवस असेल?

.
.

ज्योतिषी : सर तुम्ही मराल त्या दिवशी आनंद साजरा करायला ते नक्कीच सुट्टी घेणार ना.

वेगळं काही

प्रदूषणाची दाहकता नवी पिढी अनुभवते आहे. अशा परिस्थितीत तिन्ही जगाचा स्वामी म्हणजेच परमेश्वरही घुसमटतोय. भाविकांची तरी अशीच श्रद्धा आहे. उन्हाळ्यात थंडावा देण्यासाठी देवाच्या मूर्तीला चंदनाचा लेप लावला जातो तर थंडीत स्वेटर, कानटोपी घातली जाते. म्हणूनच मध्यंतरी देवाला प्रदूषणाचा त्रास होऊ नये, म्हणून मास्क घालण्यात आले होते. काशी-मथुरेतल्या बऱ्याच मंदिरांमध्ये ही युक्ती लढवण्यात आली होती. मधल्या काळात वाराणसीतल्या हवेचा दर्जा घसरला होता. याचा त्रास सर्वसामान्यांना झालाच शिवाय देवही गुदमरला! प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी प्रशासनाने शहराच्या काही भागात पाणी शिंपडलं.

भटकंती

बीचवरील भटकंतीपूर्वी...

सर्वसाधारणपणे डिसेंबर-जानेवारीचा कालावधी भटकंतीसाठी उत्तम मानला जातो. यात अनेकांना समुद्र किनारी फिरायला जायला आवडतं. समुद्रात डुंबायचं, वाळूत खेळायचं तर स्वीमिंग सूट, फ्लिप फ्लॉप, जास्तीचे कपडे असं साहित्य लागतं. पण यासोबत इतर काही वस्तूंची गरज भासते. या महत्त्वाच्या वस्तू कोणत्या जाणून घेऊ...



❊ ओल्या कपड्यांसाठी वेगळी बॅग ठेवा. पाण्यात खेळल्यावर स्विमिंग सूट आणि इतर कपडे ओले होतात. समुद्रावर वॉटर स्पोर्ट खेळताना कपडे ओले होतात. अशा वेळी अतिरिक्त बॅग असेल तर चेंज केल्यावर ओले कपडे ठेवणं सोपं जातं.

❊ मोकळ्या, स्वच्छ समुद्रकिनारी छत्रीखाली पडून रहायला खूप छान वाटतं. अशी मजा अनुभवणार असाल तर बीच कार्ट सोबत ठेवा. यामध्ये छत्री, खुर्ची, बीच बॅग आणि पाण्याची बाटली या वस्तू सहज बसतात. त्या कॅरी करणंही खूप सोपं जातं.

❊ समुद्रकिनारी उन्हाची तीव्रता जास्त असते. त्यामुळे सनस्क्रीन सोबत न्यायला विसरू नका. बाहेर पडताना चेहऱ्यावर सनस्क्रीन चोपडा. यामुळे त्वचा टॅन होणार नाही. पाण्यात जातानाही अंगाला सनस्क्रीन लावा.

सुडोकू १७२

८	३	७	१					
५				८	३	६		
				९		७	३	
			८		५	१		२
६								४
४		८	६		१			
	६	५		७				
		४	३	१				६
					६	८	२	३

टीप -

❊ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

❊ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

❊ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १७१चे उत्तर

८	३	१	७	४	९	५	६	२
५	९	६	२	१	८	३	४	७
७	२	४	५	३	६	८	१	९
४	५	७	६	२	३	१	९	८
६	१	९	४	८	५	७	२	३
२	८	३	९	७	१	४	५	६
९	७	८	१	५	२	६	३	४
१	४	२	३	६	७	९	८	५
३	६	५	८	९	४	२	७	१

शब्दकोडे क्रमांक १७२



आडवे शब्द :-

१) पं नरेन्द्र मोदीजींनी दिलेली एक घोषणा
१०) कोर्टातील दावा
१२) उघडझाप करणारे तोंड असलेली पैशाची छोटी थैली
१३) संगीतातील एक राग
१४) दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
१६) चुलती
१७) संगत
१८) जास्तीत जास्त
२०) हजार शेराचे वजन
२१) झकास मस्त
२२) मुलगी
२३) द्रवपदार्थ
२४) मंदवासर
२५) मर्यादा (इं.)
२६) गाडीचे छत
२८) तिबेटी धर्मगुरू
३०) सत्वांश
३१) एक कडवे धान्य
३३) समुद्र
३४) घोड्यावरून मारलेली फेरी
३६) कामदेव
३७) एखाद्या कुटुंबात एकच मुलगा असणे
४०) विचार, शक्ती धैर्य
४१) पिता
४२) रेशमी धोतर
४३) विपत्तीची कहाणी
४४) चरण
४५) बांगला देशाचे नाणे
४८) धपाटा
४९) वेळ वाया घालविणे
५२) गुत्ता
५३) पत्र(हिं)
५५) एक शब्दालंकार
५७) बोकड
५९) त्वरित
६१) मलई
६२) कल्पनेचा अतिरेक करणे (वा.प्र.)
६४) हिमालयातील केसाळ प्राणी
६८) खालतीच्या विरुद्ध
६९) सोनचाफा
७२) महिना
७३) लग्नासाठी जमलेले आप्त
७४) एक चतुर्थांश
७५) चित्रपटातील दुष्ट स्त्री
७६) तपस्या

उभे शब्द :-

१) साईबाबांचा एक उपदेश
२) दासी, दवंडी
३) लबाडीचा हेतू
४) संताप व्यक्त करताना केलेला आरडाओरडा, इ.
५) सारखा
६) माळी
७) स्वच्छ, निर्मळ
८) कर्णेंद्रिय
९) सरसकट
१०) बारीक दगड
११) संगोपन
१५) अरण्यवास
१७) लहान
१९) नमूना
२२) संरक्षक भिंत
२७) बिल्ला
२९) संगीतातील एक राग
३१) वाद्य वाजविणारा
३२) एक तार वाद्य
३५) कंबर (ग्रा.)
३६) मनसोक्त
३८) निसर्ग (हिं.)
३९) मेंढा
४०) मिळकत आणि खर्च
४४) पातक
४६) कार्य
४७) संगीतातील एक राग
५०) शरम
५१) जावळा
५३) धोकादायक
५४) जागृत
५६) मोठी कवडी, एक पक्षी
५७) अकस्मात
५८) दर्पण
६०) चेह-यावरील तेज
६३) राष्ट्र, देश
६५) छिद्रातून जमिनीवर पडणारे उन
६६) वाईट इच्छा
६७) पृष्ठभागावरील निघालेला तुकडा
७०) नाकावरील मोत्याचा दागिना
७१) चाफा
७२) सामान

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

तु	म	मु	झे	खू	न	दो	मै	तु	म्हे	आ	जा	दी	दूं	गा
ळ		का	ला		व		ना	ट		खा	ण			ज
स	ल	मा		आ	रा	म		क	र	डा		प	गा	र
	ग	र	मा	ई		घु	रा		ज		ढो	ल		ह
भा	त		रा		वा	क	डा	ति	क	डा		ट	पा	ल
र		दि	मा	ख	दा	र		प्प		स	हा	ण		वा
वा	ता	व	र	ण			स	ट	वी		पू		स	
ह		स		ख	रो	ख	र		र	वे	स		व	र
क	स		पा	णी		प्प		अं	म	ळ		धा	ड	स
	रा	तो	रा	त		ड	फ		र		पो	क		क
मा	फ		वा		भा		रा	व	ण	भा	त		पा	स
हि		क	र		न	क	ळ	त		स्क		मा	न	णे
त	पा	स		पा		ष्ट		न	ग	र	से	व	क	
गा		र	ज	प	ज		ग	वा	र		ना			चा
र	ज	त	व	णी		ना	वा	डी		ध	नी	गो	सा	वी

पालकत्वाची नवी दिशा : मुलांना घडवताना पालकांनी स्वतःलाही घडवावे



सुनील गवळी

मुलाचा जन्म होतो तेव्हा केवळ एका कुटुंबात नवीन सदस्याचे आगमन होत नाही, तर एका नव्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीची सुरुवात होते. त्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याची पहिली आणि सर्वांत महत्त्वाची जबाबदारी पालकांची असते. मुलाला जन्म देणे ही निसर्गाची प्रक्रिया आहे; परंतु त्याला समजूतदार, संवेदनशील, आत्मविश्वासपूर्ण आणि जबाबदार माणूस बनवणे ही पालकत्वाची खरी कसोटी आहे. मुलांच्या संगोपनात अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आर्थिक सुविधा जितक्या महत्त्वाच्या आहेत, तितकेच महत्त्व प्रेम, सुरक्षितता, विश्वास, संवाद आणि योग्य संस्कार यांनाही आहे. कारण मुलांचे व्यक्तिमत्त्व केवळ आपण त्यांना काय देतो यावर घडत नाही, तर आपण त्यांच्याशी कसे वागतो यावरही घडत असते.

आज अनेक पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी, भविष्यासाठी आणि यशासाठी प्रचंड मेहनत घेत आहेत. मुलांना चांगल्या शाळेत प्रवेश मिळावा, त्यांना आधुनिक सुविधा मिळाव्यात, त्यांनी स्पर्धेत पुढे राहावे, चांगले गुण मिळवावेत आणि आयुष्यात यशस्वी व्हावे, यासाठी पालक सतत प्रयत्नशील असतात. मात्र या धावपळीत मुलांच्या मनात काय चालले आहे, त्यांना कोणत्या गोष्टींची भीती वाटते, कोणत्या प्रसंगामुळे आनंद होतो, त्यांना नेमके काय सांगायचे आहे, याकडे कधीकधी दुर्लक्ष होते. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीची काळजी घेताना त्यांच्या भावनिक विकासाकडेही तितक्याच गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. कारण हुशार विद्यार्थी घडवणे महत्त्वाचे असले, तरी आनंदी, आत्मविश्वासपूर्ण आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाणारा माणूस घडवणे त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.

पालकत्व म्हणजे मुलांवर सतत नियंत्रण ठेवणे नव्हे, तर त्यांना योग्य दिशा देणे होय. प्रत्येक मुलाचा स्वभाव, आवड, क्षमता, विचार करण्याची पद्धत आणि शिकण्याचा वेग वेगळा असतो. त्यामुळे सर्व मुलांकडून एकसारखी अपेक्षा ठेवणे योग्य नाही. एखादे मूल अभ्यासात चांगले असेल, तर दुसरे कला, खेळ, निरीक्षण, कल्पकता किंवा व्यवहारज्ञानात विशेष असू शकते. मुलांची तुलना इतर मुलांशी केल्याने त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. त्याऐवजी कालच्या स्वतःच्या कामापेक्षा आज आपण काय सुधारणा केली, याची जाणीव करून दिली पाहिजे. मुलाला स्वतःची क्षमता ओळखण्याची संधी मिळाली, तर त्याचा आत्मविश्वास हळूहळू विकसित होतो.

मुलांच्या मनात अनेक प्रश्न असतात. काही प्रश्न साधे असतात, तर काही त्यांच्या भावविश्वाशी संबंधित असतात. मुलांनी प्रश्न विचारले की त्यांना गप्प बसवण्याऐवजी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकले पाहिजे. मुलाने चूक केली, अभ्यास केला नाही किंवा अपेक्षेप्रमाणे वागले नाही, तर लगेच रागावण्याऐवजी त्या वर्तनामागील कारण समजून घेणे आवश्यक आहे. कधीकधी मुलाचे चुकीचे वर्तन हे आळशीपणामुळे नसते, तर भीती, असुरक्षितता, थकवा, अपयशाची चिंता किंवा लक्ष वेधून घेण्याच्या गरजेमुळेही असू शकते. मुलाचे वर्तन सुधारण्यापूर्वी त्याच्या मनाची अवस्था समजून घेणे ही सकारात्मक पालकत्वाची पहिली पायरी आहे. मुलांना प्रेम देणे म्हणजे त्यांच्या प्रत्येक हट्टाला मान्यता देणे नव्हे. प्रेमाबरोबर योग्य मर्यादा आणि शिस्त असणेही आवश्यक आहे. मुलांना काय करावे आणि काय करू नये, याची स्पष्ट जाणीव असली पाहिजे. घरातील नियम सर्वांना समजतील असे आणि वयानुसार योग्य असावेत. नियम मोडल्यास त्याचे परिणाम काय असतील, हे मुलांना आधीच सांगितले पाहिजे. मात्र शिस्त लावताना अपमान, मारहाण, धमकी किंवा सतत दोष देण्याचा मार्ग स्वीकारू नये. अशा वर्तनामुळे मुलांमध्ये भीती निर्माण होऊ शकते; परंतु योग्य समज निर्माण होईलच असे नाही. मुलाला त्याची चूक समजावून सांगणे, त्या चुकीचा परिणाम दाखवणे आणि ती सुधारण्याची संधी देणे अधिक परिणामकारक ठरते. शिस्त ही मुलाला घाबरवण्यासाठी नसून त्याला स्वतःच्या वर्तनाची जबाबदारी स्वीकारण्यास शिकवण्यासाठी असावी. मुलांच्या भावनिक विकासासाठी पालकांनी त्यांच्या भावनांना महत्त्व दिले पाहिजे. मूल रडत असेल, रागावले असेल, निराश झाले असेल किंवा घाबरले असेल, तर त्याला लगेच शांत राहण्याचा आदेश देऊ नये. त्याऐवजी त्याची भावना समजून घेण्याचा प्रयत्न करावा. ''तुला वाईट वाटले आहे का?'', ''नेमके काय झाले?'', ''आपण यावर एकत्र विचार करूया'', अशा साध्या वाक्यांतून मुलाला आधार मिळू शकतो. प्रत्येक वेळी मुलाची समस्या पालकांनीच सोडवली पाहिजे असे नाही; कधीकधी त्याचे म्हणणे ऐकून घेणे आणि त्याला स्वतः उपाय शोधण्यास मदत करणे पुरेसे असते. अशा अनुभवांतून मुलांना स्वतःच्या भावना ओळखणे, त्यावर नियंत्रण ठेवणे आणि इतरांच्या भावनांचा आदर करणे शिकता येते. आजच्या काळात मुलांच्या हातात मोबाईल, इंटरनेट आणि विविध डिजिटल साधने लहान वयातच येत आहेत. तंत्रज्ञानाचा योग्य वापर मुलांच्या ज्ञानात भर घालू शकतो; परंतु त्याचा अतिरेक अभ्यास, झोप, खेळ, शारीरिक हालचाल आणि प्रत्यक्ष संवादावर परिणाम करू शकतो. त्यामुळे पालकांनी केवळ मुलांना मोबाईल वापरण्यापासून रोखणे पुरेसे नाही, तर स्वतःच्या वापरातूनही योग्य उदाहरण निर्माण केले पाहिजे. घरात एकत्र जेवताना, संवाद साधताना किंवा कुटुंबासोबत वेळ घालवताना मोबाईल बाजूला ठेवण्याची सवय लावावी. मुलांना मैदानी खेळ, वाचन, चित्रकला, संगीत, घरातील छोटी कामे आणि मित्रांसोबत प्रत्यक्ष संवाद यासाठी प्रोत्साहन द्यावे. मुलांच्या जीवनात तंत्रज्ञान असावे; पण त्यांच्या संपूर्ण जीवनावर त्याचे नियंत्रण नसावे.

मुलांना स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांच्या वयानुसार लहान जबाबदाऱ्या दिल्या पाहिजेत. स्वतःची पुस्तके व्यवस्थित ठेवणे, शाळेची बॅग तयार करणे, स्वतःच्या वस्तूंची काळजी घेणे, घरातील छोट्या कामांत मदत करणे अशा कृतींमधून जबाबदारीची भावना विकसित होते. प्रत्येक काम पालकांनीच करून दिल्यास मुलांना सुविधा मिळतील; परंतु स्वतः निर्णय घेण्याचा आणि काम पूर्ण करण्याचा आत्मविश्वास निर्माण होणार नाही. मुलांना चुका करण्याची आणि त्या सुधारण्याची संधी देणे आवश्यक आहे. प्रत्येक वेळी अपयशापासून वाचवण्यापेक्षा अपयशातून पुन्हा उभे राहण्याची ताकद देणे अधिक महत्त्वाचे आहे. किशोरवयात मुलांच्या वर्तनात अनेक बदल घडतात. त्यांना स्वतःचे विचार मांडावेसे वाटतात, स्वतंत्र निर्णय घ्यावेसे वाटतात आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावीशी वाटते. या काळात पालकांनी प्रत्येक गोष्टीत हस्तक्षेप केल्यास मुलांमध्ये दुरावा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्याशी मित्रत्वाचा संवाद ठेवणे आवश्यक आहे. मात्र मित्रत्वाचा अर्थ पालकांची जबाबदारी विसरणे असा नाही. मुलांना स्वातंत्र्य देतानाच योग्य-अयोग्याची जाणीव करून देणे, निर्णयांचे परिणाम समजावणे आणि आवश्यक तेथे ठाम भूमिका घेणे गरजेचे आहे. विशेषतः मित्रपरिवार, इंटरनेटवरील संपर्क, वैयक्तिक सुरक्षितता आणि अभ्यासाच्या सवयी याबाबत संवाद खुला असावा. मुलांनी एखादी अडचण सांगितली तर त्यांना दोष दिला जाईल अशी भीती वाटता कामा नये. भावंडांमध्ये भांडणे, मतभेद किंवा स्पर्धा होणे स्वाभाविक आहे. अशा वेळी एका मुलाची बाजू घेऊन दुसऱ्याला दोषी ठरवण्याऐवजी दोघांचे म्हणणे ऐकून घ्यावे. प्रत्येक मुलाला घरात आपल्याला समान प्रेम आणि महत्त्व मिळते, अशी भावना असणे आवश्यक आहे. मुलांना वस्तू वाटून घेणे, एकमेकांचा आदर करणे, माफी मागणे आणि मतभेद शांतपणे सोडवणे शिकवले पाहिजे. या छोट्या अनुभवांतूनच सामाजिक जीवनासाठी आवश्यक असलेली समज विकसित होते.

पालकांनी मुलांसाठी आदर्श निर्माण करणे हे केवळ उपदेश करण्यापेक्षा अधिक प्रभावी असते. घरात मोठ्यांचा एकमेकांशी होणारा संवाद, राग व्यक्त करण्याची पद्धत, इतरांबद्दलचा आदर, प्रामाणिकपणा, वेळेचे नियोजन आणि जबाबदारीची जाणीव या गोष्टी मुलांच्या मनावर खोलवर परिणाम करतात. पालक मुलांना खोटे बोलू नको असे सांगत असतील, तर स्वतःच्या वर्तनातूनही प्रामाणिकपणा दाखवला पाहिजे. मुलांना संयम शिकवताना पालकांनी स्वतः संयम राखला पाहिजे. मुलांना इतरांचा आदर करण्यास सांगताना घरातील प्रत्येक व्यक्तीशी आदराने वागले पाहिजे. कारण मुलांसाठी पालकांचे दैनंदिन वर्तन हेच सर्वांत जवळचे शिक्षण असते.

पालकांनी स्वतःच्या अपेक्षांचाही विचार करणे आवश्यक आहे. अनेकदा मुलांनी जे साध्य केले नाही, ते स्वतःचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी पालक त्यांच्यावर दबाव आणतात. परंतु प्रत्येक मुलाचे आयुष्य स्वतंत्र असते. त्याची स्वप्ने, आवडी आणि क्षमता वेगळ्या असू शकतात. पालकांनी मार्गदर्शन करावे, संधी उपलब्ध करून द्याव्यात आणि योग्य निर्णय घेण्यासाठी मदत करावी; परंतु मुलांच्या आयुष्याचा संपूर्ण आराखडा स्वतः ठरवू नये. मुलांना स्वतःची दिशा शोधण्याची संधी देणे म्हणजे त्यांना एकटे सोडणे नव्हे, तर त्यांच्या पाठीशी विश्वासाने उभे राहणे होय.

संशोधनातूनही पालक आणि मुलांमधील प्रेमळ, सुरक्षित आणि विश्वासपूर्ण नात्याचा मुलांच्या भावनिक स्थैर्याशी, सामाजिक कौशल्यांशी आणि आत्मविश्वासाशी सकारात्मक संबंध असल्याचे दिसून येते. मुलांना स्वीकारले जाते, त्यांचे म्हणणे ऐकले जाते आणि त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले जाते, तेव्हा त्यांच्यात स्वतःबद्दल सकारात्मक भावना निर्माण होण्यास मदत होते. येथे कौतुक करताना केवळ गुण किंवा यश यांनाच महत्त्व देऊ नये. प्रयत्न, प्रामाणिकपणा, चिकाटी, सहकार्य आणि सुधारण्याची तयारी यांचेही कौतुक केले पाहिजे. त्यामुळे मुलांना यश मिळवण्याबरोबरच चांगले प्रयत्न करणे आणि अपयशातून शिकणे यांचे महत्त्व समजते. शेवटी, पालकत्व ही एकदाच शिकून संपणारी गोष्ट नाही. मुलांच्या वयानुसार, परिस्थितीनुसार आणि बदलत्या गरजांनुसार पालकांनीही स्वतःमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

कधी मुलांचे ऐकावे लागते, कधी समजावून सांगावे लागते, कधी ठाम राहावे लागते, तर कधी स्वतःची चूक मान्य करून मुलांची माफीही मागावी लागते. पालकांनी परिपूर्ण असण्याची गरज नाही; मात्र शिकण्याची आणि सुधारण्याची तयारी असणे आवश्यक आहे. मुलांसमोर आपली चूक मान्य करणारा पालक मुलांना नम्रता आणि जबाबदारीचा मोठा धडा देतो. मुलांना महागड्या वस्तू, मोठ्या सुविधा आणि भरपूर संपत्ती देण्यापेक्षा त्यांना प्रेमाने भरलेले घर, मोकळेपणाने बोलण्याचे स्वातंत्र्य, योग्य मर्यादा, सुरक्षिततेची भावना आणि स्वतःवर विश्वास ठेवण्याची ताकद देणे अधिक मोलाचे आहे. कारण बालपणी मिळालेला भावनिक आधार आयुष्याच्या अनेक टप्प्यांवर मुलांना बळ देत असतो. उद्याचा सुजाण नागरिक, संवेदनशील माणूस आणि जबाबदार व्यक्तिमत्त्व घडवायचे असेल, तर आजच्या पालकत्वात समजूतदारपणा, संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन आणणे गरजेचे आहे. मुलांना घडवण्याची सुरुवात त्यांना बदलण्यापासून नव्हे, तर त्यांना समजून घेण्यापासून होते. पालकांनी मुलांचे हात धरून त्यांना चालायला शिकवावे; पण योग्य वेळ आल्यावर स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे धैर्यही द्यावे. कारण खरे पालकत्व मुलांना आपल्या सावलीत कायम ठेवण्यात नसून, स्वतःच्या प्रकाशात जीवनाचा मार्ग शोधण्यास सक्षम बनवण्यात आहे. **

संस्कृती, समृद्धी आणि राजगतेचा दीपयोग

अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा दीपोत्सव हा केवळ दिव्यांचा सण नसून भारतीय संस्कृती, अर्थव्यवस्था आणि मानवी मूल्यांचा अनोखा संगम आहे. रामायणापासून नरकचतुर्दशीपर्यंतच्या पौराणिक संदर्भांनी समृद्ध असलेला हा उत्सव बाजारात चैतन्य फुलवतो, वंचितांच्या दारी उजेड पेरण्याची शिकवण देतो; पर्यावरणाचे भान जपत निसर्गाशी नाते जोडण्याचेही आवाहन करतो. आता समाजाला त्याचे मनस्वी वेध लागले आहेत.



अरुण म्हात्रे

प्रत्येक भारतीयाला पुलकीत करणाऱ्या दिवाळीचे वेध लागताच मनातला तसेच आसमंतातला उत्साह सर्वत्र अनुभवायला मिळू लागतो. अशा वेळी निसर्गरम्य दिवाळीची आठवण करून देणाऱ्या काव्यपंक्ती नकळतच माझ्या मनात उमटतात आणि शब्द होऊन अलगद उतरतात.

प्राचीवरती फूल तांबडे सजते अंबर..
आणि पसरतो गुलाल दिवसाच्या भाळावर..
लक्ष कळ्यांचा लाल ताटवा झुले नभावर..
जणू केशरी सुरू प्रार्थना तरुशिखरांवर...

मला वाटते, दिवाळी केवळ माणसांच्या घरांमध्ये नसते. ती निसर्गाच्या रंगांत, पक्ष्यांच्या किलबिलाटात आणि फुलांच्या बहरातही असते, याची जाणीव निसर्ग आपल्याला त्याच्या बदलत्या रूपातून करून देत असतो. गावाकडच्या दिवाळीत खाण्यापिण्याची चंगळ असे. पांढऱ्या-ज्वारीच्या भाकऱ्या, परसातल्या भाज्या आणि ताजे मासे यांची चव आजही माझ्या जिभेवर रेंगाळते आहे. मुंबईहून वडील शनिवारी गावी येणार म्हणून मी बसस्थानकावर त्यांची वाट पहात असे. त्यांच्या पिशव्यांमध्ये आमच्यासाठी फटाके, कपडे आणि भेटवस्तू असत. आम्हाला त्याची मोठीच उत्सुकता असे. एका दिवाळीत त्यांनी मोठा रेडिओ आणला. ती माझ्या आयुष्यातली अविस्मरणीय दिवाळी होती. वर्गात पहिला येत असल्यामुळे गावातल्या घरांमध्येही माझे कौतुक होत असे. कुणी हातावर करंजी ठेवत असे, तर कुणी प्रेमाने काही खाऊ ठेवत असे. दिवाळी म्हणजे फराळाबरोबर मिळणारा मायेचा घासही असतो, हे तिथेच उमगले.

सातवीनंतर विक्रोळीच्या टागोरनगरमध्ये आलो. तिथे दिवाळीचे वेगळेच रूप पाहिले. हाऊसिंग बोर्डाच्या ५४ इमारती एकाच पद्धतीच्या कंदिलांनी उजळून निघायच्या. पवईच्या डोंगरावरून ही रोषणाई पाहण्यात वेगळीच मजा होती. त्या दृश्याचं वर्णन करताना शब्द कमीच पडतात.

'निळेभोर आकाश जणू, वर मंडप मोठा..
आणि फुलांची रंग दिवाळी येता जाता..
इमारतींच्या लक्ष गॅलऱ्या झगमगतात दिव्यांनी..
जणू दिव्यांचे छप्पर उतरे गर्दीच्या रस्त्यांनी'

खरेच, शहरातील दिवाळी म्हणजे दिव्यांनी सजलेला एक भव्य सोहळाच. घराघरांत लाडू, चकली, शंकरपाळे बनत. आमचा आगरी फराळ आणि शेजाऱ्यांचा मालवणी फराळ. पण आनंद मात्र एकच. दूधवाटपाच्या कामामुळे मराठी, गुजराती आणि दक्षिण भारतीय कुटुंबांशी माझा जिव्हाळा निर्माण झाला. दिवाळीत ते मला फराळासाठी आवर्जून बोलवत असत. दूध पोहोचवणारा मुलगा म्हणून नव्हे, तर घरातलाच एक म्हणून मिळणारे प्रेम हीच माझी खरी कमाई होती. डोंगरीचा आपलेपणा, हाशिवऱ्याचा निसर्ग आणि विक्रोळीच्या कंदिलांचा प्रकाश या आठवणी आजही मनात तेवत आहेत. आज ठाण्यात राहून दिवाळीचे बदललेले रूप पाहताना या आठवणी अधिक महत्त्वाच्या वाटतात. एका बाजूला मॉलमधला झगमगाट, ब्रँडेड वस्तूंची रेलचेल आणि खरेदीची स्पर्धा आहे. दुसरीकडे दिवाळी पहाट, कवितांचे आणि गाण्यांचे कार्यक्रम यातून सणाचा आनंदाचा सुंदर अनुभव आहे. मीही निवृत्तीनंतर निवेदन, कविता आणि गाण्यांच्या माध्यमातून लोकांच्या आनंदात सहभागी होतो. काळ बदलला, पद्धती बदलल्या; पण त्या जुन्या आठवणींमधला आपलेपणा आजही मनाला ऊब देतो. आज सोशल मीडियावर दिवाळीचे फोटो टाकणे, शुभेच्छा देणे ही सण साजरा करण्याची नवी पद्धत झाली आहे. त्यात गैर काहीच नाही. तंत्रज्ञानामुळे दूर असलेली माणसेही एकमेकांच्या आनंदात सहभागी होऊ शकतात. मात्र दिवाळी म्हणजे केवळ सुंदर कपडे घालून, घर सजवून फोटो काढणे आणि जगाला दाखवणे एवढेच नाही. आपल्या माणसांना प्रत्यक्ष भेटणे, त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारणे, फराळाचा आस्वाद घेत नात्यांमधला जिव्हाळा वाढवणे यांनाही तितकेच महत्त्व आहे.

मला वाटते की, दिवाळीच्या परंपरांमागचा अर्थ पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणेही तितकेच गरजेचे आहे. नरक चतुर्दशीची कथा वाईटावर चांगल्याच्या विजयाची आठवण करून देते. वसुबारस प्राणिमात्रांविषयीची कृतज्ञता आणि निसर्गाशी असलेले आपले नाते अधोरेखित करते. केवळ पूजा, शुभेच्छा आणि सोशल मीडियावरील संदेश यापुरत्या परंपरा मर्यादित नाहीत. त्यामागची मूल्ये मुलांच्या मनात रुजवण्यासाठी घरातील ज्येष्ठांनी त्यांच्याशी संवाद साधायला हवा. परंपरा पुढे नेणे म्हणजे केवळ विधींची पुनरावृत्ती नव्हे, तर त्यातील जीवनमूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे. रांगोळी, पणत्या, आकाशकंदील आणि फटाके हे दिवाळीचे पारंपरिक घटक आहेत. त्यांच्याशी आपल्या आठवणी आणि भावनाही जोडलेल्या आहेत. मात्र आज प्रदूषण, पाण्याची टंचाई आणि पर्यावरणाचा ऱ्हास ही गंभीर आव्हाने आपल्यासमोर आहेत.

'कळते आहे, दीपावलीवर सावट दुष्काळाचे
दुःख आहे हे आपल्यास्तव, श्रमणाऱ्या बळीराजाचे
उधळू नका हो उगाच पैसे दिवाळीच्या कैफात
दुष्काळाशी लढणाऱ्यांना देऊ थोडा हात...

दिवाळीचा आनंद साजरा करताना सामाजिक बांधिलकी विसरून चालणार नाही. यंदा दुष्काळाचं सावट असताना पाणीटंचाईचा प्रश्न विशेष गांभीर्याने समजून घेण्याची गरज आहे. कोकणातले पावसाचे पाणी समुद्रात मिसळून जाते. मराठवाड्यात पाण्यासाठी वणवण करावी लागते. या विरोधाभासावर विचार करून पावसाचे पाणी अडवणे-जिरवणे, शेततळी आणि लहान बंधारे उभारणे, जुन्या तलावांचे पुनरुज्जीवन करणे आणि घरांमध्ये पावसाचे पाणी साठवणे अशा उपायांना प्राधान्य द्यायला हवे. पाण्याचा काटकसरीने वापर आणि गावपातळीवरील जलनियोजन ही केवळ शासनाची नव्हे, तर समाजातील प्रत्येकाची जबाबदारी आहे. सणाच्या निमित्ताने केवळ तात्पुरती मदत करण्यापलिकडे जाऊन अशा समस्यांवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी लोकसहभाग वाढवणे आवश्यक आहे. मी दिवाळीमध्ये एका संस्थेच्या माध्यमातून सुधागड परिसरातील आदिवासी बांधवांपर्यंत फराळ घेऊन जातो. बालसुधारगृहातील मुलांसाठी गाणी म्हणतो. वृद्धाश्रमातही कार्यक्रम करतो. माझ्या कलेतून आणि दिलेल्या वेळेतून कुणाच्या चेहऱ्यावर हसू फुलत असेल, तर तोच दिवाळीचा खरा आनंद आहे. आपल्या आनंदात दुसऱ्यालाही सहभागी करून घेण्याची भावना कृतीतून व्यक्त झाली, तर सणाचे समाधान किती तरी पटींनी वाढते. गरजूंच्या घरात फराळ पोहोचवणे, एकट्या पडलेल्या ज्येष्ठांना वेळ देणे, वंचित मुलांसोबत आनंदाचे क्षण घालवणे किंवा निसर्गाच्या संवर्धनासाठी हातभार लावणे, या प्रत्येक कृतीमध्ये एक पणती उजळवण्याची ताकद आहे. माझ्या मते, आजच्या दिवाळीत तीन मूल्यं जपली पाहिजेत- संयम, कृतज्ञता आणि माणुसकी. खरेदीच्या स्पर्धेत सहभागी होण्यापेक्षा गरजेपुरती खरेदी करून उरलेले पैसे गरजू कुटुंबांसाठी किंवा दुष्काळग्रस्तांसाठी वापरता येतील. झाडे तोडून, डोंगर उद्ध्वस्त करून आणि नद्या प्रदूषित करून साजरी होणारी दिवाळी नको. माझ्या बालपणीची हिरवाई, पक्ष्यांचा किलबिलाट आणि झाडांची सळसळ पुढच्या पिढ्यांनाही अनुभवता यायला हवी. आपण निसर्गाकडून घेतो, त्याबद्दल कृतज्ञ राहून त्याच्या जतनासाठीही काही केले पाहिजे. खरी दिवाळी केवळ दिव्यांच्या रोषणाईत नाही, तर माणसामाणसांत जपलेल्या प्रेमात, निसर्गाविषयीच्या कृतज्ञतेत आणि वाटून घेतलेल्या आनंदात असते. परंपरेचा प्रकाश जपत माणुसकीचा सुगंध सर्वदूर पसरवणारी दिवाळी आपण साजरी करूया. ही दिवाळी सुखाची, समृद्धीची, पर्यावरणपूरक आणि माणुसकीने उजळलेली होवो, हीच मनापासून सदिच्छा.

(शब्दांकन : मेधा इनामदार) **

जीवनदान ज़िल्हा परिषद शाळांना!

संजय कचरे

५. पालक आणि ग्रामसमुदायाचा सक्रिय सहभाग

शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, पालक आणि स्थानिक नागरिक यांच्या सहभागातून शाळा विकास आराखडा तयार करावा. ग्रामसभांमध्ये शाळेच्या प्रश्नांवर चर्चा व्हावी. शाळेतील उपक्रमांमध्ये पालकांचा सहभाग वाढवावा. प्रत्येक गावाने आपल्या शाळेला गावाच्या विकासाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू मानावे.

६. विद्यार्थी-केंद्रित आणि जीवनोपयोगी शिक्षण

पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता शेती, पर्यावरण, आरोग्य, स्थानिक व्यवसाय, विज्ञान, आर्थिक साक्षरता, कला, क्रीडा आणि जीवनकौशल्ये यांचा शिक्षणात समावेश करावा. मुलांमध्ये जिज्ञासा, चिकित्सक विचार, समस्या सोडविण्याची क्षमता, संवादकौशल्य आणि आत्मविश्वास विकसित करावा.

७. स्थलांतरित मुलांसाठी विशेष शैक्षणिक व्यवस्था

स्थलांतरित कुटुंबांचे सर्वेक्षण, विद्यार्थ्यांची नोंदणी, शाळांमधील समन्वय, हंगामी शिक्षण केंद्रे आणि पूरक शिक्षण व्यवस्था विकसित करावी. स्थलांतरामुळे कोणत्याही मुलाचे शिक्षण खंडित होणार नाही, यासाठी स्थानिक प्रशासन आणि शिक्षण विभागाने समन्वयाने काम करावे.

८. आणि स्वयंसेवी संस्थांचा दीर्घकालीन सहभाग

संस्थांनी ग्रामीण शिक्षणाला केवळ पायाभूत सुविधा पुरविण्यापुरते मर्यादित ठेवू नये. शाळांचे सर्वांगीण परिवर्तन हे उद्दिष्ट ठेवून डिजिटल शिक्षण, ग्रंथालये, विज्ञान प्रयोगशाळा, शिक्षक प्रशिक्षण, गुणवत्ता व्यवस्थापन, विद्यार्थी विकास आणि नियमित परिणाममापन अशा उपक्रमांना प्राधान्य द्यावे.

गुंतवणुकीचा भर केवळ किती सुविधा निर्माण केल्या यावर नसून, त्या सुविधांमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत आणि शाळेच्या गुणवत्तेत किती सुधारणा झाली, यावर असावा.

५. शाळा परिवर्तनाची सामूहिक जबाबदारी : शासन, समाज आणि यांची भागीदारी

जिल्हा परिषद शाळांचे पुनरुज्जीवन हे केवळ शिक्षण विभागाचे काम नाही. यासाठी सर्व संबंधित घटकांची भूमिका स्पष्ट असणे आवश्यक आहे.

शासन आणि शिक्षण विभाग : शैक्षणिक धोरण, शिक्षक उपलब्धता, संसाधने, गुणवत्ता नियंत्रण आणि सातत्यपूर्ण शैक्षणिक मार्गदर्शन.

ग्रामपंचायत : शाळेच्या विकासासाठी स्थानिक नियोजन, पायाभूत सुविधा आणि ग्रामसमुदायाचा सहभाग.

शिक्षक : गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची अध्ययन प्रगती आणि नव्या शैक्षणिक पद्धतींचा अवलंब.

पालक आणि समुदाय : नियमित उपस्थिती, शाळेतील सहभाग आणि शाळेवरील विश्वास वाढविणे.

संस्था आणि स्वयंसेवी संस्था: तांत्रिक सहकार्य, क्षमता विकास, पायाभूत सुविधा, नवकल्पना आणि परिणामाधारित दीर्घकालीन भागीदारी.

या सर्व घटकांनी एकत्रितपणे काम केल्यास शाळा विकास हा केवळ प्रकल्प न राहता गावाच्या शाश्वत विकासाचा भाग बनू शकतो.

६. यशाचे मोजमाप : किती उपक्रम केले यापेक्षा काय बदल घडला?

शाळा विकासाचे मूल्यमापन केवळ किती वर्गखोल्या रंगविल्या, किती संगणक दिले किंवा किती उपक्रम राबविले यावर आधारित असू नये.

खरा बदल पुढील बाबींमध्ये दिसला पाहिजे:

विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि शाळेतील टिकाव वाढणे.

वाचन, लेखन आणि गणितीय क्षमतांमध्ये सुधारणा होणे.

शाळाबाह्य मुलांची संख्या कमी होणे.

मुलींच्या शिक्षणातील सहभाग वाढणे.

पालकांचा शाळेवरील विश्वास वाढणे.

शिक्षकांच्या अध्यापन पद्धतींमध्ये सुधारणा होणे.

शाळा व्यवस्थापनात ग्रामसमुदायाचा सक्रिय सहभाग वाढणे. शाळेची गुणवत्ता बाह्य मदतीशिवाय टिकविण्याची क्षमता विकसित होणे.

या दृष्टिकोनातून शाळा विकासाचे नियोजन, अंमलबजावणी आणि परिणाममापन केले पाहिजे. कारण शाळेच्या परिवर्तनाचा खरा पुरावा विद्यार्थ्यांच्या शिकण्यात आणि त्यांच्या जीवनात घडणाऱ्या सकारात्मक बदलात दिसला पाहिजे.

समारोप : एका शाळेचे पुनरुज्जीवन म्हणजे एका गावाच्या भविष्याचे पुनर्निर्माण!

आज आपल्यासमोर दोन पर्याय आहेत. कमी पटसंख्येच्या कारणास्तव शाळा बंद होण्याची वाट पाहणे किंवा त्या शाळेची कारणे समजून घेऊन तिच्या गुणवत्तावाढीसाठी नियोजनबद्ध प्रयत्न करणे.

शाळा बंद करणे हा कदाचित प्रशासकीयदृष्ट्या सोपा पर्याय असू शकतो; परंतु त्या शाळेवर अवलंबून असलेल्या मुलांचे, पालकांचे आणि संपूर्ण गावाचे भविष्य लक्षात घेतल्यास शाळेला सक्षम करण्याच्या पर्यायाला प्राधान्य मिळाले पाहिजे.

मराठी जिल्हा परिषद शाळा बदलल्या पाहिजेत. त्यांचे शैक्षणिक वातावरण आधुनिक झाले पाहिजे. शिक्षकांमध्ये नवी ऊर्जा निर्माण झाली पाहिजे. पालकांचा विश्वास पुन्हा संपादन झाला पाहिजे आणि गावाने आपल्या शाळेची जबाबदारी अभिमानाने स्वीकारली पाहिजे. शाळा वाचविणे हे पहिले पाऊल आहे; शाळा सक्षम करणे हे आपले ध्येय आहे आणि प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. कारण शाळा ही केवळ चार भिंतींची इमारत नसते; ती एका पिढीच्या स्वप्नांची, आशांची आणि भविष्याची सुरुवात असते. आज आपण एका शाळेचे पुनरुज्जीवन केले, तर उद्या त्या शाळेतून अनेक पिढ्यांचे भविष्य उजळू शकते. चला, जिल्हा परिषद शाळांना जीवनदान देऊया! त्यांना गुणवत्तेची नवी ओळख देऊया आणि ग्रामीण शिक्षणाच्या परिवर्तनाचे केंद्र बनवूया! शाळा सक्षम झाली, तर विद्यार्थी सक्षम होतील; विद्यार्थी सक्षम झाले, तर गाव सक्षम होईल; आणि सक्षम गावातूनच विकसित राष्ट्राची निर्मिती होईल. **

वर्तक मसालेनी जपली परंपरा



एखादा व्यवसाय उभा केल्यावर तो कायम टीकून ठेवणे फार कठीण असते. अलिबागमधील वरसोली येथील वर्तक मसालेनी ३६ वर्षाची परंपरा जपली आहे. घरगुती पद्धतीचे सर्व प्रकारच्या मसाल्याची चव, गुणवत्ता आणि शुध्दता कायम ठेवण्याचे काम करण्यात आले आहे. हा व्यवसाय वृध्दींगत झाला असून वर्तक कुटूंबातील चौथी पिढी हा व्यवसाय चालवित आहे. स्थानिक बाजारासह जिल्ह्यातील वेगवेगळ्या बाजारात वर्तक मसालेंना मागणी असल्याची माहिती प्रणव वर्तक यांनी दिली.

अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील रहिवासी असलेले शालिनी गजानन वर्तक यांनी ३६ वर्षापुर्वी मसाले तयार करण्याचा संकल्प हाती घेतला. त्यांच्या कुटूंबियांची त्यांना साथ मिळाली. शहरानजिक असलेल्या वरसोली गावातून सुरु झालेला मसाल्यांचा सुगंध आजूबाजूच्या परिसरात पोहचला. शालिनी वर्तक यांच्या निधनानंतर अमृता विजय वर्तक यांनी या व्यवसायाची सुत्रे हाती घेतली. परंपरागत सुरु असलेल्या व्यवसायाला एक वेगळे स्वरुप देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एखादी कागदी अथवा साध्या पिशवीमधून पॅकींग होणाऱ्या मसाल्याची पॅकींग वेगळ्या पद्धतीने करण्यात आली. आधुनिक पद्धतीचा आधार घेत पिशवीमध्ये मसाल्याची पॅकींग केल्यावर त्यावर स्टीकर लावून एक आकर्षक असे मसल्याचे पाकीट तयार करण्यात आले. हळूहळू घरगूती स्पेशल मसाला, मालवणी, मसाला, आगरी मसाला, लाल तिखट मिरची पावडर, हळद, गरम मसाला, आदी अशा पाच ते सहा प्रकारचे मसाले आपल्या स्वतःच्या विजय फ्लोअर अॅन्ड मसाला मिलमध्ये दळण्याचे काम केले जाते. वर्तक मसालेची सुरूवात १९९० पासून कै. शालिनी गजानन वर्तक त्यानंतर अमृता विजय वर्तक यांनी हा व्यवसाय चालू ठेवला. आता पुन्हा नव्याने

प्रमोद जाधव

हा व्यवसाय ललिता प्रणव वर्तक यांनी केला. या व्यवसायामध्ये सुद्धा वर्तक कुटूंबातील चौथी पिढी कार्यरत आहे. त्यांना भाऊराव वर्तक, गजानन वर्तक, विजय वर्तक, प्रणव वर्तक यांची मोलाची साथ राहिली आहे. मसालेची गुणवत्ता व शुद्धता शंभर टक्के चांगली असल्याचे प्रणव वर्तक यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

या मसाला व्यवसायातून वर्षाला नऊ ते दहा लाख रुपयांची उलाढाल होत असून स्थानिक बाजारासह वेगवेगळ्या भागातील बाजार पेठांमध्ये वर्तक मसाल्याला मागणी आहे. मसाला व्यवसायाची परंपरा वर्तक कुटूंबियांनी जपली असून आज हा व्यवसायाने मोठी उंची गाठली असल्याची माहिती वर्तक कुटुंबियांकडून देण्यात आली आहे. अलिबाग एक जिल्ह्याचे ठिकाण आहे. जिल्ह्याच्या ठिकाणातून वेगवेगळे कलाकार तयार झाले आहे. खेळाडू निर्माण झाले आहेत.ऐतिहासिक वारसा असलेल्या अलिबागमध्ये मसाले व्यवसायातून एक वेगळी उंची गाठली आहे. वर्तक मसाले व्यवसायाने अलिबागचे नाव एक वेगळ्या उंचीवर पोहचविण्याचे काम केले आहे. ●

दुष्काळाची छटा असलेली दिवाळी

दिवाळीचा सण म्हणजे आनंदाची पर्वणी! लहान मोठ्या मंडळीना या आनंदाची ओढ लागलेली असते. दरवर्षी दिवाळी मोठ्या उत्सहात सारेजण साजरी करत असतात. यावर्षी मात्र दुष्काळाच संकट पसरले आहे. शेतकऱ्यांची रब्बी पिके वाया गेली आहेत. १९७२ च्या दुष्काळानंतर २०२६ ला भीषण परिस्थिती निर्माण झाली. मोठे पाणी संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीमध्ये कर्ज काढून सण साजरे करणे योग्य वाटत नाही. त्यामुळे शेतकऱ्याची दिवाळी आनंदी जाण्यासाठी आपण एकमेकांना हातभार लावला पाहिजे.

दिवाळीचा सण व्यर्थ होऊ नये म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेतून समजाचे प्रबोधन करतात.

ऐसे उत्सवाचे नाव घेवोनि ।
धन व्यर्थ उधळू नये कोणी ।
ते लागावे सत्कारणी ।
बोलिलों म्हणोनि बचत करा ।।
नाहीतरी घरी दिवाळी केली ।
दिवाळे निघाव्याची सोय झाली ।
जनता हसेल गावातील ।
हौसी नटराज म्हणोनि ।।
तैसी होऊ न द्यावी फजीती ।
बसावे तरि सर्वांचे पंगती ।
परि होऊ न द्यावी जीवनाची माती ।
कधीही आपुल्या ।।

उत्सवाच्या नावाने वाटेल तसा पैसा खर्च होतो. तो चांगल्या कामाला लावला पाहिजे. सणांची सुद्धा बचत केली पाहिजे, नाहीतर दिवाळीचा सण साजरा करताना कर्ज, उसनवार घेऊन केले तर गावातील लोक नावे ठेवतील. हसतील व 'हौशी नटराज' म्हणून तुमची अवहेलना होईल, तशी फजिती होण्यापेक्षा सर्वांबरोबर राहाल तर तुमचे जीवनमाती मोल होणार नाही. अगदी मोलाचा सल्ला देतात. पूर्वी जोडधंदे व व्यवसाय, नोकरी नसल्याने, शेतमालाला बाजारपेठ नसल्याने अनेक शेतकरी, शेतमजूर हे कर्ज घेत व सावकाराच्या व्याजाला बळी पडत. व जीवनाची माती करून घेत. तशीच आज सुद्धा शेतकऱ्यांची हीच परिस्थिती आहे.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९७२ चा दुष्काळ अत्यंत भीषण होता. या वर्षी पाऊस कमी पडल्याने पावसावर आधारित रब्बी पिके धोक्यात आली. सलग तीन वर्ष पाऊस न पडल्याने शेतीक्षेत्र उध्वस्त झाले होते. जनावरांचा चारा व अन्नधान्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. अशा काळात गावात हाताला काम नसल्याने मुंबई, पुणे सारख्या ठिकाणी लोक स्थलांतरीत झाले होते. जवळपास ३ कोटी

विठ्ठल वळसे पाटील

लोक या प्रभावाखाली आले होते. अन्न व पाणी यांचा तुटवडा असल्याने मोठी उपासमार सहन करवी लागली. मागेल त्याला काम या अंतर्गत सरकारने रोजगार हमी योजना राबवली. पाझर तलाव, तळी, विहिर, रस्ते निर्माण करत जलसंधारणाची कामे केली. रेशनवर लाल गहू व ज्वारीची आयात केली. सदुरू सेवा मंडळ यांच्या मार्फत सुखडी हे पौष्टिक आहार दिले. या आहाराशिवाय अनेकांकडे पर्याय नव्हते. रेशनिंग जाळे व्यापक केले. छावण्या व पाण्याचे टँकर सुरु केले. ही परिस्थिती लोकांसमोर मांडणे गरजेचे आहे. कारण यावर्षीचा दुष्काळ हा संपूर्ण जगात व्यापला आहे. अल निनोचा प्रभाव वाढत आहे. अशा संकटकाळात उधळपट्टी करणे योग्य ठरणार नाही. वारेमाप खर्च टाळून सण साजरा केला पाहिजे. दिवाळी म्हटले की सर्वत्र झगमगाट आणि आतषबाजीने आसमंत व्यापून गेलेला असतो. दीपावलीच्या सणात अनेक हौशी वस्तूंची खरेदी होत असते त्यामुळे ही ओढ विक्रीपायी व्यापारी व छोट्या व्यावसायिकांना असतेच. हा आनंदाचा सण साजरा होताना दुसऱ्या बाजूला पहिले तर अनेक मजूर, कष्टकरी हे उपासमारीचे जीवन जगत असतात. त्यांच्या दृष्टीने दिवाळी हा सण दिवाळ काढणारा आहे. वंचित वर्ग अश्या सणापासून दूर जातो अथवा हे वैभव पाहून कर्जबाजारी होतो. यासाठी उत्तमातील उत्तम भावार्थ राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सार्थ ग्रामगीतेतून मांडला आहे. सणोत्सव कसे करावे? कधी करू नये! असे. सार्थपणे राष्ट्रहित मांडतात. दिवाळी सणात होणार खर्च कमी करून आनंद साजरा केला पाहिजे. दुष्काळ परीस्थितिचे आपण अवधान राखले पाहिजे. पिके ही न आल्याने रोजगार मिळेल ही शास्वती देता येत नाही. सण जरा जपून साजरे केले पाहिजे. आपल्याकडे पाऊस कमी पडला तर धरणक्षेत्रावर विसंबून राहतो. इतर वेळी जलसंधारणाची कामे व जलव्यवस्थापन योग्य प्रमाणात होत नाही. दुष्काळात नियोजन तर दुष्काळ हटल्यावर पुन्हा मागचे दिवस पुढे येतात, दुष्काळाचा सामना करताना प्रत्येकाला नियोजन करणे अवश्य आहे. सरकार सरवोत्तपरी प्रयत्न करणार पण आपलेही कर्तव्य पार पाडले पाहिजे.

संत गाडगे बाबांच्या मते, दिवाळी हा केवळ स्वत:पुरता आनंद साजरा करण्याचा सण नसून तो गोरगरिबांसोबत आनंद वाटून घेण्याचा कर्मयोग आहे. दिवाळी सणात कोणी दरी आला तर त्यास फराळ द्या ! असे सत्पात्री दान करावे. सणासुदीच्या कला अवाजवी खर्च करण्यापेक्षा भुकेलेल्या अन्न, तहानलेल्या पाणी व गरिबांच्या शिक्षणासाठी खर्च करावा ती खरी दिवाळी मानतात. संत तुकाराम महाराज अभंगातून सांगतात. ''जे का रंजले गांजले! त्यासी म्हणे जो आपुले! तोचि साधू ओळखावा! देव तेथेचि जाणावा!'' उक्तीप्रमाणे गरजूंना मदत करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे. गरजूंना जाणणे हीच खरी दिवाळी. ●

चिंतनप्रवृत्त करणारे...

तिसरं पाखरू

तिसरं पाखरू, हा अॅड. डॉ. दिलीप पांढरपट्टे यांचा ललित लेखसंग्रह ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. या पुस्तकाला प्रवीण दवणे यांची प्रस्तावना आहे. त्यांच्या मते, सकारात्मक जीवनसंवादी 'तिसरं पाखरू' वाचकाला देऊन, डॉ.दिलीप पांढरपट्टे यांनी आनंदी जगण्यासाठी, भरारी घेणारे नितळ आकाशच जणु वाचकांना दिले आहे. 'मनोगत' मध्ये दिलीप यांनी, तथागत बुद्ध, जगद् गुरू तुकाराम महाराज, ओशो, जी.ए. कुलकर्णी यांचा निस्सीम चाहता असल्याचे म्हटले आहे. त्यांच्यामुळे आयुष्याची तात्त्विक बैठक पक्की झाली आणि समृद्धही! तत्त्वचिंतनात्मक अंगाने केलेल्या स्तंभलेखनातून हा संग्रह पुस्तकरूपाने तयार झाला आहे. या पुस्तकात एकूण ४१ लेख समाविष्ट आहेत. पुस्तकाचे सुंदर, सुयोग्य मुखपृष्ठ सतीश भावसार यांचे आहे.

दिले-बेमुदआ, या पहिल्या लेखात दिलीप यांनी क्रोध, या माणसाच्या सहा शत्रूंपैकी, एकाविषयी चिंतन मांडले आहे. ओशो यांच्यामते दमन केल्याने इच्छा नष्ट होत नाहीत, उलट त्या वेगाने, विकृत स्वरूपात उफाळून वर येतात. या सर्व इच्छा पूर्ण होणाऱ्या नसल्याने मनाची त्यादृष्टीने मशागत करण्याची गरज असते. मात्र काही निर्मोही मनाचे असतात. ते कसे, हे दिलीप सोदाहरण उत्तम प्रकारे स्पष्ट करतात. मित्रयोग, या लेखामध्ये मैत्रीचे महत्त्व स्पष्ट होते. कुणाशी मैत्री व्हावी हा माणसाच्या आकलनापलिकडचा आणि अखत्यारीबाहेरचा विषय असतो. मैत्रीत चांगले-वाईट काही असत नाही. मात्र मैत्रीत फटका बसल्यावर अनेकजण त्याबाबत विरक्त होतात. नको ही माणसांची मैत्री, असे त्यांना वाटते. मग काही व्यसनांशी नाते जोडतात, काही पाळीव प्राण्यांत रमतात. काही संगीत, वाचन, लेखन, किंवा बागकाम यांच्याशी आपले नाते जोडतात. मैत्री हातातून निसटून गेल्यास, आयुष्यात एक भयानक पोकळी निर्माण होते, याचीही जाणीव दिलीप करून देतात. संकटांना इष्टापत्ती मानण्याचा आपला स्वभाव असल्याचे दिलीप सांगतात. 'आपत्तीशी सामना करणे, तिचा आधार घेऊन दु:खाकडून आनंदाकडे आणि ऱ्हासातून पुनर्निर्माणाकडे जाणे, ही कला आहे आणि सर्जनशीलताही!' असे दिलीप यांनी एका लेखात सोदाहरण सांगितले आहे. उपरेपणाची गोष्ट, हा लेख विलक्षण वाचनीय आणि प्रेरक झाला आहे. वाढत्या वयात

भगवद्गीता ते मार्क्स, असा आपला प्रवास कसा झाला, हे दिलीप यांनी स्पष्ट केले आहे. श्रीलंकेत फिरायला गेले असता, दिलीप यांनी 'शॉवर ऑफ गोल्ड' या नावाचा सिंहली भाषेतील, इंग्रजी उपाशीर्षके असलेला, एक चित्रपट पाहिला. चित्रपटाची कथा विलक्षण असल्याचे त्यांनी लिहिले आहे. गरिबीमुळे आणि संकटांमुळे माणसाच्या मनाची आणि आयुष्याची होणारी फरपट सगळीकडे सारखीच करुण आणि दारुण असल्याचे त्यांना जाणवले. यावर उपाय म्हणून, 'तुम बेसहारा हो तो किसी का सहारा बनो' हे गीत त्यांना वारंवार आठवले. 'म्हातारा साधू विरुद्ध तरुण साधू', 'न कोई राहबर जरुरी है' दोन लेख वेगळेच निष्कर्ष वाचकांसमोर ठेवतात. त्यामुळे वाचक विचारमग्न होतो. 'तू येत रहा रे दु:खा' या लेखात कुंतीने कृष्णाजवळ दु:ख मागितले. कृष्णाजवळ तिने दु:ख मागितले, त्याचे सर्वांनाच आश्चर्य वाटले. कृष्णाने विचारले, तेव्हा कुंतीचे उत्तर होते, ''अरे मी दु:खात असले की मला नेहमी तुझी आठवण येत राहील. म्हणून तू मला दु:खच दे.'' यावर दिलीप लिहितात, दु:ख हेच विविध कलाकृतींचे प्राणतत्त्व असते. त्यामुळेच जगातील सर्व महान कलाकृतींम ध्ये दु:खाचा ओलावा सतत झिरपत जाताना दिसतो. 'ही दुनिया पाषाणांची..' या लेखात काही वर्षांपूर्वी घडलेल्या एका प्रसंगाची प्रतिक्रिया आहे. ठाण्याच्या सुषमा



निकम नावाच्या तरुण मुलीला

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

तिच्या प्रियकराने रस्त्यात, भरदिवसा,भोसकून रक्तबंबाळ केले. तेव्हा हजर असणाऱ्या एकाही बघ्याने त्या नादान पोराला रोखले नाही. लोक नुसते बघत राहिले. मुलीच्या वडिलांनी म्हटले, ''मुंबई शहर आता हिजड्यांचे शहर झाले आहे'' यावर दिलीप लिहितात, हे आताचे नाही, कधीही अन्यायाविरुद्ध समाज उभा राहिल्याचे इतिहास सांगत नाही. पुराणातही तेच दिसते. त्यामुळेच अनेक थोरामोठ्यांवर अन्याय झाल्याचे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले आहे. शेवटी सुरेश भटांची सार्थ काव्यपंक्ती..

'ही दुनिया पाषाणांची
बोलून बदलली नाही
मी बहर इथे शब्दांचे
नुसतेच उधळले होते'

'कहाणी भाडोत्री गर्भाशयाची' या लेखात विज्ञानाच्या प्रगतीतून निर्माण झालेल्या वास्तवाचा दिलीप यांनी मागोवा घेतला आहे. स्त्री आपलं गर्भाशय भाड्यानं देऊ शकते, ही संकल्पना ८० च्या दशकापूर्वी केवळ कविकल्पना वाटली असती. परंतु आज गुजरातमधील आणंद, सरोगेट मदरहूडचे, म्हणजेच 'बदली मातृत्वाचे' केंद्र बनले आहे.अनेक गरीब स्त्रिया 'भाडोत्री आई' व्हायला तयार होतात. आपल्या गर्भाशयात दुसऱ्याच्या वाढविलेल्या बाळासाठी खणखणीत मोबदलाही मिळवतात. त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची चर्चा दिलीप यांनी केली आहे. 'उसकी साड़ी मेरी साड़ी से..' या लेखात माणसांमधील मत्सर या भावनेची चर्चा दिलीप यांनी सोदाहरण केली आहे. आपल्यातला प्रत्येक जण या निसर्गाची अद्वितीय निर्मिती असल्याने, एकमेकांसारखे कोणीही नसतात. त्यामुळे मत्सर करण्याची गरजच नसते. मात्र या दुर्गुणामुळे अनेक अनर्थ घडू शकतात. म्हणूनच संत सल्ला देतात..

कोणाही जिवाचा न घडो मत्सर।
वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।

'अशा वेळी काय करावं?', 'मातीचा इमला हा', 'अल्ला का शुक्र है!' या लेखांमध्ये लेखकाने मृत्यूसंबंधीचे सार्थ चिंतन केले आहे. ते वाचकाला चिंतनप्रवृत्त करते. 'सुखाची पाहुनी दु:खे...' या लेखामध्ये दिलीप यांनी दु:ख हे देवासारखंच अगम्य असते, असे म्हटले आहे. दु:खाची नेमकी व्याख्या कुठेच दिलेली नाही. मात्र दु:ख विविध रूपांत, जीवनात सतत सोबत येते. हे दु:ख अनेकांना सैरभैर करते. तर काहींना दु:खाची सोबत हवीशी वाटते. सुरेश भट लिहितात...

'कधी वाटे पुढे जावे,
सुखाला दु:ख सांगावे
सुखाची पाहुनी दु:खे
इथे माझी फुटे छाती'

हा अनुभव ऐकल्यावर, ''सुखदु:ख वेगळं असतं, असं म्हणता येईल का?'' असा सार्थ प्रश्न दिलीप विचारतात.

सोमवारच संकट मध्ये जगात जास्तीतजास्त हृदयविचाराचे झटके सोमवारी का येतात, याची चर्चा केली आहे. काहींना रविवारी रात्रीपासूनच टेन्शन यायला लागते. कारण अनेकांना सोमवारी कामावर जाणे, त्रासाचे वाटते. बॉसच्या ओरड्याची भीती आणि कामासंबंधी आस्था नसते. सर्वांनाच आवडीचा व्यवसाय मिळेलच असे नाही, पण जे तुमच्या वाट्याला येईल ते आवडून घ्यावे लागेल, असे दिलीप सुचवतात. 'तिसरं पाखरू' हा या पुस्तकातील लेख, पाडगावकरांच्या एका बोलगाण्यावर आधारलेला आहे. अन्य पाखरे दाणे टिपण्यात मग्न आहेत. मात्र हे तिसरं पाखरू आपल्याच नादात गात बसले आहे. दिलीप लिहितात, हे सगळ्यांनाच जमेल असं नाही. पण आपल्या मेंदूच्या पिंजऱ्यात 'मन' नावाचं तिसरं पाखरू कायम लपून बसलेलं असतं, एवढं लक्षात ठेवूया! प्रकाशाचे गाणे अवसेच्या रात्री... या लेखामध्ये दिलीप यांनी जीवनात आनंद शोधण्याचा सोपा संदेश दिला आहे. त्यांच्या मते, 'अट्टाहास संपला की आयुष्यात फक्त आनंदच उरतो. बारमाही हिरवंगार राहणारं आनंदाचं झाड तुमच्या अंगणात उगवतं आणि मनातही.'

'तिसरं पाखरू' या पुस्तकातील दिलीप यांनी मांडलेले चिंतनात्मक विचार, वाचकाला अंतर्मुख करतात, आनंदाने जगण्याची गुरुकिल्ली देऊन जातात. त्यांनी दिलेले विविध संदर्भ त्यांच्या साहित्यिक उंचीची जाणीव करून देतात. त्यामुळेच वेळोवेळी हे पुस्तक चाळण्यासाठी जवळ असावे. पुस्तकाचे शेवटी, दिलीप पांढरपट्टे यांच्या कार्यकर्तृत्वाचा सचित्र परिचय करून दिला आहे. ●

पुस्तकाचे नाव तिसरं पाखरू
लेखक डॉ. दिलीप पांढरपट्टे
९८२१०७५५४२
प्रकाशक : ग्रंथाली, मुंबई-१६.
पहिली आवृत्ती : २ ऑक्टोबर २०२५.
पृष्ठे : १२३
मूल्य : रु.२२५/-

भन्नाट प्रश्न, वैज्ञानिक उत्तरे

मानवात क्लोरोफिल असते तर?



त्यादिवशी सचिन आणि मनिषा 'ज्ञानदीप'मध्ये आले, तेव्हा सचिनने घोषणा केली,

''काका, आजपासून मी जेवण बंद करणार!''

''छान! मग तुझ्या वाटणीचं जेवण मी जेवेन,'' समाधानकाका म्हणाले.

''अहो, कारण तरी विचारा! मला माझ्या शरीरात क्लोरोफिल बसवायचंय. मग उन्हात उभा राहून झाडांसारखं अन्न तयार करीन. डबा नेण्याची कटकट संपली!''

मनिषाने कपाळावर हात मारला. ''क्लोरोफिल म्हणजे मोबाईलमध्ये बॅटरी बसवण्यासारखं वाटलं का?''

''कल्पना भन्नाट आहे,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''पण वनस्पतींमध्ये फक्त क्लोरोफिल असून भागत नाही. त्यांच्या पेशींमध्ये क्लोरोप्लास्ट नावाची खास रचना असते. त्यात क्लोरोफिल आणि प्रकाशसंश्लेषणासाठी आवश्यक इतर यंत्रणा असते.''

''मग आपल्या काल्पनिक माणसाच्या त्वचेतील पेशींमध्ये कार्यक्षम क्लोरोप्लास्ट आहेत असं समजूया,'' सचिन म्हणाला.

''चालेल. पण तरीही एक मोठी अडचण आहे. माणसाला भरपूर ऊर्जा लागते. तू शांत बसलेला असलास तरी हृदय धडधडतं, फुफ्फुसं काम करतात, मेंदू सतत कार्यरत असतो, शरीराचं तापमान राखलं जातं.''

''पण आपल्या संपूर्ण त्वचेवर प्रकाश पडेल ना?'' मनिषाने विचारलं.

''प्रौढ माणसाच्या शरीराचं बाह्य पृष्ठफळ साधारण दीड-दोन चौरस मीटर असतं. त्यातही आपण संपूर्ण शरीर उघडं ठेवून दिवसभर उन्हात उभे राहत नाही. कपडे, सावली, ढग, रात्र आणि सूर्यकिरणांची बदलती तीव्रता यांचा विचार करावा लागेल. प्रकाशसंश्लेषणाची कार्यक्षमताही मर्यादित असते.''

''म्हणजे क्लोरोप्लास्ट असूनही पुरेसं अन्न मिळणार नाही?''

''बहुधा नाही. रोजच्या ऊर्जेच्या गरजेचा काही भाग मिळू शकेल. संपूर्ण गरज भागवायची तर तुला खूप मोठं प्रकाश पकडणारं पृष्ठफळ लागेल. कदाचित पाठीवर मोठमोठी हिरवी पानं!'' समाधानकाका म्हणाले.

''मग शाळेच्या बाकावर ती पानं कुठे ठेवणार?'' मनिषाने विचारलं.

सगळे हसले.

''पण माझी त्वचा हिरवी दिसेल?'' सचिनने विचारलं.

''क्लोरोफिल पुरेशा प्रमाणात त्वचेच्या वरच्या भागात असेल तर हिरवट दिसू शकते,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''पण मानवी त्वचेत मेलेनिन असतं, त्वचेखाली रक्तवाहिन्या असतात. त्यामुळे पानासारखी गर्द हिरवीच त्वचा होईल असं नाही.''

विद्यालंकार घारपुरे

''प्रकाशसंश्लेषणातून साखर तयार झाली तर शरीर ती वापरू शकेल ना?''

''आपल्या काल्पनिक शरीरात ती इतर ऊतकांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था आहे असं गृहीत धरलं, तर हो.''

''आणि प्रकाशसंश्लेषणात ऑक्सिजनही तयार होतो. मग फुफ्फुसांची गरज कमी होईल?''

''नाही,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''प्रकाशसंश्लेषण पुरेसा प्रकाश असतानाच होईल. पण शरीरातील पेशी दिवसरात्र पेशीय श्वसन करतात आणि त्यांना सतत ऑक्सिजन लागतो. त्वचेत तयार झालेला ऑक्सिजन संपूर्ण शरीराची गरज भागवेलच असं नाही.''

''रात्री सूर्य नाही म्हणून श्वास बंद, अशी व्यवस्था काही उपयोगाची नाही!'' समाधानकाका म्हणाले.

''मग निदान भूक तरी कमी होईल!'' सचिन म्हणाला.

''कदाचित काही प्रमाणात. पण अन्नातून आपल्याला फक्त ऊर्जा मिळते का?''

''नाही. प्रथिनं, मेद, जीवनसत्त्वं, खनिजंही,'' मनिषा म्हणाली.

''बरोबर. प्रकाशसंश्लेषणातून कार्बोहायड्रेट तयार करता येईल. पण आवश्यक अमिनो आम्लं, मेदाम्लं, जीवनसत्त्वं आणि खनिजं केवळ सूर्यप्रकाशातून मिळणार नाहीत.''

''पण झाडं तर सूर्यप्रकाशावर जगतात!''

''हीच नेहमीची चूक,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''वनस्पतीही केवळ सूर्यप्रकाशावर जगत नाहीत. सूर्यप्रकाश त्यांना ऊर्जा देतो. पण पाणी, हवेतून कार्बन डायऑक्साइड आणि मातीतून नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि इतर खनिजंही त्यांना घ्यावी लागतात.''

''म्हणजे हिरवा झालो तरी चपाती-भाजी खावीच लागणार!''

''हो. एखादी चपाती कमी लागली तर लागली!'' मनिषा म्हणाली.

''पण प्राण्यांमध्ये क्लोरोफिल असतंच नाही का?'' सचिनने विचारलं.

''साधारणपणे प्राण्यांच्या स्वतःच्या पेशी क्लोरोफिल तयार करत नाहीत. पण निसर्गात काही विलक्षण उदाहरणं आहेत. काही समुद्री स्लग शैवाल खातात. शैवालांमधले काही क्लोरोप्लास्ट ते स्वतःच्या पेशींमध्ये कार्यक्षम अवस्थेत काही काळ टिकवून ठेवतात.''

''म्हणजे दुसऱ्याचं सोलर पॅनेल काढून स्वतःच्या घरावर बसवल्यासारखं!''

''उपमा छान आहे!'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''या प्रकाराला म्हणतात.त्या क्लोरोप्लास्टच्या प्रकाशसंश्लेषणातून तयार होणाऱ्या पदार्थांचा स्लगना फायदा होऊ शकतो.''

''जमिनीवर राहणाऱ्या प्राण्यांत असं काही आहे?''

''हे रंजक उदाहरण आहे. तो उभयचर प्राणी आहे. त्याच्या अंड्यांमध्ये नावाचा हिरवा शैवाल आढळतो. संशोधकांना या शैवालाच्या पेशी विकसित होणाऱ्या भ्रूणाच्या ऊतकांत आणि काही भ्रूणपेशींच्या आतही आढळल्या आहेत.''

''म्हणजे प्राण्याच्या शरीरात जिवंत सौरऊर्जा केंद्र!'' सचिन म्हणाला.

''पण ते त्या प्राण्याने स्वतः बनवलेलं नाही,'' मनिषा म्हणाली.

''शाब्बास! हाच फरक महत्त्वाचा,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''शैवालाच्या प्रकाशसंश्लेषणातून तयार होणाऱ्या ऑक्सिजनचा भ्रूणाला फायदा होऊ शकतो आणि शैवालालाही भ्रूणाच्या चयापचयातून मिळणाऱ्या पदार्थांचा उपयोग होतो.''

''म्हणजे माझी हिरव्या माणसाची कल्पना पूर्णपणे वेडी नाही!''

''नाही. पण माणसाच्या स्वतःच्या पेशींमध्ये कायमचे कार्यक्षम क्लोरोप्लास्ट असणं ही फार मोठी काल्पनिक उडी आहे.''

''मग उत्क्रांतीने माणसाला क्लोरोप्लास्ट का दिले नाहीत?''

''उत्क्रांती अभियंत्यासारखी बसून कोणाला काय द्यायचं हे ठरवत नाही,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''वेगवेगळ्या जीववंशांनी वेगवेगळे उत्क्रांतीचे मार्ग घेतले. वनस्पतींच्या पूर्वजांनी प्रकाशाची ऊर्जा वापरण्याची व्यवस्था मिळवली; प्राण्यांच्या पूर्वजांनी इतर जीवांनी तयार केलेले सेंद्रिय पदार्थ खाऊन ऊर्जा आणि पोषक घटक मिळवण्याचा मार्ग घेतला.''

सचिनने उसासा टाकला. ''म्हणजे डबा न्यावा लागणारच!''

समाधानकाका म्हणाले, ''पण तुझ्या डब्यातलं अन्न आधीच सूर्यप्रकाशाची ऊर्जा रासायनिक ऊर्जेत साठवून घेऊन आलं आहे.''

''म्हणजे मी प्रकाशसंश्लेषण करत नसलो, तरी प्रकाशसंश्लेषणाचं उत्पादन खातोय!''

''अगदी बरोबर,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''पृथ्वीवरील बहुतेक अन्नसाखळ्यांच्या मुळाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे प्रकाशसंश्लेषणच आहे.''

मनिषा हसली. ''म्हणजे सूर्यप्रकाशावर जगण्याची तुझी इच्छा काही प्रमाणात आधीपासूनच पूर्ण होतेय!''

''फरक एवढाच सूर्यप्रकाश आधी अन्नाच्या कारखान्यातून फिरून माझ्याकडे येतो!''

'ज्ञानदीप'मध्ये पुन्हा एकदा हशा पिकला. ●

मोहम्मद शमीचा कसोटी क्रिकेटला रामराम



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय संघाचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने एक महत्त्वाची घोषणा केली आहे, त्याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळलेला सामना हा त्याचा शेवटचा कसोटी सामना ठरला. शमी काही काळापासून भारतीय संघापासून दूर आहे, २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर त्याला भारतीय संघासाठी खेळण्याची संधी मिळालेली नाही. मात्र, त्याने स्पष्ट केले आहे की तो मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये खेळणे सुरू ठेवणार आहे.

कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करताना, मोहम्मद शमीने सोशल मीडियावर एक भावूक पोस्ट शेअर केली. त्याने लिहिले की, तो जड अंतःकरणाने या फॉरमॅटचा निरोप घेत आहे आणि आपल्यासोबत अनेक सुंदर आठवणी घेऊन जात आहे.

त्याने व्यक्त केले की, भारताची पांढरी कसोटी जर्सी सोडणे सोपे नाही; परंतु, या प्रवासातील आठवणी सदैव त्याच्या हृदयात राहतील. त्याने आठवण सांगितली की, जेव्हा त्याने पहिल्यांदा भारताची कसोटी जर्सी परिधान केली होती, तेव्हा त्याने आपल्या देशासाठी काहीतरी अर्थपूर्ण योगदान देण्याचे स्वप्न पाहिले होते. प्रत्येक विकेट, प्रत्येक संघर्ष, प्रत्येक दुखापत आणि प्रत्येक पुनरागमन या सर्व गोष्टींनी त्याला जीवनाचे मौल्यवान धडे दिले आहेत. याव्यतिरिक्त, त्याने कठीण आणि चांगल्या काळात साथ दिल्याबद्दल आपल्या सहकाऱ्यांचे, प्रशिक्षकांचे, कुटुंबाचे आणि देशभरातील चाहत्यांचे आभार मानले. तसेच, त्याने बीसीसीआय आणि क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालचेही विशेष आभार मानले आहेत. पुढे शमीने म्हटले की, जरी त्याने कसोटी क्रिकेटमधील आपला शेवटचा चेंडू टाकून दिला असला, तरी आपल्या देशासाठी खेळल्याचा अभिमान त्याच्या मनात सदैव जिवंत राहील.

मोहम्मद शमीने भारतासाठी ६४ कसोटी सामने खेळले आहेत. त्यामध्ये २७.७१ च्या सरासरीने एकूण २२९ बळी घेतले. त्याची सर्वोत्तम गोलंदाजी कामगिरी ५६ धावांत ६ बळी अशी होती. आपल्या कारकिर्दीत त्याने १२ वेळा एका डावात ४ बळी आणि ६ वेळा एका डावात ५ बळी (फाईव्ह-विकेट हॉल) मिळवले. शमीने शेवटचा कसोटी सामना २०२३ च्या 'वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप'च्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळला होता. त्यानंतर दुखापती आणि संघ निवडीतील अडचणींमुळे त्याला पुन्हा कसोटी क्रिकेटमध्ये परतता आले नाही.

ज्या दिवशी पदार्पण, त्याच दिवशी प्रवासाची सांगता...

मोहम्मद शमीने ६ नोव्हेंबर २०१३ रोजी कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. विशेष म्हणजे, आपल्या पदार्पणाच्या बरोबर १३ वर्षांनंतर, त्याने कसोटी क्रिकेटला निरोप देण्यासाठी याच तारखेची निवड केली. ज्या दिवशी त्याने पहिल्यांदा भारतीय कसोटी जर्सी परिधान केली होती, त्याच दिवशी त्याने आपल्या या प्रवासाची सांगता केली.

निवडक



आरव अद्रिकरच्या ५ धावांत ५ बळी

मुंबई : आरव अद्रिकरने अवघ्या ५ धावांत ५ बळी घेण्याची कामगिरी केली. त्यामुळे मुंबईतील शिवाजी पार्क जिमखान्याने अजित नाईक स्मृती १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी रिझवी स्पोर्ट्स क्लबचा १० गडी राखून पराभव केला. वरळी स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या या स्पर्धेत डावखुरा फिरकी गोलंदाज आरवने ५.४ षटकांत ही कामगिरी करताना रिझवीचा डाव ४२ धावांत संपवला. मुंबई क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने होत असलेल्या या स्पर्धेत कबीर मोगलच्या भेदक गोलंदाजीमुळे इस्लाम जिमखान्याने व्हीएसटी जिमखान्याचा ६३ धावांनी पराभव केला. कबीरने २३ धावांतच सहा फलंदाज बाद केले.

नमन धीरचा वादग्रस्त बळी

वेलिंग्टन : भारत विरुद्ध न्यूझीलंड संघात वेलिंग्टनला अत्यंत रोमांचक दुसरा एकदिसीय सामना पार पडला. पावसाच्या व्यत्ययात झालेल्या या सामन्यात गोलंदाजांचे वर्चस्व राहिले. दरम्यान, या सामन्यात एक वादग्रस्त निर्णयही पाहायला मिळाला. भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू नमन धीरचा बळी वादग्रस्त ठरला. या सामन्यात नमन धीर चांगल्या लयीत खेळत होता. मात्र, २५ व्या षटकात तो जेकॉब डफीच्या गोलंदाजीवर टीम सिफर्टच्या हातून झेलबाद झाला. परंतु, त्याच्या विकेटवर बरीच चर्चा झाली. झाले असे की, २५ व्या षटकातील चौथ्या चेंडूवर नमनने चांगला शॉट खेळला होता. परंतु, डीप बॅकवर्ड स्क्वेअर लेगच्या बाऊंड्री लाईनजवळ टीम सिफर्टने अफलातून झेल घेतला. मात्र, हा झेल घेताना त्याच्या पायाचा स्पर्श बाऊंड्रीच्या कुशनला लागला आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यामुळे निर्णय तिसऱ्या अंपायरवर सोपवण्यात आला. त्यांनी अनेक अँगलने हा झेल तपासला. त्यांच्यासाठीही निर्णय देणे कठीण झाले होते, परंतु, वेगवेगळ्या अँगलने झेल तपासल्यानंतर त्यांनी ब्राऊंड्रीला स्पर्श झाल्याचा कोणताही पुरावा नाही, असा निर्णय देत नमन धीरला बाद दिले. त्यामुळे नमन १२ धावांवर बाद झाला. परंतु, सिफर्टने जिथे झेल घेतला, त्या भागातील ब्राऊंड्री कुशन्स इतर कुशनिंगपेक्षा थोडे मागे होते. तसेच, ब्राऊंड्रीवरील कुशनिंगची मांडणी अनेक ठिकाणी बरोबर नव्हती, कदाचित याचबाबत केएल राहुलनेही अंपायर्सची चर्चाही केली होती. परंतु, तिसऱ्या अंपायने आधीच निर्णय दिलेला होता, त्यामुळे नमन धीरला १२ धावांवर माघारी परतावे लागले.



न्यूझीलंड संघाच्या नावावर नकोसा विक्रम

वेलिंग्टन : भारतीय संघाने शनिवारी (दि.७) वेलिंग्टन येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध ४ धावांनी विजय मिळवला. यासोबतच न्यूझीलंडच्या नावावर सर्वाधिक पराभवाचा विक्रमही नोंदवला गेला असून, विजयांच्या बाबतीत भारतीय ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडला मागे टाकले. एका कॅलेंडर वर्षात एकाच प्रतिस्पर्ध्याविरुद्ध सर्वाधिक सामने हारणारा न्यूझीलंड हा पहिला संघ ठरला आहे. सध्याच्या म्हणजेच २०२६ या कॅलेंडर वर्षात न्यूझीलंडचा भारताविरुद्धचा हा ११ वा पराभव होता. यापूर्वी २००५ मध्ये ऑस्ट्रेलियाने न्यूझीलंडला १० सामन्यांत हरवले होते, तर २००८ मध्ये इंग्लंडकडून न्यूझीलंडला ९ सामन्यांत पराभव पत्करावा लागला होता. न्यूझीलंडने यापूर्वी जानेवारी २०१९ मध्ये आपल्या मायदेशात सलग दोन एकदिवसीय सामने गमावले होते. विशेष म्हणजे त्या वेळीसुद्धा न्यूझीलंडला भारताविरुद्धच सलग पराभवाचा सामना करावा लागला होता. न्यूझीलंडने मायदेशात कोणतीही द्विपक्षीय मालिका गमावण्याची ती शेवटची वेळ होती.

विंडीजच्या खेळाडूचा अनोखा विक्रम

बार्बाडोस : वेस्ट इंडिजचे अनेक खेळाडू जगभरातील वेगवेगळ्या टी-२० लीगमध्ये खेळतात. त्यामधील अनेकांनी विश्वविक्रमे केली आहेत. आता त्यामध्ये आणखी एकाची भर पडली आहे. आंद्रे रसेल टी-२० क्रिकेटमधील सर्वोत्तम अष्टपैलूपैकी एक आहे. नुकतेच त्याने क्रिकेटच्या या फॉरमॅटमध्ये १०,००० धावांचा टप्पा पार केला. त्यामुळे अशी कामगिरी करणारा एकूण २२ वा फलंदाज ठरला आहे. हा विक्रम करताच त्याने आपल्या नावावर विश्वविक्रमाची नोंद केली.

भारताची पावसाच्या मदतीने बाजी

डीएलएस नियमानुसार चार धावांनी विजयी ; मालिकेत २-० अशी भक्कम आघाडी



। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात शनिवारी (दि.७) दुसरा एकदिवसीय सामना खेळविण्यात आला. यावेळी भारतीय संघाची अवस्था ७ बाद ११३ अशी असताना मुसळधार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे सामना रद्द करावा लागला आणि भारत डीएलएसनुसार ४ धावांनी सामना जिंकला.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात वेलिंग्टन येथे सुरू असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाची सुरुवात निराशाजनक झाली. जेकब डफीने अवघ्या ११ धावांत माघारी पाठवले. शुभमन गिल (०) व विराट कोहली (७) बाद झाल्यानंतर रोहित शर्मा व श्रेयस अय्यर यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला; परंतु, रोहित २३ धावांवर बाद झाला. मॅथ्यू फिशरने अक्षर पटेलचा (७) बळी मिळवला. जेमिन्सनने श्रेयसला ३० धावांवर झेलबाद केले. त्यानंतर नमन धीरला (१२) डफीने त्याचा तिसरा बळी टिपला. पाठोपाठ अंशुल कंबोज (१) जेमिन्सनच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यामुळे भारताची अवस्था ७ बाद ११३ धावा अशी असताना पावसाने हजेरी लावली. त्यामुळे सामना रद्द करावा लागला. यावेळी डीएलएसनुसार भारत (१०९ धावा) आघाडीवर होता. त्यामुळे भारत डीएलएसनुसार ४ धावांनी सामना जिंकला.

तत्पुर्वी, न्यूझीलंडचा संपूर्ण डाव ४१ षटकांत अवघ्या १३४ धावांवर आटोपला. भारतीय गोलंदाजांनी किवी फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारण्याची संधीच दिली नाही. न्यूझीलंडकडून डॅरिल मिचेलने सर्वाधिक ५५ धावांची खेळी केली, तर कर्णधार मिचेल सँटनरने ३१ धावांचे योगदान दिले. हेन्री निकोल्सने ११ धावा केल्या. त्यानंतर विल यंग (६), टॉम लॅथम (७), नॅथन स्मिथ (३), काईल जेमिसन (७) आणि ब्लेअर टिकनर (२) स्वस्तात माघारी परतले. टिम सायफर्ट आणि ग्लेन फिलिप्स यांना तर भोपळाही फोडता आला नाही. भारताकडून गुरनूर ब्रारने सर्वाधिक ४ बळी घेतले. तर, आकिब नबी, अंशुल कंबोज आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ बळी घेत त्याला उत्तम साथ दिली.

रोहित शर्माने इतिहास रचला

रोहितने न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात दोन षटकार मारले आणि तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन संघांविरुद्ध ५० किंवा त्यापेक्षा अधिक षटकार मारणारा केवळ दुसराच फलंदाज ठरला. याबाबतीत त्याने आफ्रिदीची बरोबरी केली. रोहितने न्यूझीलंडआधी ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंकेविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये ५० किंवा त्यापेक्षा अधिक षटकार मारले आहेत. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ९३ षटकार आणि श्रीलंकेविरुद्ध ५८ षटकार मारले आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन संघांविरुद्ध ५० किंवा त्यापेक्षा अधिक षटकार मारण्याचा विक्रम आधी केवळ आफ्रिदीच्याच नावावर होता. आता रोहितने त्याची बरोबरी केली आहे.

विराट कोहलीचा विश्वविक्रम

या सामन्यात विराट कोहली अवघ्या ७ धावांवर माघारी परतला. मात्र, या ७ धावांनी विराटने न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक १९७५ धावांचा विक्रम आपल्या नावावर केला. रिकी पाँटिंगचा १९७१ धावांचा विक्रम त्याने मोडला. या विक्रमात सचिन तेंडुलकर (१७५०), कुमार संगकारा (१५१९), सनथ जयसूर्या (१५१९) व जॅक कॅलिस (१४४९) यांचा क्रम नंतर येतो.

गुरनूर ब्रारचा विक्रम

गुरनूर ब्रारने सातत्या राखताना शनिवारीएकदिवसीयसामन्यातली त्याची सर्वोत्तम कामगिरी केली. त्याने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ३० धावांत ४ बळी घेतले. जवागल श्रीनाथ (४-२३, ऑकलंड, २००३) याच्यानंतर न्यूझीलंडमध्ये एकदिवसीय सामन्यात भारतीय गोलंदाजाची ही सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी ठरली. त्याने श्रीनाथचाच १९९५ सालचा नेपीयर येथील ४-५२ हा विक्रम मोडला.

तोहीद हृदोयची द्विशतकीय खेळी



। सिल्हेट । वृत्तसंस्था ।

वेस्ट इंडिज आणि बांगलादेश संघात सध्या रोमांचक कसोटी मालिका सुरू आहे. या मालिकेतील दुसरा सामना सिल्हेट आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सुरू आहे. या कसोटी मालिकेतील पहिला सामना वेस्ट इंडिजने जिंकला आहे. त्यामुळे बांगलादेशला मालिका वाचवण्यासाठी दुसऱ्या सामन्यात विजयाची आवश्यकता आहे. मात्र, वेस्ट इंडिजने पहिल्या डावात १०६.४ षटकात ३५६ धावा ठोकल्या होत्या. वेस्ट इंडिजकडून अमीर जंगूने १३३ धावा केल्या, तर केविन विकहॅमने ६१ धावांची, तर जस्टीन ग्रीव्ह्जने ५१ धावांची खेळी केली होती. बांगलादेशकडून गोलंदाजी करताना हसन मेहमूदने ६ बळी घेतले होते. त्यानंतर बांगलादेशचा संघ पहिल्या डावात फलंदाजीसाठी उतरला; परंतु, सलामीवीर तान्झिद हसन तमिम (१६), नयीम हसन (५) आणि कर्णधार नजमुल हुसैन शान्तो (१८) स्वस्तात बाद झाले. त्यानंतर तोहिद हृदोयवर याला आधी मुशफिकूर रेहिमने साथ दिली. त्यांच्यात ७३ धावांची भागीदारी झाल्याने बांगलादेशने १०० धावांचा टप्पा पार केला; परंतु, मुशफिकूर ३४ धावा करून बाद झाला. पोठापाठ लिटन दास, मेहदी हसन मिराज आणि हसन मेहमुदही स्वस्तात बाद झाले. त्यामुळे बांगलादेशची अवस्था ७ बाद १८४ धावा अशी बिकट झाली होती. परंतु, तैजुल इस्लामने हृदोयला दमदार साथ दिली. दरम्यान, हृदोयने शतक पूर्ण केले आणि मग दीडशतकी खेळीही केली. त्यानंतर तैजुलला २२ धावांवर अमीर जंगूने यष्टीचीत केले. त्यानंतर हृदोयला तस्कीन अहमदने साथ दिली. यादरम्यान, ३०४ चेंडूत हृदोयने त्याच्या कारकिर्दीतील पहिले द्विशतक ठोकले. विशेष म्हणजे २५ वर्षीय हृदोयचा हा केवळ तिसराच कसोटी सामना आहे. त्यानंतर तस्किन अहमद १२ धावांवर बाद झाला. शादमान इस्लाम दुखापतीमुळे फलंदाजीला आला नाही. त्यामुळे तिथेच बांगलादेशचा डाव संपला. बांगलादेशने १११.५ षटकात ३८६ धावा केल्या. यात हृदोयच्या नाबाद २४२ धावांचे मोठे योगदान राहिले.

यशस्वी जैस्वालची शतकी खेळी



। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।

भारत 'अ' विरुद्ध न्यूझीलंड 'अ' संघातील दुसऱ्या कसोटीत १५५ धावांची खेळी करणाऱ्या यशस्वी जैस्वालला दुखापत झाली होती. त्यामुळे तो तिसऱ्या सामन्यात खेळेल की नाही, याबाबत साशंकता होती. परंतु, तो खेळला अन् पहिल्याच दिवशी शतकी खेळी करून मैदान गाजवले. यशस्वीच्या सलग दुसऱ्या शतकाने भारताला मजबूत स्थिती मिळवून दिली आहे आणि त्याचा हा फॉर्म आगामी कसोटी मालिकेसाठी भारतासाठी महत्त्वाची गोष्ट आहे.

न्यूझीलंड 'अ' संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. या सामन्यासाठी रिषभ पंत तंदुरुस्त झालेला नाही. मात्र, रवींद्र जडेजा व तिलक वर्मा हे हा सामना खेळत आहेत आणि जसप्रीत बुमराही संघात परतला आहे. त्यामुळे या सामन्याची प्रचंड उत्सुकता होती. यावेळी यशस्वी जैस्वाल व साई सुदर्शन या जोडीने भारत 'अ' संघाला दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी संयम व आक्रमकता याचा योग्य ताळमेळ राखून पहिल्या बळीसाठी १७५ धावांची भागीदारी केली. यशस्वीने पुन्हा एकदा शतक झळकावले. त्याने १३८ चेंडूंत १६ चौकार व २ षटकारांसह १०२ धावांची खेळी केली.



दिवाळी... बळीराजाच्या दारी...

- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : २०.७२ लाख शेतकरी कर्जखात्यांवर १८,०४० कोटी थेट जमा.
- दुष्काळी ५००० रुपये अग्रीम मदत ८७ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना.
- राज्यात ७.५ एचपी पर्यंतच्या शेतीपंपांना मोफत वीज.
- राज्यात ३८ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा.
- ३०४ तालुक्यात दुष्काळ जाहीर, विविध उपाययोजना लागू, १०० टक्के पंचनामे पूर्ण, धान्यवितरण ९३ टक्के पूर्ण.
- पीएम किसान : ९१.१२ लाख शेतकऱ्यांना १८३५ कोटींचा २४ वा हप्ता नुकताच वितरित.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या ३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे शुल्क माफ.

सोबत होतो, सोबत आहोत, सोबत राहू...

शुभ दीपावली



माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन | देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री | एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री | सुनेत्रा अजित पवार उपमुख्यमंत्री
www.mahasamvad.in @MahaDGIPR DGIPR, Govt of Maharashtra /MaharashtraDGIPR

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)